
श्री कृष्णा मेणसे



म. ग्रं. सं. ठाणे
विषय कृ प्रवास
सं. क्र. ६६३

REFBK-0024940

संदर्भ ग्रं.प.
६५३
२४९४०

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

11 JUN 1986

25 JUN 1986

23 NOV 1986

(क्र. मा. पद्दा)
५०००–३–८४

संदर्भ ग्रं.प्र.
६५३
२७९४०
१५।५।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
६५३
२७९४०
१५।५।८६
ठाणे (महाराष्ट्र)

# परिक्रमा

: लेखक :

श्री. कृष्णा मेणसे

REFBK-0024940

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य सस्कृति
मडळाकडून अनुदान मिळाले आहे

नयना पब्लिकेशन, ठाणे-२

## अर्पण पत्रिका

आम्ही धरित्रीवरचे प्रवासी आम्हाला प्रवासासाठी अष्टदिशा मोकळ्या पण भारतभूमीचा किनारा सोडून दक्षिण ध्रुवाच्या अज्ञात प्रदेशात जाणे सोपे नाही तेथे आमचे संशोधन पथक पोहोचले. त्यांत सहभागी झालेल्या प्रवासी–मित्राना ही परिक्रमा अर्पण !

—लेखक

© कृष्णा मेणसे
' आनदी ' ८०४ मेणसे गल्ली
बेळगाव–५९० ००२

प्रकाशक :
नयना पब्लिकेशन
जी, ५ नटराज सोसायटी
नौपाडा–ठाणे २

मुद्रक :
आर. के. घरत
अंजली प्रिंटर्स, अलिबाग ४०२ २०१
जिल्हा रायगड

किंमत २४ रुपये

# मनोगत....

भारतातल्या बहुतेक सर्व राज्यातून प्रवास करण्याची व तेथील प्रेक्षणीय स्थळे पहाण्याची सधी मला लाभली त्या भागातील जनता, तिचे प्रश्न, तिचा इतिहास जाणून घेण्याचा मी प्रयत्न केला त्याचप्रमाणे मोठमोठे जलविद्युत प्रकल्प पाहिले पश्चिम किनाऱ्याजवळ राहणारा म्हणून अनेक वेळा सागर तिरावर उभे राहून सूर्यास्त पाहिला पण पूर्व समुद्र किनाऱ्यावरून सूर्योदय पहाण्याची कल्पना बराच काळ तशीच राहिली. कोनार्क आणि विशाखापट्टणमच्या प्रवासात ती कल्पना कृतित आली त्यावेळी माझ्या आनदाला पारावार राहिला नाही वेड लावणारा निसर्ग देशभर विपुलतेने भरलेला आहे फक्त तो पहाण्याची दृष्टी हवी एवढेच मी म्हणेन

मी जे पाहिले, जे अनुभवले ते लेख रुपाने वाचकासमोर माडले आहे बेळगावचे लोकप्रिय मराठी दैनिक तरुण भारताच्या रविवारच्या साहित्य पुरवणीत या पुस्तकातले बरेच लेख प्रसिद्ध झाले आहेत अनेक वाचकानी प्रत्यक्ष भेटून आणि पत्राद्वारे लेख आवडल्याचे कळविले आहे त्यामुळेच हे लेख पुस्तक रुपाने प्रसिद्ध व्हावेत असे वाटू लागले महाराष्ट्र राज्य साहित्य सस्कृती मडळाच्या वाङमय प्रकल्प विभागाकडे ते पाठवून दिले व त्याच्या सहकार्यामुळेच हे पुस्तक वाचकाच्या हाती येत आहे मी साहित्य सस्कृती मडळाचा अत्यत आभारी आहे सुप्रसिद्ध साहित्यिक, माझे मार्गदर्शक स्नेही श्री प्र श्री नेरूरकर यानी दिलेल्या प्रोत्साहनामुळे मी लिहू लागलो हे नमूद करण्यास मला आनद वाटतो

वाचकाना प्रवास वर्णनाचा आनद मनसोक्त लाभेल असा मला विश्वास वाटतो

**--कृष्णा मेणसे**

'आनदी'
८०४, मेणसे गल्ली
बेळगाव–५९०००२

# नयना पब्लिकेशनची उत्कृष्ट पुस्तके

## नयना आचार्य लिखित नव्या कादंबऱ्या

१) शिकारीण ५२ रुपये २) खडग्रास ३६ रुपये

**नवी पुस्तके**

१) परिक्रमा (प्रवासी वर्णन) ले. कृष्णा मेणसे २४ रुपये

२) निर्वासित– कवि भाऊ विशे १० रुपये

३) अवशेष (कादंबरी) ले. सुहास उमराणी ४० रुपये

## आमची लोकप्रिय पुस्तके

## नयना आचार्य लिखित कादंबऱ्या

१) बाप बेटा व ती (३२ रुपये)
२) नरोत्तम (३५ रुपये)
३) शहजादी (३५ रुपये)
४) हवाई लग्न (३२ रुपये)
५) सोन्याची सुरी (५० रुपये)
६) अजून वेळ गेली नाही (३४ रु)
७) एक कळी (२४ रुपये)
८) वावटी (३८ रुपये)

भारताचे थोर सुपुत्र व आदर्श विद्यार्थी डॉ चिंतामणराव देशमुख (सी डी) यांचे रसाळ **चरित्र–कृतार्थ जीवन** लेखक । शंकरराव लुगडे M. A B Ed
किंमत १२ रुपये

मेनिनजायटिस, दृष्टीजाणे, मतिमंदत्व, डोक्यात पाणी होणे इ बालकाच्या रोगाची कारणे, इलाज व प्रतिबंधक उपाय सांगणारा संग्राह्य अमोल ग्रंथ–

बालकाच्या मेंदूचा क्षयरोग व जलशीर्ष (३२ रुपये)

लेखक प्रख्यात न्युरोसर्जन – डॉ. पी एस रामाणी

---

**नयना पब्लिकेशन, नौपाडा–ठाणे २**

१

## श्रीनगरच्या शालिमार बागेत :
## मोगल सम्राट जहांगीर

बागेतील कारंजे थुई थुई नाचत होते. गार वाऱ्याची झुळूक अंगावर आली की मन मोहरून जाई. गुलाबाच्या ताटव्यावर नजर स्थिरावत नव्हती. प्रचंड चिनार वृक्षाची गर्द छाया आणि जमिनीवर विस्तीर्ण हिरवळ. माती अशी कोठे दिसतच नव्हती. एका लयीत खळखळाट करीत वरून पाणी येतच होते. बागेत तशी विशेष गर्दी नव्हती. गळ्यात कॅमेरा अडकवून फिरणारे विदेशी जोडपे साऱ्याचे लक्ष वेधून घेत होते. आधाशीपणाने एका मागून एक फोटो घेण्याचे त्याचे काम चालले होते. एका बाजूच्या फांदीवर बसून सुतार पक्षी आपल्या तीक्ष्ण चोचीने घरटे कोरण्याच्या प्रयत्नात होता. निळ्या आकाशात काळे, पांढरे ढग दाटी करू लागले होते. हळू हळू बागेत लोकांची गर्दी वाढत होती. रेशमी माडचाचे पदर सळसळत होते. आपसातील किलबिल वाढत होती. मंद आणि हळुवार पदन्यासाचा ध्वनी कानाला गोड वाटत होता. शहेनशहा मोगल सम्राट जहांगीर बादशहाची ही बाग होती ना! या बागेत असाच शाही थाटात चालले पाहिजे. समोरच्या दाल सरोवरातील पर्वताच्या पडछाया न्याहाळत, तर केव्हा मान दुखेपर्यंत

उच पर्वत शिखरावरील बर्फ न्याहाळत तर कधी पायाखालची गर्द हिरवी गवताची कोवळी पाने न्याहाळत

• • ० ०

आठ दिवस झाले श्रीनगरात येऊन अनेकाच्या गाठीभेटी झाल्या दाल सरोवराच्या बाजूला असलेल्या अती उच टेकडीवर शंकराचार्यांचे देवालय आहे ते पाहून झाले जगप्रसिद्ध हजरत बाल मशिदीत जाऊन आलो सरोवरातला नावाडी कादरशाव याच्याबरोबर राजकारणावर मनसोक्त गप्पा मारल्या त्याच्या मते भुत्तोला फाशी खरोखरच देण्यात आले नाही कारण फाशी देताना कुणी पाहिल्याचा पुरावाच नाही. संजय गांधीच्या विमानाला अपघात करुन कोणी तरी त्याच्या मृत्यूस कारणीभूत झाले आहे, याबद्दल मात्र त्याची बालबाल खात्री आहे शेरे काश्मिर शेख अब्दुल्ला यांचे एका सभेत भाषणही ऐकले बॉबी सिनेमातला तो 'कमरा' दाखविण्यासाठी एका बाटाड्याने दूर चालवत नेऊन एक बंगला दाखविला आणि सांगितले 'बॉबी' सिनेमातले शूटींग येथेच घेतले आहे गम्मत म्हणून जवळ गेलो तर तेथे पोलीस होते इतक्यात वेगाने एक पोलीस जीपही गेटातून बाहेर पडली आणि एका मागून एक मोटार गाड्याची रांक बाहेर येऊ लागली चौकशी केली तेव्हा समजले यणाऱ्या निळ्या प्लायमाऊथ गाडीत राज्यपाल आहेत पोलिसाने सॅल्यूट ठोकताच आमची खात्री पटली पण 'बॉबी' च्या बंगल्यात राज्यपाल कसे या प्रश्नाचे उत्तर मात्र अद्याप सापडले नाही कारण येथील गाईड मुल कोणत्याहि एका डाक बंगल्याकडे हात दाखवून हाच तो बंगला असं ठोकून देतात असा अनुभव इतर ठिकाणीही आला

दुसरे दिवशी चष्मेशाही बाग पाहाण्यासाठी गेलो. रस्त्यापासून खूप दूर उच टेकडीवर चालत जावे लागते पण तेथे पोहोचताच मी तर सारे विसरून गेलो. एका स्वर्गीय दृष्याने मन वेडावून गेले समोर अथांग असा सरोवराचा भाग पसरला आहे. पाठीमागे उचचउच गिरीशिखरांच्या रांका आहेत जवळपास टुमदार बंगली उभी आहे बहुतेक ती पर्यटन विभागाची असावी विविध रंगाच्या गुलाबाचे ताटवे फुललेले आहेत. ओंजळीत मावेल

एवढे मोठे सुंदर व सुगंधीत गुलाबाचे फूल! काश्मिरी गुलाबाबद्दल खूप ऐकले होते, आता प्रत्यक्षच ते फूल पहात होतो. सुवर्णासारख्या पिवळ्या धमक रंगाची फुलं, गडद लाल रंगाची फुले, पांढरी हिमधवल फुलं, फुलेच फुले! थोडे पुढे गेल्यावर इतिहासकाळातील कमान दिसली व त्या पलिकडे थंडगार पाण्याचा अखंड जलप्रवाह चाललेला. तहान नव्हती तरी आम्ही खूप पाणी प्यालो. मोंगल बादशहा शहाजन याने १६३९ साली ही बाग बांधली व तेव्हापासून हा झरा अखंड वहातो आहे. या झऱ्याचे पाणी फार औषधी आहे असे म्हणतात.

श्रीनगरपासून हे ठिकाण बरेच दूर असले तरी आम्ही येथे मोटारने आलो नव्हतो तर दाल सरोवरातील जलमार्गाने येथे येऊन पोहोचलो. येथे होड्यांना शिकारा म्हणतात. आम्ही एक शिकारा भाड्याने घेतला व तब्बल दोन तासाचा प्रवास करीत येथे येऊन पोहोचलो. दाल सरोवरातील जलप्रवास हा एक अपूर्व अनुभव आहे. पाणी अगदी शांत आहे. कोठे एक तरंगसुद्धा उमटलेला दिसत नाही. निळ्या-तांबड्या कमळाच्या वेली चोहोबाजूला पसरल्या आहेत. हाताने आम्ही कमळाच्या पसरट पानावर पाणी उडवीत होतो व त्या पाण्याचे मोती बनून ते तलावात घरंगळत जात. मोठी गम्मत वाटे! शिकाराही चांगला सजवलेला होता. तक्के-लोड होते. पांढऱ्या कापडाचे छत होते. पिवळ्या-हिरव्या रंगाने होडी रंगविलेली होती. शाही थाटात आमचा जलविहार चालला होता. इतक्यात उजवे वळण घेऊन आणखी एक शिकारा आला. त्यात एक पंजाबकडचे युगुल बसले होते. दुसरीकडून आणखी एक शिकारा येऊन पोहोचला. त्यात ताजी फळे भरलेली होती. लाल लाल चेरीचे घोस आम्ही खरेदी केले. आंबट-गोड फळांनी तोंडाला पाणी सुटले. अशा प्रसंगी काव्य सुचले नाही तरच नवल. आमचे चिटणीस गाऊ लागले—

एका हाती मधु गीते ।
हात तुझा अन्य करी ॥
शीळ दिशा वाजविते ।
अन चंद्रकला डोईवरती ॥

तसे पाहिले असता वेळ सायकाळची होती शहेनशाह मोगल सम्राट जहांगीर याना भेटण्यासाठी रात्री ८ ची वेळ मुकर केलेली होती अजून खूप वेळ होता आमच्या शिकाऱ्याजवळ येणाऱ्या काळ्या–पांढऱ्या बदकांच्या थव्यावर पाणी उधळीत आमचा शिकारा डौलात चालला होता न कळत कुसुमाग्रजांचे गीत ओठाबाहेर पडले, ' काढ सखे गळ्यातील चांदण्याचे हात। क्षितीजापलिकडे उभे दिवसाचे दूत ।। चिटणीसापाशी मधूगीताचे पुस्तकही नव्हते आणि माझ्या गळ्यात चांदण्याचे हातही नव्हते पण गाणे गुणगुणताना आम्ही भान हरवून बसलो होतो. आठवल ते गीत गात होतो

चश्मेशाहीचा निरोप घेऊन खाली उतरु लागलो उतरताना आम्ही चालत नव्हतो तर जणू धावतच होतो जसजसे, खाली जाऊ लागलो तसतसे बदलणाऱ्या निसर्ग दृष्याकडे अनिमिष नेत्रानी पहात होतो आठवणीच्या पटलावर सारे कोरुन ठेवण्याचा प्रयत्न करीत होतो सध्याछाया श्रीनगरच्या परिसरात रेंगाळत होत्या इतक्यात बसही येऊन पोहोचली गाडीत विशेष गर्दी नव्हती गाडी हजरत बालच्या दिशेने धावू लागली ही खासगी बस होती उर्दू भाषेत काही काव्यपक्ती गाडीच्या आपल्या भागात लिहीलेल्या होत्या नाहीतर आमच्या गाड्या ! डोकेबाहेर काढू नका, घाण करू नका तिकिटाशिवाय प्रवास करू नका, चिल्लर तपासून घ्या, असेच काही तरी लिहिलेला मजकूर आत प्रवेश करताना उठून दिसतो मला थोडे उर्दू समजत असल्यामुळे मी शेर वाचला प्रसिद्ध कवी इकबालचा तो शेर होता।

जो सायलोसे टकराता है उससे तुफान कहते है ।
जो तुफानोसे टकराता है उससे इन्सान कहते है ।।

जीवन कसे जगावे हे सागणारा केवढा मोठा सिद्धांत कवि इक्बाल या दोन ओळीत सागून गेला आहे आणि रसिकतेने मोटार मालकाने त्या काव्याच्या ओळी गाडीत सुदर अक्षरानी रगवून घेतल्या आहेत माझ्या बाजूच्या जागेवर कौल आडनावाचा एक विद्यार्थी बसला होता त्याला मी ' सायल ' शब्दाचा अर्थ विचारला मला उर्दू येत असल्याचे त्याच्या लक्षात येताच त्याला आनद झाला त्याने सागितले सायल म्हणजे किनाऱ्यावरचे खडक. आमची मैत्री जमली काश्मिरी समाजाची माहिती घेण्यासाठी मी

म्हणालो, 'भाईसाब! तुमच्या सणाबद्दल थोडी माहिती सागाल का?' त्यात काय विशेष, म्हणून त्याने सागायला सुरुवात केली 'आमच्या काश्मिरात जेवढे सण आहेत तेवढे जगात कोठे नसतील! तुम्हाला एक गोष्ट सागतो. आमच्याकडच्या मुली पहा कशा सुदर आहेत कोणालाही आवडाव्यात अशाच त्या आहेत दिल्लीकडचा एक सज्जन येथे रहात होता त्याने एका सुदर काश्मिरी कन्येशी लग्न केले वधु घरी आली पती-पत्नी दोघेच राजा-राणीची छान जोडी जमली होती लग्नानतर दोन-चार दिवसात एक सण आला बायकोने यादी हातात दिली बेसन, घी, रवा, आटा, शक्कर आणि नवे पातळ. कौतुकाने त्याने ताबडतोब सर्व साहित्य आणून दिले आणखी चार दिवसानी पत्नीने पुन्हा यादी दिली- मटन, अंडी, मख्खन बासमती चावल, पातळ बिच्चाऱ्या नवरदेवाने पुन्हा सारे आणून दिले आणखी चार दिवसांनी पत्नीने पुन्हा यादी दिली-मुर्गी, गोश्त, आटा, गड, घी आणि पातळ नवरदेवाने थोडचा नाराजीने हेही आणून दिले पुन्हा चार-पाच दिवसानी पत्नीने पुन्हा यादी देताच नवरदेवाने चक्क सामान बांधले व बायकोला येथेच ठेवून तो दिल्लीला पळून गेला. कांही दिवसानी सासऱ्याने जावयाला पत्र लिहिले तेव्हा उत्तर आले- 'तुमचे सण सपले म्हणजे सागा मी परत यावयास तयार आहे' कौलच्या या गोष्टीवर आम्हा सारेच मनमोकन हसलो! जाता जाता काश्मिरी सणाचीही कल्पना आली गाडी मुक्कामाला आली हस्तांदोलन करुन मी त्याचा निरोप घेतला त्याने विचारले. 'साब! आता कुठे निघालात?'

'मोगल सम्राट जहाँगीर बादशहाशी रात्री ८ वाजता मुलाखत ठरली आहे शालीमार बागेत!' मी म्हणालो त्यावेळी आम्ही सारे दिलखुलास हसलो

आठ वाजायला दीड तास होता एवढ्यात हजरतबाल मशिद पाहून घ्यावी म्हणून तेथे गेलो दाल सरोवराच्या स्वच्छ पाण्यात ही शिल्पाकृती किती शतके आपलेच रूप न्याहाळत बसली आहे कोण जाणे! श्रीनगरात तसे भिकारी नाहीत पण मंदीर असो अगर मसजिद असो, भिकारी हा तेथे असलाच पाहिजे म्हणून येथेही थोडे भिकारी होते शुक्रवारचा दिवस

असल्याने मशिदीला आलेल्या बाया, भिकाऱ्यांना मूठ मूठभर तांदुळ देत होत्या त्यांच्या समोर तांदळाची चांगलीच रास पडली होती उजव्या बाजूने पुढे निघालो भाजलेल्या मासाचा उग्र दर्प नाकात घुसला क्षणभर मी अस्वस्थ झालो पुढे निघालो. वनस्पती औषधे आणि युनानी दवा यांची रस्त्यावरच मांडणी करुन वैद्य बसले होते लोक त्यांच्याशी बोलत होते कुणी दंतवैद्यही दात उपटण्याचे काम करीत होते. शेजारीच फळे काकड्या कलिंगडी, टरबुजे यांचा बाजार मांडलेला होता मोठ्या सुपाएवढ्या भाकऱ्या व तळलेले मासे मुबलक दिसत होते काश्मिरी परोटे, उकडलेले आळसांबे, मूग, वेताच्या टोपल्या, फावडी, कुदळी, विळे, कुऱ्हाडी, दोर सर्वप्रकारचा बाजार मांडला होता सर्वत्र गर्दी होती दाल सरोवरात हातपाय स्वच्छ करुन आम्ही मशीदीत आलो तशी ही वास्तु फार मोठी नाही पण सभोवतालचे मैदान मात्र अतिशय विस्तृत आहे सात–आठ लाख लोक एकाच वेळी नमाज पढू शकतील ! आम्ही आतल्या भागात गेलो अतिशय स्वच्छ आणि हिरवीगार अशी ती जागा होती. हजार दोन हजार स्त्रिया नमाजासाठी जमल्या होत्या दुसऱ्या बाजूला पुरुष होते लाऊड स्पिकरवरून कुराणातील आयते वाचली जात होती येथून अकबराच्या किल्ल्याचे दृष्यही विलोभनिय वाटत होते येथील लोकही साधेभोळे शांत स्वभावाचे अनाथ बालकांसाठी ठेवण्यात आलेल्या फंड पेटीत काही पैसे टाकून आम्ही परत फिरलो काळोख होण्यापूर्वी आम्हाला शालिमार बागेत पोहोचायचे होते

× × X

शालिमार बागतील सौंदर्य न्याहाळात हळूहळू सारा परिसर पाहून घेतला बागेच्या मागील बाजूला घनदाट अरण्य होते देवदार, चिनार सफेदा ही वृक्षराजी विपुल होती खळखळाट करीत निर्झर वहात होते अनंत काळापासून त्याचे वहाणे चालूच आहे सूर्य पृथ्वीने झाकून टाकला काश्मिर खोऱ्यात अहिस्ते अहिस्ते अंधार झाला पण डोळे दिपून टाकणारी रोषणाई बागेत होती आम्ही आरामात आसनस्थ झालो थोड्याच वेळात आमच्या आसपास गर्दी होऊ लागली देशाच्या निरनिराळ्या भागातून

आलेले लोक येथे जमा झाले होते हळू हळू दिवे मंद झाले आणि क्षणभर सर्वत्र काळोखच काळोख ! ज्या सम्राट जहाँगीरची आम्ही आतुरतेने मार्ग-प्रतिक्षा करीत होतो तेच आता येथे येणार होते .

निगाह रखो ! होशियार ! शहेनशाह दिल्लीधिपती मोगल सम्राट जहाँगीर पधार रहे है ! अरण्यात ललकारी उठली पहाडावर मस्त प्रति-ध्वनी निनादला तुताऱ्या, सनई, चौघडा, ढोल, ताशे .. वाद्ये गर्जू लागली. आपली लाडकी महाराणी नूरजहाँला बरोबर घेऊन हत्तीवर स्वार होऊन बादशहा हलत डुलत या ठिकाणी आले येथील स्वर्गीय सौंदर्याने वेडा झालेला जहाँगीर येथेच थांबला त्याने सेनापतीला शामियाने आणि राहुटया ठोकण्याचा आदेश दिला एका सुप्रभाती फिरत असताना त्याने आदेश दिला 'या ठिकाणची वृक्षराजी पाडून टाका, झाडे–झुडपे तोडून टाका, दगड धोंडे बाजूला सारा, या ठिकाणी एक अप्रतिम बाग आम्हाला उभारायची आहे मोजकेच चिनार वृक्ष येथे असतील, मोजकेच देवदार, सफेदा असतील आणि अन्यत्र सर्व ठिकाणी खुशबूदार फुलेच फुले ! झऱ्याच्या पाण्यातून कारंजाचे फवारे उडतील, वेलींना बहर येईल, दुनि येतील सारी फुले या शालिमार बागेत फुललेली असतील !'

सपासप कुऱ्हाडी चालू लागल्या, प्रचंड आक्रोश करीत झाडे कडाकड मोडून पडू लागली हजारो लोक बागेच्या कामाला जुंपले गेले फुलांचे ताटवे फुलले, कारंजे थुई थुई नाचू लागले महाल तयार झाले. रेशमी पडद्यांनी ते सजवले गेले अत्तराचे दिवे महालाची शोभा वाढवू लागले आणि जहाँगिर व नूरजहाँ यांच्या प्रेमाला बहर येऊ लागला संगीताच्या तानांनी बाग मोहरून जाऊ लागली नृत्याचे झंकार उत्तर रात्रीपर्यंत उमटू लागले, उंची मद्याचे पेले रिते होऊ लागले शाही विलासाला रंग येऊ लागला एक गरीब काश्मीरी शायर आपले गीत घेऊन राजाकडे आला आज्ञा होताच ते त्याने मुक्त कंठाने गाउन दाखविले जहाँगीर खुष झाला शाहिराच्या तोंडात मारतील इतके मौल्यवान मोती त्याने त्याला भेट म्हणून दिले कुणा नर्तकीला त्याने कंठा दिला कुणाला शेला दिला आणि बेअदब करणाऱ्याची गर्दनही उडवून दिली

आम्हाला हे सारे दिसत होते आम्ही हे सारे ऐकत होतो सप्त सुरानी झकारणाऱ्या विणेची तार तुटाची आणि सगीताचा बेरग व्हावा त्याप्रमाणे आता पहातो आहोत तर जहागिर आणि नूरजहाँ याचे कडाक्याचे भाषण झाले राजा वेगळ्याच महालात जाऊन बसला मद्याची सुरई आणि पेला याशिवाय त्याने साथीला कोणीही घेतले नाही नूरजहाँ दुसऱ्या महालात तळमळत होती तिने पोटात अन्नाचा कण देखील घेतला नव्हता फुलाचे ताटवे सुकून गेले होते झाडाची पाने गळून पडत होती, सदा खळाळत वहाणारा निर्झर सुकून चालला होता चिनार वृक्षावर गाणारा बुलबुल चोच पखात खुपसून गुमान बसला होता पुष्करणीतली नीलकमले देखील फुलली नव्हती. सारे उदास झाले होते नूरजहाँची दासी पहा कशी दबकत दबकत जहाँगीरच्या महालाकडे सदेश घेऊन चालली आहे तिच्या पायातील पैंजणाचा आवाज कसा अगदी स्पष्ट ऐकू येत आहे ती आता तेथे पोहोचली देखील कुर्निसात करून ती म्हणाली, 'जहापनाह' नूरजहाँ-साहिबाने दोन दिवस झाले, पाण्याच्या थेंबाला स्पर्श केला नाही अन्नाचा कण देखील तिने तोंडात घातला नाही आणि इच्छा असेल तर ती आपल्या महालाकडे आता यावयास उत्सुक आहे नूरजहाँचे नाव दासीच्या तोंडातून निघताच बादशहाने सतापाने हातातील मद्याचा प्याला तिच्या अगावर फेकून दिला तशी ता धावत निघाली पहा ! कशी विद्युत वेगाने ती धावते आहे तिच्या उल्हासीत चेहऱ्याकडे पाहिल्यावर वाटते की हिच्या अगावर आनदाने रोमाच फुलले आहेत ती तडक नूरजहाँच्या महालात शिरली घाई घाईने तिने घडलेले सर्व सागितले दासीच्या अगावर मद्याचा पेला फेकला गेल्यामुळे एक उग्र दर्प उठला होता नूरजहाँ नाराज झाली ती म्हणाली, 'आता कुठली भेट होणार ?' 'तस नाही महाराणीसायबा' बादशहाने मद्याचा पेला फेकून मारला याचा अर्थ तुम्हाला बोलावणे येणारच तसे नसते तर बादशहाने ह्या लवडीची गर्दनच उडविण्याचा हुकूम दिला असता

'तुझ्या तोंडात साखर पडो' नूरजहाँ पुटपुटली आणि काय आश्चर्य ! बादशहाचे सेवक सदेश घेऊन दाखल झाले जहाँगीर–नूरजहाँ

याच्यातला विरह संपला शहनाई पुन्हा बागेत वाजू लागली कोकीळेला पुन्हा कंठ आला, वायुला सुगंध सापडला, नर्गिसचे फूल पुन्हा बहरले, कमळे डवरली, पैंजणातले घुंगरु बोलू लागले नूरजहाँ जहांगीर बादशहाच्या बाहुपाशात विलीन झाली

शालिमार बागेतले दिवे पुन्हा प्रज्ज्वलीत झाले. आसमंत उजळून निघाला प्रकाश आणि संगीताच्या सहाय्याने मोगल सम्राट जहांगीर याची भेट घडवून आणल्याबद्दल संयोजकाचे मनोमन अभिनंदन करीत आम्ही शालीमार बागेचा निरोप घेतला बरीच रात्र होऊन गेली होती

❋ ❋

२ .

# काश्मीर खोऱ्यातील श्रमिकांचे श्रीनगर

जनिहाल खिंडीजवळील प्रचंड बोगद्यातून आमची मोटार जाऊ लागली त्यावेळी अंग शहारून आले लांबच लांब बोगदा ! सर्वत्र काळोखाचे साम्राज्य मधून मधुन पाणी ठिपकत असायचे काश्मीरचे खोरे आणि जम्मू विभाग याना जोडणारा महत्वाचा दुवा म्हणजे हा बोगदा आहे दिवंगत पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यावेळी हा बोगदा पूर्ण करण्यात आला. हजारो कामगारानी रात्रदिवस खपून सुमारे २ मैल लांबीचा भव्य बोगदा तयार केल्यामुळे काश्मीरचे खोरे प्रवासाच्या दृष्टीने अधिक जवळ व सुरक्षित झाले आहे सात मिनीटाच्या बोगद्यातील प्रवासानंतर गाडी ज्यावेळी बाहेर आली त्यावेळी समोरचे दृष्य बघून आमच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. इतकी उंच आणि भव्य गिरीशिखरे मी प्रथमच पहात होतो एका मागे दुसरे, त्यामागे तिसरे शिखर ढगाशी स्पर्धा करीत होते दोन चार तीक्ष्ण वळसे घेऊन, झाडावरून सरसर खाली उतरणाऱ्या खारीप्रमाणे आमची बस खाली दरीत शिरली हिरवागार शेला आणि त्याला पाढऱ्या— काळ्या ढगाची किनार, अक्राळविक्राळ डोंगर माथ्यानी कोरलेली वेलबुटी अशा परपरागत वस्त्रालकारानी विभूषित झालेल्या काश्मीर खोऱ्याने आमचे स्वागत केले. सकाळचे आ ठ वाजत आले होते एका सरदारजीच्या ढाब्यावर चहा घेण्यासाठी आमची गाडी थाबली

सरदारजी आणि बटाटे या दोन वस्तू काश्मीरात कोठेही सदैव आढळतात संख्येने कमी असले तरी त्यांच्या खास पहेरावामुळे भारतात कोठेही असले तरी सरदारजी चटकन नजरेत भरतात नानकसिंग नावाचे सरदारजी आमच्या गाडीत होते सरदारजीबाबत बोलताना ते म्हणाले की आम्ही मंडळी भारतातच काय देशाबाहेर देखील अनेक ठिकाणी जातो आमची संख्या तशी काही जास्त नसते. एक दोन सरदारजी जरी तेथे दिसले तर ते सर्वात उठून दिसतात व 'पहा ! येथेही सरदारजी पोहोचले आहेत' असे लोक बोलताना आढळून येतात सरदारजींची बटाट्याशी तुलना करीत सरदारजी सांगू लागले– पंजाब, काश्मीर, हिमाचलप्रदेश, हरियाना, यु पी कोठेही चला तुम्हाला आलू–मटर, आलू गोबी, आलू–टोमॅटो, आलू–बैंगन, आलू–फ्लावर अशा प्रकारची भाजी मिळेल म्हणजे आलू (बटाटा) हा जसा सर्व प्रकारच्या भाजी मध्ये चालू शकतो त्याप्रमाणे आम्ही सरदारजी कोठेही एकरुप होतो. मग तो मुंबईतील टॅक्सीचा धंदा असो अगर लंडन शहरातला टॅक्सीचा धंदा असो शेरे पंजाब हे दिल्लीतले असो अगर काश्मीरमधील हे ढाबे (रस्त्या-काठचे सरदारजीने चालविलेले हॉटेल) असोत ! ज्या देशात वास्तव्य करून राहू त्या वातावरणाशी तद्रूप होणे आमच्या स्वभावाचाच एक भाग आहे आम्ही इतर कोणत्याही गोष्टीत तडजोड स्विकारली असली तरी पगडी आणि दाढी यात तडजोड स्विकारलेली नाही हे आमचे वैशिष्ट्य आहे

जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आम्ही काश्मीरला गेलो होतो. प्रवाशांनी या महिन्यात येथे मुळीच येऊ नये असे हे दिवस होते आवळ्या-एवढे लहान सफरचंद झाडावर दिसत होते म्हणजे काश्मिरी 'सफरचंद' आम्हाला पहायला देखील मिळाले नाहीत नासमानी, चेरी, आक्रोडची पिकलेली फळे व बरीच सुकी फळे खावयास मिळाली पण प्रथमच चिनार आणि देवदार वृक्षराजींचे दर्शन घडल्यामुळे मला प्रसन्न वाटले ! सर्वत्र हिरवीगार भातशेती पसरली होती खळखळाट करीत ओहळाचे गार पाणी सर्वत्र चालले होते पर्वताची बर्फाच्छादित शिखरे स्पष्ट दिसत होती सकाळची कोवळी किरणे त्यावर चमकत होती शिखराची भव्यता

आणि प्रचडता जागवत होती भारतात जन्माला येऊन हिमालय पाहिला नसता तर एक फार मोठी उणीव राहिली असती काश्मीर खोऱ्यातील हिमालयाच्या दर्शनाने एक प्रकारचे अपूर्व समाधान लाभले रस्त्याच्या दुतर्फा उंच झाडे आणि सर्वत्र नजरेत भरणारी हिरवीगार भात शेते या खोऱ्यातला प्रवास अविस्मरणीय झाला आता आमची गाडी झेलम नदीच्या काठाने पळत होती काठोकाठ तुडुब भरून नदी वहात होती प्रवाह इतका संथ होता की पाणी कोणत्या दिशेने वहात आहे हे समजणे अवघड जात होते यापूर्वी बनिहाल खिंडीच्या मागे बऱ्याच अतरावर चिनाब नदीचे दर्शन लाभले होते खळखळाट करीत व प्रचड वेगाने धावणाऱ्या त्या चिनाब नदीकडे पहाण्याचे धैर्य माझ्याच्याने करवेना ! कारण अतिशय खोल दरीतून ती नदी वहात होती आणि अगदी डोंगर माथ्यावरून आम्ही ती पहात होतो क्षणभर मनात विचार आला... आमची गाडी दरीत घसरली तर काय होईल ? सर्वांना एकदम मोक्ष ! पचनामा करण्यास देखील काही तेथे शिल्लक राहिलेले नसेल इतके रौद्र आणि भयानक दृश्य प्रथमच पहात होतो त्यामानाने बिचारी झेलम अगदीच सुसस्कृत, धष्ट पुष्ट आणि समाधानी !

काश्मीरच्या खोऱ्यातील दोन अडीच तासाच्या प्रवासानतर एक मोठे शहर जवळ येऊ लागल्याच्या खाणाखुणा दिसू लागल्या लष्करी बराकी आणि वहानेही पहायला मिळाली इतक्यात 'श्रीनगर पालिका आपले स्वागत करीत आहे' अशी एक मळकट पाटी वाचली आणि मग खात्री पटली की आम्ही श्रीनगरात आलो आहोत उर्दू आणि इग्रजी पाट्या सर्वत्र आढळल्या श्रीनगरला येण्यापूर्वी आम्ही थडीचा धसका घेतला होता पण येथे येऊन पोहोचेपर्यंत आम्ही उन्हाने हैराण झालो हिल स्टार हॉटेलमध्ये मुक्काम केल्यावर प्रथम गार पाण्याने मनसोक्त आघोळ केली दीर्घ प्रवासाचा शीण हलका झाला अनेक वर्षे स्वप्नभूमि बनून राहिलेल्या श्रीनगरला तर येऊन पोहोचलो आता येथील निसर्गा-बरोबरच या शहरातील नागरिकाशी मैत्री जोडायला हवी काश्मिरी गालीचे आणि शाली पहात असताना विणकर कामगाराशी हितगुज करायचे

पाकिस्तानच्या पहिल्या आक्रमणाच्या वेळी हातात बंदुक घेऊन लढलेल्या बारामुल्ला शहरातील मकबूल शेखानी या थोर देशभक्ताच्या कबरीवर ओंजळभर फुले उधळायची सरहद्दीचे रक्षण करताना धारातिर्थी प्राणापण करणाऱ्या जवानाच्या स्मृतिप्रीत्यर्थ लता मंगेशकरने गायल्याप्रमाणे त्याच्या कुर्बानीची आठवण म्हणून दोन अश्रु गाळायचे असे विचार चटकन मनात येऊन गेले।

सबंध साठ मैलाच्या परिसरात काश्मीरचे खोरे वसले आहे, त्यात मुख्य शहर आहे श्रीनगर गुलमर्ग, सोनमर्ग, पहेलगाम ही मुख्य पर्यटन केंद्रे आहेत डाल सरोवर आणि झेलम नदी यात श्रीनगर बसलेले आहे ३६ किलोमीटर क्षेत्रात पसरलेले हे सरोवर म्हणजे शहराची शान आहे या सरोवराच्या तीरावरच शालिमार बाग, चष्मेशाही, निशातबाग अशी मोंगलकालिन विस्तृत व रम्य उद्याने आहेत एक शिकारा (होडी) भाड्याने घेतली आणि आम्ही जुने श्रीनगर पहायला निघालो डाल सरोवराला जोडणारे अनेक कालवे सर्वत्र पसरलेले आहेत आणि या कालव्याच्या काठावर दोन्ही बाजूला सुंदर घरे बांधलेली आहेत एका घरातून समोरच्या घरी जायचे झाले तर दारात बांधून ठेवलेली होडी घ्यायची व वल्हे मारत दुसऱ्या घरी जायचे हे विलोभनीय दृष्य पाहून आम्ही थक्कच झालो हा विस्तृत कालवा म्हणजे जणू येथील रस्ताच ' व लहान मोठ्या होड्या सतत त्यातून चाललेल्या आम्ही पाहिल्या थोडेसे अंतर कापून गेल्यावर कानाला परिचित असा यंत्रमागाचा आवाज येऊ लागला होडी थांबवून आम्ही तेथे गेलो चांगले गिऱ्हाईक आले अशा भावनेने त्या कारखान्याच्या मालकाने आमचे हार्दिक स्वागत केले एका बैठकीच्या खोलीत तक्क्याला टेकून आम्ही बसलो समोर काश्मीरी शालीचा ढीग पडला होता रेशमी कपड्याचे तागे रॅकेने लावून ठेवलेले होते ट्यूब लाईटने डोळे दीपून जात होते मधाळ जिभेने मालक समोरच्या मालाचे वर्णन करीत होता ५० पासून ५०० रुपयापर्यंतच्या शाली त्याने दाखविल्या अधिक चांगल्या हव्या असतील तर दोन हजार ते पाच हजारापर्यंतच्या देखील शाली त्याने समोर आणून ठेवल्या आम्ही चाट पडलो आमच्याबरोबर भगवान थोरात,

गंगाधर चिटणीस हो टेक्स्टाईल कामगाराचे नेते मडळी असल्याने शालीचा पोत नीट न्याहाळून पहाण्याचे त्याचे काम चालले होते दीड दोनशे रुपयापर्यंतच्या काही शाली विकत घेतल्या आणि आम्ही कारखाना पहाण्याची इच्छा व्यक्त केली त्यावेळी मालकाच्या कपाळाला काहीशा आठ्या पडल्या पण आमच्या आग्रहास्तव त्याने आपला मुनीमजी कारखाना दाखविण्यासाठी आमच्याबरोबर दिला कारखान्याची जागा अपुऱ्या प्रकाशाची व कुबट होती अनेक कामगार मागावर काम करीत होते तुटलेले धागे जोडीत होते धोट्याचा आवाज येत होता कोण कोणाशी बोलत नव्हते. मुकाट्याने काम चालले होते कर्नाटक राज्य सरकारच्या किमान वेतन समितीचा सभासद म्हणून मी माझी ओळख करून देताच मुनीमजी सावधपणे वागू लागले मी कामगा-राच्या पगाराबद्दल चौकशी केली त्यावेळी ते नम्रपणे म्हणजे, 'पगारका मत पुछिये साब ! हमारा मालिक बहुत अच्छा है। अच्छा पगार देता है।' पण किती पगार दिला जातो हे मात्र शेवटपर्यंत त्याने सांगितले नाही !

जुलै महिन्यात येथे दिवस फार मोठा असतो रात्रीचे आठ वाजत आले होते तरी प्रकाश होता डाल सरोवराच्या काठाकाठाने चालतो होतो। पलिकडे शेकडो मोठ्या होड्या (House Boats) पाण्यात तरंगत होत्या तरंगणाऱ्या या मोठ्या होड्यातून रहाण्याची सोय असते बहुतेक बोटीवर 'भाड्याने देणे आहे' अशा पाट्या होत्या कारण या महिन्यात प्रवासी सहसा येत नाहीत बरेच अंतर चालत जाऊन झेलम नदीवरचा पूल ओलांडला दाट वस्तीचा हा भाग धुळीने भरला होता मोटारी, टांगे, रिक्षा सायकली इत्यादि वहानांची खूप गर्दी होती लाल चौकाजवळ ए. आय. टी यू. सी कामगार संघटनेचे कार्यालय होते लाल झेंडा डौलाने फडकत होता आम्ही तेथे पोहोचलो कॉम्रेड वाच्छू वगैरे परिचयाची मंडळी भेटली श्रीनगरमधील श्रमिकांच्या चळवळीबद्दल आमची चर्चा रंगली औद्योगिकदृष्ट्या काश्मीर खोरे तसे मागासलेलेच आहे विणकाम आणि कलाकुसरीचे नक्षीकाम हा येथील मुख्य व्यवसाय आहे बाल कामगारांची संख्याही फार मोठी आहे त्यामुळे मुलांची शाळेत उपस्थिती कमीच

म्हणून शिक्षणाची टक्केवारी काश्मीरमध्ये फारच कमी । येथील सर्वांची भाषा काश्मिरी व शिक्षण उर्दू अति उत्तरेकडच्या लडाख भागात लडाखी भाषा चालते जम्मू-काश्मीरच्या काही भागात डोग्री भाषा बोलली जाते ६५ लाख लोकसंख्या असलेल्या या राज्यात काश्मिरी व उर्दू ही मुख्य भाषा असून बहुसंख्य लोक मुस्लिम धर्माचे आहेत

अलिकडच्या काळात काश्मीर आणि श्रीनगर म्हणजे देशी देशीच्या पर्यटकांचे चैनीचे ठिकाणी बनलेले आहे त्यामुळे उत्तुंग पर्वतराजी, घनदाट अरण्ये, विशाल जलाशये, ऐतिहासिक उद्याने, थंडगार हवा, फळांची विपुलता इत्यादी बद्दलच खूप बोलले जाते काश्मिरी सौंदर्याबद्दल लिहिताना अनेक लेखकांच्या प्रतिभेला उधाण आल्याचेही आपण पहातो मदिरा आणि मदिराक्षी नसतात कोठे ? आणि शोषणाऱ्यांना गवसत नाही असे येथे काय आहे ? पण आमचे लक्ष होते काश्मीर खोऱ्यातल्या भूमिपुत्रांच्याकडे ! श्रीनगरला पोहोचण्यापूर्वी या शहराबद्दल आणि एकदर काश्मीरबद्दल जे ऐकले होते त्यावरून या शहराला कामगार आंदोलनाचा काही एक गौरव शाली वारसा असू शकेल याबद्दल मी साशक होतो मी येथे एक आठवडाच राहिलो आणि येथील श्रमजीवी वर्गाच्या लढ्याचा कानोसा घेतला हिमालय प्रथम पाहिल्यानंतर जेवढा आश्चर्यचकीत झालो त्याहून जास्त येथील कामगार चळवळीचा इतिहास ऐकून मी आश्चर्यचकित झालो.

खूप वर्षांपूर्वी म्हणजे कार्ल मार्क्सने आपला जाहिरनामा प्रसिद्ध केल्यानंतर अवघ्या अठरा वर्षांनी, म्हणजे १८६६ साली याच श्रीनगरात कामगार आंदोलनाने पेट घेतला ' खडबा चळवळ म्हणून ती प्रसिद्ध आहे त्यावेळी श्रीनगरला महाराजा गुलाबसिंग यांचे राज्य होते विणकर, नक्षीकाम करणारे, गालीचे बनविणारे, लाकडावर कोरीव काम करणारे असे हजारो कुशल कामगार वेतन-वाढीचे गाऱ्हाणे घेऊन राजाकडे गेले त्यावेळी त्यांचे म्हणजे कोणी ऐकून तर घेतले नाहीच उलट निदर्शने करणाऱ्या कामगारांवर घोडदळ घालण्यात आले त्यावेळी अनेकजण जखमी झाले अनेकजण ठार झाले अनेकांची धडपकड करण्यात येऊन त्यांना कडी सजा फर्मविण्यात आली असा हा येथील कामगार चळवळीचा वारसा

आहे त्यानंतर १९२५ साली पुन्हा रेशीम व्यवसायातले कामगार संघटीत झाले व त्यांनी आपले आंदोलन उभारले १९३१ साली पुन्हा कामगारांनी उठाव केला त्यावेळी झालेल्या गोळीबारात अनेकजण मृत्युमुखी पडले आज सरकारी रेशीम गिरणी, कारपेट फॅक्टरी, वूलन फॅक्टरी, सिमेंट फॅक्टरी, विटा कौलांचे कारखाने, कांडयाच्या पेट्या बनविणारा कारखाना वगैरे सरकारी आणि खाजगी क्षेत्रातले उद्योगधंदे आहेत एरवी सर्वसाधारण लोकाचा व्यवसाय शेती आणि मेंढ्या पाळणे एवढाच आहे सध्या सर्वात मोठ्या सरकारी क्षेत्रात म्हणजे विद्युत निर्मिती केंद्रात जास्त कर्मचारी आहेत व त्यांची संख्या २८ हजार आहे आणि सरकारची कमाल म्हणजे या २८ हजार विद्युत कर्मचाऱ्यांपैकी २५ हजार कर्मचारी टेंपररी आहेत आपणाला 'कायम' करावे म्हणून त्यांचे जोरदार आंदोलन चालू झालेले आहे

जम्मू-काश्मीर राज्यात पुरेशी वीज तयार होत नाही म्हणून जवळच्या पंजाब राज्यातून या राज्याला विद्युत पुरवठा होत असतो वीज-पुरवठा खात्यात इतर खात्याप्रमाणेच भयंकर लाचलूचपत बोकाळली आहे चोरून वीज वापरणाचे प्रमाण फार मोठे आहे. उधळपट्टीला तर सीमाच नाही । सध्या ३८ पैसे दराने एक युनिट अशी वीज वापरण्यात येते अजून अनेक वीज केंद्रे कार्यान्वित करता येण्यासारखी आहेत पण त्याच्या कामात गती नाही. सारे मोगलाई पद्धतीचे व गलथान काम चाललेले असते शत्रूच्या माऱ्यात अशी ठिकाणे येण्याची शक्यता असल्यामुळे औद्योगिक विकासाला कोणी प्रोत्साहन देताना आढळत नाही त्यामुळ काश्मीर खोऱ्याची अतिशय हेळसाड व अव्हेलना होत आहे अगदी अलिकडे एच एम टी ने घड्याळे बनविण्याचा कारखाना सुरू केला आहे एकदरीत बर्फाच्छादित शिखरे, हिरवीगार कुरणे, घनदाट अरण्ये, विस्तृत जलाशये अशा स्वर्गीय सौंदर्यावर दारिद्र्याचे आणि अज्ञानाचे फार मोठे सावट पडले आहे समाजाचा फार मोठा विभाग आर्थिकदृष्टचा मागासलेला आहे काश्मीर खोऱ्याला जे काय उत्पन्न मिळते ते मुख्यत्व येथे येणाऱ्या असंख्य पर्यटकांकडूनच होय । शिवाय लहान सहान वस्तूसाठी त्याना दिल्ली, पंजाब, हरियाना या राज्यावर

अवलबून रहावे लागते, जम्मू ते श्रीनगर असा पसरलेला राजमार्ग म्हणजे काश्मीर खोऱ्याची प्राणवाहिनी आहे हा मार्ग काही कारणामुळे चार सहा दिवस बद झाला तर मार्केटमध्ये सर्व वस्तुचे भाव एकदम वाढलेले असतात केव्हा वाईट हवामानामुळे विमान वहातुक देखील बद होते त्यामुळे श्रीनगरवासीयाच्या हालअपेष्टात भरच पडते

काश्मीर खोऱ्यात भाताचे पीक चागले येते पण ते अपुरे असल्यामुळे अन्नधान्याची आयात बाहेरुनच करावी लागते भाताची सकरीत बियाणे वापरात असल्यामुळे दोन पिके वर्षाला घेऊन शेतकऱ्यांनी उत्पादनवाढीचा प्रयत्न केला आहे भाताखालोलाल मक्याचे पिक येथे घेतले जाते आणखी एक नजरेत भरण्यासारखे शेतीचे वैशिष्ठ्य म्हणजे डोगराच्या उतरणीवर केली जाणारी शेती डोगराची ही उतरण भयानक वाटते अशा उतरणीवर फक्त एक किवा दोन घरे असतील या घराच्या आसपास उतरणीवर भातशेती करण्यात येते जमीन थोडी नापिक असली तर मका पिकविण्यात येतो अशा शेतीला (टेरेस फॉर्मिग) म्हणतात मुख्यत धनगर मडळी अशी शेती कसतात त्याबरोबरच मेंढ्या, गाई, घोडी अशा प्रकारचे पशुधन त्याच्यापाशी असते शेकडो मैलाच्या परिसरात खोल दऱ्याच्या आणि उतुग पर्वतराजीच्या सान्निध्यात हे लोक कसे राहतात हा प्रश्नच आहे कारण हिवाळ्यात येथे बर्फ पडते व धुक्यात सारे झाकून गेलेले असते आमच्याकडे जसा आम्रवृक्ष अगर औदुबर पवित्र मानला जातो असा ‘चिनार वृक्ष’ येथे मानला जातो सहाजणाच्या कवेत मावणार नाही इतका मोठा बुधा असलेली चिनार झाडे आम्ही येथे पाहिली या झाडाची छाया इतकी गर्द असते की त्या खाली सूर्यकिरण येऊन पोहोचत नाहीत !

आठ दिवस झाले येथे येऊन त्यामुळे श्रीनगरचा निरोप घेणे भागच आहे या अल्पशा काळात कधी शेताच्या बाधावरुन तर कधी घोड्यावरुन पर्वत शिखराच्या मार्गाने, तर कधी डाल सरोवराच्या स्फटिकवत पाण्यात होडीने मनसोक्त भटकलो येथील विद्युत कामगाराच्या मेळाव्यास उपस्थित राहिलो तर कधी गालीचे बनविणाऱ्या कारखान्याच्या परिसरात दिवस

घालविला. एकदा शंकराच्या देवालयात गेलो तशीच हजरतबाल ही ऐति-हासिक मशिदही पाहिली युनोच्या श्रीनगर येथील कार्यालयावरुन चकरा मारल्या तर अनेक वेळा हॉटेलातील बासमती तांदळाच्या चिकन बिऱ्याणी प्रमाणेच सरदारजीच्या ढाब्यावरील परोटेही खाल्ले. ७ जुलैच्या पहाटे आम्ही श्रीनगरचा निरोप घेतला त्यावेळी डाल सरोवरात बदकाच्या रांका तरगत होत्या सुतारपक्षी आपल्या डोक्यावरील तुरा सांभाळत हिरव्या गवतावरील किटक टिपीत होता चिमण्यांचे थवे उडत होते किंग फिशर आपले निळे पंख सावरीत मासे पकडण्यासाठी सूर घेत होता. निळ्याभोर आकाशामुळे सरोवराचे पाणीही निळे निळे झाले होते जवळच्या उंचच उंच डोंगर कड्याची विलोभनीय पडछाया पाण्यात दिसत होती आमची गाडी सुंदर डांबरी सडकेवरुन भरधाव वेगाने पळत होती श्रीनगरचा निरोप घेताना मनात थोडीशी कालवाकालव झाली जुन्या परिचित मित्राचा निरोप घेत असल्या सारखे वाटू लागले कल्पना नाही पुन्हा कधी भेट होईल !

गाडी धावतच होती डोळ्यावर झोप येऊ लागली आणि न कळत डोळे मिटले देखील जागा होऊन पहातो तर तशीच हिरवीगार शेते, तेच ऊंचच उंच देदारवृक्ष तीच आसपासची बर्फाच्छादित शिखरे. एखाद्या चांगल्या पुस्तकाचे कोणतेहा पान उघडावे आणि वाचू लागले तरी ते चांगलेच वाटते त्याप्रमाणे डुलकी संपल्यावर डोळे उघडले तरी पूर्वीसारखेच छान दृष्य ! मी खिडकी उघडली धुक्यासह गार वाऱ्याचा लोट आत आला पुन्हा खिडकी बंद केली बाहेर पाहू लागलो तर काय आश्चर्य ! पापणीवरच्या धुक्यातून इंद्रधनुष्य दिसू लागले डोळ्याची हालचाल न करता ते मी पाहून घेतले आता चढण लागली. पुन्हा खारीच्या चपळाईने आमची गाडी घाटा-तून वर चढत होती बघता बघता आम्ही बनिहाल खिंडीच्या मुखाशी आलो ड्रायव्हरने गाडी थांबविली पाय मोकळे करण्यासाठी सारेजण खाली उतरले मागे वळून पहातो तर काश्मीरचे खोरे स्पष्ट दिसत आहे. डांबरी सडक उन्हात लकाकत आहे हिमालयाची बर्फाच्छादित शिखरे दूरवर दिसत आहेत हात उंचावून मी त्यांचा निरोप घेतला आणि आमची गाडी बनि-हाल खिंडीतील मार्गाने जम्मूकडे निघाली– – –

* *

३.

# दक्षिण कर्नाटकातील परंपरागत नृत्यनाट्य
# यक्षगान

मंगळूरजवळील एक लहानसे खेडे उल्लाळ नेत्रवती नदी होडीतून पार करून आम्ही किनाऱ्यावर उतरलो उजव्या हाताला अफाट अरबी सागर पसरला होता सूर्याची किरणे लाटांवर नृत्य करीत होती डोळे दिपून जात होते सायंकाळ होत आली होती सूर्य पश्चिम क्षितीजाकडे ढळला होता तरी हवेत गारवा मुळीच नव्हता घामाने अंग ओलेचिंब झाले होते पण नेत्रवतीच्या संथ प्रवाहातील गुडघाभर पाण्यात उतरताच गार गार वाटले. आम्ही पुढे निघालो. नारळी पोफळीचा साज लेवून गाव आमच्या स्वागतास तयार होते रस्ता शेतावरच्या बांधाने निघाला होता. लाल मातीची सुंदर नागमोडी पायवाट होती ती दोन्ही बाजूला हिरवीगार भाताची शेते उभी होती पाटाचे पाणी खळाळून वहात होते या भागाला निसर्गाचे जणु वरदानच लाभले होते

गावाच्या वेशीतच एक छोटे उपहारगृह होते माडाच्या झावळ्यांनी ते शाकारले होते तेथे थोडी गर्दी जमली होती उमानाथच्या आमंत्रणावरुन आम्ही या गावात आलो होतो त्या गर्दीत उमानाथ उठून दिसत होता पांढरा शुभ्र सदरा, तशीच खाली पांढरीशुभ्र लुंगी वर्ण अगदी सावळा पण तरतरीत प्रकृतीचा वेताच्या छडीसारखा सडपातळ, उंच उमानाथ आम्हाला पहाताच जणू धावतच आमच्याकडे आला. हातात हात घेऊन हसऱ्या व समाधानयुक्त चेहऱ्याने तो म्हणाला,

तुम्ही आलात खूप आनंद झाला ! आज रात्रीच्या यक्षगानाला आपल्यासारखे रसिक पाहुणे लाभले हे आमचे भाग्य !''

आम्ही पुढे निघालो शाळेची लाल कौलाची इमारत आडवी पसरली होती. समोर विस्तीर्ण पटांगण होते शाळेला लागूनच एक भव्य रंगमंच सजिवण्यात आला होता मागे आकाशी रंगाचा पडदा सोडण्यात आला होता उल्हाळ गावची वस्ती तशी कमी पण आसपासच्या गावातून शेकडो लोक यक्षगानासाठी येथे येऊ लागले होते जशी रात्र होऊ लागली तशी गर्दी वाढू लागली दक्षिण कर्नाटकाचे मान्यवर लेखक श्री शिवराम कारंथ यांनी 'यक्षगान' नृत्यनाट्यावर खूप लिहिले आहे व माझ्या वाचनातही त्यापैकी काही आले असल्याने 'यक्ष गान' कार्यक्रमास मुद्दामच हजर राहण्याचे ठरवून मी मंगळूरहून या खेड्यात आलो होतो शाळेच्याच एक खोलीत कॉफी पानाचा कार्यक्रम झाला कडवट-गोड कॉफी भागातील कॉफीला एक वेगळीच चव आहे चहा मात्र आपल्या सारखा वाटत नाही रंग रुची याबाबतीत तो कॉफीसारखाच वाटतो

यक्षगानाचा कार्यक्रम जरी रात्री उशीरा सुरु होणार असला तरी त्यात भाग घेणाऱ्या कलावंतांना सायंकाळपासूनच ग्रीनरूममध्ये हजर रहावे लागते मंडपाला लागूनच असलेल्या शाळेच्या एका खोलीत यक्षगानातली मंडळी जमली होती व त्यांची रंगभूषा तेथे चालू होती हे दृश्य पहाण्यात एक वेगळाच आनंद असतो उमानाथला बरोबर घेऊन मी तेथे गेलो पहातो तर त्यांचे मास्तर 'भीमा'ला उताणे पाडून चक्क त्याच्या छातीवर बसले आहेत व हळूवार-पणे त्याच्या गालावर काळ्या रंगाने मिशा रंगवीत आहेत, अर्जुनाचे केस पाठीवर रुळत आहेत, आणि तो पायात बांधलेले चाळ मधून मधून वाजवून पहात आहे मधूनच पेटीवर सूर धरला जात असून यक्षगानातील नांदीची तान कोणीतरी घेत आहे रंगावलेल्या चेहऱ्याचे एक दोनजण कोपऱ्यात बसून विड्या पीत आहेत सारे अस्ताव्यस्त पसरलेले प्रत्येकजण आपापल्या परीने नटण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांचा गुरु त्यांना सहाय्य करीत आहे खोलीतच एक देवाची मूर्तीही पुजण्यात आली आहे मोगरीची टपोरी फुले

आणि अबोलीची फुले यांची गुंफण केलेल्या माळांनी देवाला गुरफटून टाकण्यात आले आहे फुलाचा उदबत्तीचा वास खोलीत भरुन राहिला आहे तुळू भाषेत गोंगाटही चालला आहे धावपळही होत आहे कमरेवर हात ठवून कुतूहलाने मी सारे पहात राहिलो 'करोन तो पूर्व' हे ऐतिहासिक नाटक करणाऱ्या मडळीचीही अशीच अवस्था होते हे मी पाहिलेले आहे

केळीच्या लाबझोक हिरव्यागार पानावर गरम गरम भाताचा ढीग येऊन पडला आणि मी पहातच राहिलो लोणचे, पापड भोपळ्याची आणि काकडीची भाजी होतीच, स्टेनलेसच्या छोटया बादलीतून सांबार कोणीतरी आणले आणि पानातील भातावर ओतून दिले या भागात आल्यानतर सव्याटून भातावर नाव मारायचा असतो हे मला माहित होते, सकोच न करता रिवाजाप्रमाणे मी पोटभर भात खाल्ला आणि त्यानतर पानावर 'पायसम्' वाढण्यात आले मी एक प्रकारची खीर असते शिज-वलेल्या हरभाऱ्याच्या डाळीत गूळ घालून त्याची केलेली पातळ खीर म्हणज येथे एक पक्वान्नच आहे खीरीतील वेलदोडयाच्या सुवासाने मोहित होऊन मी थोडी खीर खाल्ली यक्षगानासाठी रात्र जागायची असल्याने जेवणाकडे तसे माझे लक्ष नव्हतेच

आता मडपासमोर गर्दी जमू लागली स्त्रियाही खूप मोठया सख्येने आल्या येताना त्यानी कडेवरुन मुले आणली अनेकजणींच्या काखेत चटई होती मुले झोपली तर त्याना चटईवर झोपवून द्यायचे आणि फारच झोप आली तर आपणही थोडावेळ चटईवर अग टाकावे या दूरदृष्टीने बहुतेक जणींनी सोबत चटई आणली होती तासाभरात पटांगण प्रेक्षकानी फुलून गेले. या गावात इतकी माणसे आली कुठून असा सभ्रम पडावा इतकी ती गर्दी होती• थोडया अंतरावर एक दोन कॉफीची आणि विडी सिगरेटची दुकानेही उघडण्यात आली होती भणभणत्या चिमणीच्या प्रकाशात भूई-मुगच्या शेंगा घेऊन एक म्हातारी बसली होती मुलांची तेथे गर्दी होती.

रात्रीचे अकरा वाजून गेले होते त्यावेळी रगमचावर देवाची मूर्ति घेऊन काहीजणानी प्रवेश केला व पूजेला आरभ झाला. एकाच तालावर एकजण गात होता बाकीचे त्याला साथ देत होते प्रथम हा सूर छान वाटला पण बराच वेळ ते स्तवन ऐकावे लागल्याने प्रेक्षक कटाळू लागले

काहीजणाना जाभया येऊ लागल्या त्यानतर लग्नात भटजीनी अतरपट धरावा त्याप्रमाणे प्रेक्षकाना समोर येईल असा पडदा हातात धरुन दोघेजण दोन बाजूला उभे राहिले मागून नाटकातले एक पात्र पुढे आले व पायातील घुगुराच्या तालावर पदन्यास सुरु झाला त्यावेळी गाणेही चालूच होते नृत्य लयीत येताच पडदा दूर करण्यात आला आणि प्रेक्षकाना नाचणाऱ्याचा परिचय करून देण्यात आला त्यावेळी पात्राने पुन्हा थोडे नृत्य केले आणि सर्वांना लवून अभिवादन केले मग देवाला नमस्कार करून ते पात्र निघून गेले. अशा प्रकारे दहा बाराजणाचा परिचय याच पद्धतीने करून देण्यात आला पात्रपरिचयाच्या या आगळ्या पद्धतीमुळे सादरकर्त्यांची कल्पकता दिसून आली 'नमनालाच घडाभर तेल' अशी आपल्याकडे एक म्हण आहे म्हणजे प्रत्यक्षात यक्षगानाचा पत्ताच नाही पण याउलट यक्षगानाच्या अगोदरच एवढे प्रकार झाले की प्रत्यक्ष यक्षगानान ज्यावेळी सुरु झाले त्यावेळी रात्रीचे साडेबारा वाजून गेले होते

रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यानी भारतातील शेकडो लेखक, कवी, कादबरीकार व नाटककार याना कथानक पुरवले आहे कालिदासापासून ग दि माडगूळकरापर्यंत अनेकानी या महाकाव्यावर नाटके रचली व काव्यनिर्मिती केली. मग यक्षगान त्याला अपवाद कसे असणार ? मी पाहिलेल्या या यक्षगानाचे कथानक महाभारतातील होते

स्वार नसलेला एक घोडा मोठ्या दिमाखात चौखूर उधळत रगमचावर येतो त्याला पहाताच त्याला अडविण्याची हिम्मत कोणी करू शकेल असे वाटत नाही तो घोडा सतत दुडक्या चालीवर न चत आसतो घोड्याभोवती खाद्यावर धनुष्य घेतलेले सैनिक असतात काहीजण गदाधारी असतात क्वचित कोणापाशी तलवारही असते अर्थात हा अश्वमेघ यज्ञातील अर्जुनाचा घोडा असतो त्याला कोण रोखणार ? निर्विघ्नपणे तो सचार करीत करीत कामरुप देशात येऊन पोहोचतो आणि काय आश्चर्य ! स्त्री राज्य असलेल्या या देशातील स्त्री सैनिक हा घोडा अडवितात आणि राणीच्या महालासमोरील वृक्षाला बाधून घालतात उपस्थित प्रेक्षकगण टाळ्याचा प्रचड कडकडाट करून साथ देतो विशेषत महिलाच्या बाजूने टाळ्याचा अधिक कडकडाट एकू येतो हे सागायलाच नको घोड्याचे चार

पाय दाखविण्यासाठी दोन मुलानी ओणवे होऊन एकमेकाची कबर पकडली होती व घोड्याचे तोंड असलेली पाढरी शुभ्र चादर पाघरून घोड्याचे सोंग कमालीचे चागले वठविले होते कामरूप देशातील स्त्री-सैनिक घोड्याचा कान आणि आयाळ पकडून जेव्हा त्याला झाडाला बाधतात त्यावेळी उधळ-लेला घोडा कसा सुतासारखा नरम होतो हा अभिनय वाखाणण्यासारखा होता हे दृष्य प्रेक्षकात हास्यरस उधळून देत होते.

अर्जुनाला जेंव्हा त्याचे सैनिक हा वृत्तात कथन करतात त्यावेळी सतापाने बेभान होऊन अर्जुन थयथयाट करतो. दणकेबाज स्वरात बराच वेळ गाणे म्हणतो, मधून मधून नृत्य करतो यक्षगानातील गीताचा पूर्ण अर्थ समजणे मला शक्य नव्हते, कारण तुळू भाषेची मोठी छाप या भागा-तील कन्नड भाषेवर पडलेली आहे नृत्य मात्र पराक्रमी अर्जुनाला शोभण्या-सारखे होते ! अर्जुनाबरोबर त्याचा एक मित्र असतो तो मोठा हुशार आणि विनोदी असतो रगमचकावर त्याने नुसता प्रवेश करताच लोक पोट धर धरून हसत आणि टाळ्या पिटून त्याला प्रोत्साहन देत. यावरून या कलावताच्या अगी असलेल्या विनोद-चातुर्याचे कौतुक वाटले तो अर्जुनाला म्हणतो

'अर्जुना ' आता बाका प्रसग उद्भवला आहे '

' प्रसग बाका कसला ? होऊन जाऊ दे युद्ध !'

' पण युद्ध कोणाशी होणार आहे माहित आहे का ?

' द्रोणाचार्यांचा पराक्रमी शिष्य अर्जुन त्याच्याशी दोन हात करण्याची हिम्मत कोणात आहे ते तरी पहातो !'

' तेच तर सागण्यासाठी मी धावत येथे आलो आहे अश्वमेधाचा घोडा अडविणारी या कामरूप देशाची एक राणी आहे युद्धच करायचे झाले तर तुला तिच्याशी करावे लागेल '

अर्जुन मुग्ध झाला पुन्हा त्याने मनसोक्त नृत्य केले पण लय जमत नव्हती .. ताल चुकत होता एका स्त्रीशी युद्ध . या विचाराने अर्जुन हैराण झाला पण घोडा तर सोडवून घेतला पाहिजे. त्याला काही सुचत नव्हते अखेर त्याने मनाशी निर्णय घेतला स्त्री असली म्हणून काय झाले? मला लढून घोड्याची सुटका ही केलीच पाहिजे धनुर्विद्येत जगतश्रेष्ठ

ठरलेला अर्जुन एका स्त्रीशी युद्ध करणार हे ऐकून त्याचा मित्र मोठ-मोठ्याने हसत सुटला गाणे म्हणून आणि नृत्य करुन त्याने धमाल उडवून दिली शेवटी तो अर्जुनाच्या खांद्यावर हात ठेवून प्रेमळपणे म्हणाला

मित्रा अर्जुना ! समज तू युद्धास सज्ज झालास आणि ती राणीही तयार झाली तुम्हा दोघांचे घनघोर युद्ध जुपले आणि अखेरीस युद्धात त्या सुकोमल राणीचा पराभव झाला तर जग काय म्हणेल ? जग म्हणेल या महापराक्रमी अर्जुनाने काय पराक्रम केला ? तर युद्धात एका महिलेस हरविले यामुळे जगात तुझी नाचक्को होईल. आणि क्षणभर समज की युद्धात तुझा राणीने सपशेल पराभव केला तर जन काय करील ? तुझ्या पराभवावर हसू लागेल आणि तुझी कीर्ति कलंकीत होईल तेव्हा घाईने कोणताही निर्णय घेऊ नकोस, प्रथम मी त्या राणीला भेटून येतो. मग आपण पुढचे ठरवू '

अर्जुनाला हा मित्रत्वाचा सल्ला पटतो व संभ्रमात पडलेल्या अर्जु-नाचा हात हातात घेऊन त्याचा मित्र निघून जातो पडदा पडतो शेकडो हात टाळ्यांचा कडकडाट करतात मी घड्याळात पहातो त्यावेळी रात्रीचे सव्वातीन वाजलेले असतात झोप कोणाच्याही डोळ्यावर बिल्कूल दिसत नसते

थोड्या वेळाने गाणे सुरू होते चाल तीच पूर्वी ऐकलेली अतिशय कंटाळवाणी वाद्ये तीच इतक्यात कामरुप देशाची राणी मोठ्या थाटात येऊन रंगमंचावर नृत्य आरंभते तिच्या गाण्यातून आणि नृत्यातून आनं-दाच्या ऊर्मी हेलावत असतात कारण तिने अर्जुनाचा अश्व अडविलेला असतो आणि युद्ध करून अश्व नेण्यासाठी अद्याप तरी अर्जुन आलेला नसतो. इतक्यात अर्जुनाचा मित्र प्रवेश करतो महाराणीला साष्टांग नम-स्कार घालून आपण अर्जुनाकडून वाटाघाटीसाठी आलो असल्याचे निवेदन करतो राणी खूष होते. खूप नाचते मी पाहिलेल्या यक्षगानात स्त्रीची भूमिका पुरुषानीच केली होती. येथे देखील राणीची भूमिका करणारा तरुण प्रकृतीने अर्जुनापेक्षा काकणभर सरसच होता अश्वमेध यज्ञाचा घोडा अडविणारी राणी अशीच असली पाहिजे नाही ? अर्जुनाच्या पराक्रमाचे गोडवे त्याचा मित्र राणीसमोर खूप गातो पण राणी बधायला तयार नसते

ती म्हणते, आम्ही घोडा पकडून बांधून ठेवलेला आहे अर्जुनाने लढाई करून तो घेऊन जावा पण अर्जुनाच्या मित्राला लढाई तर नको असते येथे शिष्टाईसाठी कृष्ण नसतो ते काम अर्जुनाच्या मित्रावरच येऊन पडते शेवटी लढाईशिवाय कोणतीही अट मान्य करण्यास अर्जुन तयार असल्याचे मित्र सांगतो त्यावेळी राणी विजयी मुद्रेने हाती धनुष्य घेऊन सुंदर नृत्य करते आणि शेवटी म्हणते

हे पहा ! अर्जुन महापराक्रमी आहे हे मला माहित आहे त्याने युद्धात माझा पराभव करावा किंवा माझ्याकडून पराभव स्वीकारावा हे मलाही योग्य वाटत नाही तेव्हा तुझा अर्जुन जर माझ्याशी लग्न करण्यास तयार असेल तरच मी त्याला अश्व परत देईन. नाही तर जे व्हायचे त होऊन जाऊ दे !'

राणीच्या या उद्‌गारावर अर्जुनाच्या मित्राला काय बोलावे हेच समजत नाही तो गोंधळून जातो. पण विचाराती तो राणीची अट मान्य करतो पुन्हा तसलेच गाणे त्याच सुरात चालू होते

चित्राङ्कात झालेला अर्जुन उभा असतो इतक्यात त्याचा मित्र येतो. राणीबरोबर झालेली चर्चा ऐकण्यास अर्जुन उत्सुक असतो तो गंभीरपणे सारी हकिकत कथन करतो लग्न करणे अर्जुनाला मुळीच मान्य नसते कारण द्रौपदीवर त्याचे नितांत प्रेम असते पण पुढील अनिष्ट प्रसंग टाळ-ण्यासाठी अर्जुन लग्नास तयार होतो थाटामाटात दोघांचे लग्न होते शंख फुंकले जातात. वाद्ये वाजतात कामरूप देशाच्या स्त्री राज्यात आनंदी आनंद पसरतो लग्नानंतरची पहिली 'सुहाग रात' येते वस्त्रालंकारांनी नटलेली राणी हातात फळांचे तबक घेऊन अर्जुनाच्या महालात प्रवेश करते अर्जुनाचे पाय लटपटू लागतात त्याच्या घशाला कोरड पडते अंगाला कंप सुटतो खांद्यावरचा रेशमी शेला गळून पडतो काय करावे हे त्याला सम जत नाही यावेळी प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचलेली असते शेवटी अर्जुन राणीला थांबायला सांगून मित्राला हाका मारीत महालाबाहेर पळून जातो धापा टाकीत तो मित्राजवळ पोहोचतो व सारा वृत्तांत त्याला सांगतो अर्जुनाची ही स्थिती पाहून मित्राला हसावे की रडावे हेच समजेना होते. तो म्हणतो

'अर्जुना! तू किती साधा आणि सरळ आहेस यात घाबरण्यासारखे काय आहे? राणीला सांग की तू सध्या व्रतधारी आहेस सहा महिन्यापर्यंत तुला कोणत्याही स्त्रीचा स्विकार करता येत नाही मग ती त्याची विधिवत पत्नी जरी असली तरी!'

मित्राच्या त्या सल्ल्याने अर्जुनाला नवे अवसान प्राप्त होते व पुन्हा महालात येऊन तो राणीची समजूत घालतो व सहा महिन्यानी तिचा स्विकार करण्यासाठी पुन्हा येथें येण्याचे आश्वासन देतो राणीची घोर निराशा होते पण स्विकारलेल्या पतीचे म्हणणे तिला मानावेच लागते. अशा प्रकारे अर्जून या जंजाळातून मोकळा होतो व झाडाला बांधलेला घोडा सोडून घेऊन तो निघून जातो, पुन्हा घोडा चौखूर उधळू लागतो सैनिक मागून धावत सुटतात आणि येथेच यक्षगानाचा कार्यक्रम समाप्त होतो

सकाळचा मंद वारा वाहू लागतो झाडावरच्या पक्षीगणाना जाग येत असते यक्षगानातली शेवटची आरती होत असताना पूर्व दिशा लाल होऊन सूर्याची कोवळी किरणे धरतीवर उतरत असतात पश्चिम सागर गभीरपणे भान हरपून यक्षगान अजूनही ऐकत असतो! –

❋

४

# विशाखापट्टणम : भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील मानबिंदू

विशाखापट्टणमला जाण्यासाठी म्हणून त्याच्या मार्गावर असलेल्या मद्रास शहराच्या स्टेशनवर भल्या पहाटे येऊन पोहोचलो २९ वर्षानंतर मी मद्रासला येत होतो त्यामुळे खूपच फरक दिसत होता पूर्वीचे स्टेशन पार बदलून गेले होते. स्टेशनवर इतस्तत नजर टाकताच या शहराचे बहुरंगी व बहुढंगी स्वरुप नजरेत भरले स्वच्छ व सुंदर स्टेशन आतच उत्तम रेस्टॉरंट इडली, डोसा, वडे, कॉफी यांच्या वासाने भूक चाळवली गेली आणि सकाळची न्याहरी स्टेशनवरच आटोपली दुपारी ३ वाजेपर्यंत गाडी नसल्यामुळे खूप वेळ होता माझे स्नेही सोमसुंदर शर्मा याना बरोबर घेऊन रिक्षाने प्रथम समुद्र दर्शनाला निघालो मद्राससारखा भव्य आणि विस्तृत समुद्र किनारा फारच थोडया शहरांना लाभला असेल. पूर्वी आलो होतो त्यावेळी माणसाने ओढायच्या रिक्षा होत्या माणसाने माणसाला बसवून ओढत न्यावयाचे ही कल्पनाच मला त्यावेळी असह्य वाटत होती मला आठवतं– आमच्याकडे सामान खूप होते व ते आम्ही रिक्षात ठेवून दिले रिक्षेवाल्याच्या सूचनेवरून त्या सामानावरच तळ ठोकला आणि काळा सावळा रिक्षेवाला अगदी बळ पणाला लावून हाताने रिक्षा ओढू लागला. क्षणभरात तो घामाने भिजून चिंब झाला त्याने विश्रांतीसाठी क्षणभर रिक्षा थांबवली. कमरेच्या रुमालाने घाम टिपला आणि आणखी एकाला मदतीला घेऊन त्याने पुन्हा रिक्षा ओढावयास प्रारंभ केला .. आता सायकल रिक्षा आल्या आहेत व ॲटोरिक्षा आणि टॅक्सी देखील आहेत

. सकाळची वेळ असल्याने तशी रस्त्यावर फार गर्दी नव्हती दोन चार वळणे घेऊन ॲटोरिक्षा समुद्र किनाऱ्याजवळ आली पूर्व क्षितीजापर्यंत पसरलेले सागराचे पाणी पाहून मन आनंदाने नाचू लागले. फेसाळ लाटा दुरून देखील स्पष्ट दिसत होत्या. या शहरात आल्यानंतर प्रथम दिवंगत नेते अण्णा दुराई यांच्या स्मारकाला अभिवादन करणे कर्तव्य वाटले इतका लोकप्रिय नेता क्वचितच झाला असेल ! स्मारकाची जागा विस्तृत आणि शांत होती. चोहोबाजूला हिरवळ होती हत्तीच्या सुळ्याची शिल्पाकृती बनवून कमान करण्यात आली होती आणि आत प्रवेश करताच सागराच्या पार्श्वभूमीवर अण्णा दुराईंचे भव्य स्मारक उभे असलेले पाहिले त्या लोकप्रिय नेत्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ तेथे अमर ज्योत पेटविण्यात आलेली आहे Here lies the noble heart which can bear anything ' अशी अक्षरे कोरलेली होती स्मारकासमोर नतमस्तक होऊन पुढे निघालो समुद्राला समांतर असा छान रस्ता आहे ठिकठिकाणी तामीळ कवींचे प्रचंड पुतळे उभे होते साहित्यिक, विद्वान राजकारणी, समाजसुधारक यांच्या सन्मानार्थ त्यांचे पुतळे उभारलेले पाहिले आणि शिवाजी पार्कच्या पूर्वेकडील प्रवेशद्वारात कै राम गणेश गडकरी यांचा अर्धपुतळा पाहिल्याचे आठवले तुलनेने तो केवढा लहान वाटत होता. मुंबई चौपाटी वरील लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याचीही आठवण झाली. थोडे पुढे गेल्यावर दीपगृह त्यानंतर थिऑसॉफिकल लॉजची प्रचंड लायब्ररी व उद्यान त्यापुढे मद्रासमधील जगप्रसिद्ध सर्पोद्यान, कामराज व महात्मा-गांधी यांचे स्मारक अशी अनेक प्रेक्षणिय स्थळे पाहिली आणि माऊंट रोडने पुन्हा स्टेशनकडे आलो त्यावेळी ऊन जाणवू लागले, घाम निथळू लागला ओझरते का होईना मद्रासचे दर्शन घडले मद्रदेशीय अस्मिता घेऊन हे राज्य पुढे चालले आहे शहराच्या मध्यभागी रामस्वामीचा भव्य पुतळा पाहिला त्याच्या गळ्यात कोणी तरी ताज्या फुलांची माळ घातली होती हे रामस्वामी संपूर्ण निरिश्वरवादी देवाशी आणि विशेषत रामायणाशी त्यांचा उभा दावा देवादिकांच्या गळ्यात जोड्यांची माळ घालून लाखो अनुयायांसह ते मिरवणुकी काढत ' Do not think of God, think of Man ' हा त्यांचा उपदेश असायचा स्टेशनशेजारीच मद्रास कार्पोरेश-

नची १९१३ साली बांधलेली भव्य इमारत डौलाने उभी आहे ब्रिटीश गेले तरी त्याच्या वास्तुशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना या इमारतीच्या रुपाने आजही मद्रास शहरात उभा आहे उद्योगधंदे, शिक्षण, पाणीपुरवठा वीज या बाबतीत मद्रासने प्रगती केली असली तरी देशात असलेले परपरा-गत दारिद्र्य आणि बेकारी येथेही दिसून येतेच

दुपारी तीनच्या सुमारास गाडीने मद्रास स्टेशनचा निरोप घेतला आता आमचा प्रवास भारताच्या पूर्व किनाऱ्याने सुरू झाला पश्चिम किनाऱ्या लगतच सपाट भूभाग लागतो त्याला समुद्रपट्टी म्हणतात वीस पचवीस मैल रुदीची ही समुद्रपट्टी सपली म्हणजे डोंगरपट्टी सुरू होते म्हणजे घाट लागतात काही ठिकाणी समुद्र किनाऱ्यालाच डोंगर लागलेला असतो पण पूर्वेकडची स्थिती वेगळीच आहे सागर किनाऱ्याला डोंगर जवळ जवळ नाहीत । त्यामुळे शेकडो मैलाच्या परिसराचे केवळ सपाट प्रदेश आहे. भात पिकाने तो समृद्ध झालेला आढळला किती तरी तास गाडी या प्रदेशातून धावत होती पोपटी रंगाची भात शेते मनात साठवत होती रेल्वे मार्गाशेजारी अनेक लहान मोठे तलाव पाहिले लालबुंद कमळे, निळी कमळे, पांढरी कमळे अशी अनेक रंगाची कमळ फुले दिसत होती आंध्राचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल अशी ताडाची झाडे सर्वत्र होती कोकणात जशी माडाची झाडे आहेत तशी येथे ताडाची अनेक झाडे सर्वत्र आढळतात

कशासाठी कोण जाणे । एका छोट्या स्टेशनवर गाडी बराच वेळ खोळंबून होती प्रवासाने अंग ठणकत होते ताजे पेरु विकण्यास आले होते डाळिंबे आणि पेरु पाहिल्यावर मला कृष्णाकाठच्या या फळांची आठवण झाली चौकशी करता ही फळे कृष्णा काठचीच म्हणून समजले कृष्णा नदी मागे गेली होती आणि आता गोदावरी येणार होती कृष्णा आणि गोदावरी या दोन नद्यांनी आंध्रला समृद्ध बनविले आहे त्र्यंबकेश्वरजवळ असलेला गोदावरीचा उगम मी पाहिला आहे आता आमची गाडी गोदावरी नदीवरील लांबच लांब पुलावरुन चालली आहे किती भव्य आणि विशाल पात्र येथे नदीला लाभले आहे अलाहाबाद शहराजवळील गंगेचे पात्र देखील असेच विशाल । येथे गोदावरी

नदी समुद्राला मिळण्यासाठी कशी जलभाराने पुष्ठ होऊन गजगतीने चालते आहे शिडांच्या नावा नदीत डोलत आहेत काही नावाडी वल्हे मारीत नाव पैलतीरावर नेत आहेत चोहोबाजूला भाताची शेती कृष्णा गोदेच्या दुआबात समृद्धी ओसडून जात आहे घाटावर महिलानी गर्दी केली आहे. त्यांचे धुणे सकाळीच सुरू झाले आहे आता 'गोदावरी स्टेशनच आले पुढचे राजमहेंद्री. काळचा दाट धुराचे लोट आकाशात सोडीत गाडी राजमहेंद्रीत आली बिबाच्या झाडावरचे पोपटांचे थवे आकाशात गेले अर्धीअधिक गाडी येथेच रिती झाली थोडी माणसे चढली पोहोचावयाला आलेल्यानी हात उचावून निरोप दिले आणि गाडी विशाखापट्टमकडे निघाली. दोन्ही बाजूना भातशेती वादळी वाऱ्याने काही ठिकाणचे भाताचे पीक भुईसपाट झाले होते खळबळ करीत पाटाचे पाणी सर्वत्र सचार करीत होते नागार्जुन सागराचे पाणी कालवे काढून सर्वत्र खेळविण्यात आल्यामुळे भारतातील 'तादळाचे आगर ' असा लौकिक आध्र प्रदेशाने मिळविला आहे काही ठिकाणी भाताची कापणी देखील चाललेली पाहिली साठ--सत्तर मजुर कामाला लागलेले होते

शेतातून गोल टुमदार झोपड्या दिसत होत्या गुरासाठी देखील गोल झोपड्या तयार करण्यात आलेल्या होत्या धष्टपुष्ठ गाई-म्हशी चरताना दिसत उघड्या अगाचे शेतकरीही सर्वत्र दिसत कमरेला अर्धी लुगी आणि डोक्याला गुडाळलेले टॉवेल !

वालटेर स्टेशन येत असल्याची चाहूल लागली आणि आम्ही आमचे सामान आवरले विशाखापट्टणम्साठी याच स्टेशनावर उतरायचे असते. लाल शर्ट आणि खाकी विजार घातलेले 'आयटक ' चे स्वयसेवक आमच्या स्वागतासाठी स्टेशनवर आलेले होतेच बाहेर ट्रक होता आम्ही सुमारे शभरजण या ट्रकने येथून जवळच म्हणजे २० किलोमिटर अतरावर असलेल्या सिहाचलम या देवस्थानाच्या ठिकाणी वस्तीसाठी गेलो होतो महाराष्ट्र, कर्नाटक, गोमतक, पजाब, केरळ अशा राज्यातून आलेले सुमारे हजार प्रतिनिधी सिंहाचलम देवस्थानच्या अतिथीगृहात उतरले होते उत्तर प्रदेश, बिहार, बगाल, मध्यप्रदेश इत्यादिची वेगळी व्यवस्था करण्यात आली होती देशाच्या कानाकोपऱ्यातून सुमारे ३ हजार प्रतिनिधी

आले होते त्याचप्रमाण व्हिएतनाम, कापुचिया, अफगाणिस्तान, रशिया, गणतंत्र, जर्मनी, झेकोस्लाबाकिया, मंगोलिया, व दूर आस्ट्रेलियाहून देखील बंधुप्रतिनिधी आले होते बांगला देशातील कामगार प्रतिनिधीही उपस्थित होता.

'आयटक' कामगार संघटनेला ६० वर्षांचा गौरवशाली इतिहास लाभला आहे ३१ ऑक्टोबर १९२० रोजी स्वर्गीय लाला लजपतराय या नेत्याने या कामगार संघटनेची स्थापना केली सुभाषचंद्र बोस, पं जवाहरलाल नेहरू, व्ही व्ही गिरी इत्यादि नामवंत नेत्यांनी या कामगार संघटनेचे अध्यक्षपद भूषविले होते पहिल्या परिषदेला कॉ डांगे–मिरजकर स्वयंसेवक म्हणून होते व पुढे हेच नेते त्या संघटनेच्या सर्वोच्चपदावर, दीर्घकाल राहिले आजही कॉ श्रीपाद अमृत डांगे यांच्याच खांद्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी एकमतानं सोपविण्यात आली आहे ताडाच्या पानांनी शाकारलेल्या झोपडीवजा मंडपात अधिवेशनचा शुभारंभ झाला चार हजार प्रतिनिधींची सोय होईल इतका भव्य मंडप होता व्यासपीठ देखील तसेच सजविण्यात आले होते समोरच्या बाजूला परदेशातून आलेल्या प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती आंध्र प्रदेशातील कलावंतांनी सुरेल आवाजात गाणी म्हटली आणि ए आय टी यू सी झिंदाबाद'च्या घोषणात ३१ वे अधिवेशन विशाखापट्टणम् येथे सुरु झाले

८२ वर्षांचे वयोवृद्ध नेते कॉ डांगे व्यासपीठावर येताच सर्वांनी उभे राहून प्रचंड टाळ्यांचा कडकडाट केला व गगनभेदी घोषणा देऊन सर्वांना आपल्या प्रिय नेत्याचे स्वागत केले. स्वागताध्यक्ष कॉ भद्रम यांच्या स्वागतपर भाषणानंतर कॉ डांगे यांचे उद्घाटनाचे भाषण झाले आयटकच्या लढाऊ परंपरेचा उल्लेख करुन सध्याच्या काळात कामगार वर्गाच्या हक्कासाठी लढा देण्यासाठी सर्वांनी ऐक्य मजबूत केले पाहिजे असे त्यांनी आवाहन केले. ते पुढे म्हणाले "सध्याचे सरकार हे भांडवलदाराचे सरकार आहे. इंदिरा गांधी या बुर्ज्वा पुढारी आहेत त्यांच्या काळात देशाचा विकास हा भांडवली पद्धतीने झाला. त्यामुळे भांडवली पद्धतीत असलेले दोषही वाढले. त्याचा परिणाम म्हणून महागाई, बेकारी वाढली

समाजवादी मार्गाने खरोखरीच करावयाची झाल्यास किमान वीस मक्तेदार घराण्यांच्या कारखान्याचे व संपत्तीचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे असे केले तरच कोठे आपल्या देशाच्या अर्थशास्त्राला ' सोशॅलिस्ड ओरिएंटेशन ' मिळाले असे होईल आपल्या हिंदी आणि इंग्रजी भाषणात त्यांनी परदेशातून आलेल्या कामगार प्रतिनिधींचे त्यांच्या उपस्थितीबद्दल जाहीर आभारही मानले त्यानंतर संदेशवाचन, पाहुण्यांचा परिचय वगैरे झाल्यावर सरचिटणीसांनी आपला अहवाल परिषदेसमोर मांडला व खऱ्या अर्थाने आता परिषदेला गंभीर वातावरणात प्रारंभ झाला त्यानंतर अनेकांची भाषणे झाली सूचना आल्या टीका झाली पण सर्वसाधारणपणे सर्वांनी अहवाल मान्य केला वेतन, महागाईभत्ता, बोनस, सामाजिक संरक्षण, वर्तमान कायद्यात दुरुस्ती, प्रतिबंधक कायदा, अत्यावश्यक सेवा कानून इत्यादिवर प्रदीर्घ चर्चा झाली हे या परिषदेतील महत्वाचे कार्य होते आलेल्या बहुसंख्य प्रतिनिधींचा कल इंदिरा सरकारच्या विरोधात होता याचे मुख्य कारण इंदिरा काँग्रेसच्या राज्य सरकाराची कामगार विरोधी नीती हेच होते अशा प्रसंगी श्रीमती रोझा देशपांडे बोलायला उठल्या त्यावेळची घटना मात्र अविस्मरणीय ठरावी कम्युनिस्ट पक्षातून फुटून निघून वेगळी चूल मांडल्याबद्दल श्रीमती देशपांडे यांच्याबद्दल बहुतेकांच्या मनात अढी होती. इंदिरा गांधींच्या धोरणाच्या त्या पुरस्कर्त्या आहेत हेही सर्वांना ज्ञात होते पण आपल्या भाषणात त्यांनी जेव्हा श्रीमती गांधींची भलावण करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी बहुसंख्य सभासदांनी आरडा ओरडा करून त्यांना बोलणे अशक्य करून सोडले पाच मिनिटांनतर त्यांना पुढे बोलू देण्यास जणू सारे सभागृह तयार नव्हते त्यावेळी अध्यक्ष-स्थानी कॉ एम एस कृष्णन होते प्रतिनिधींचा गलका वाढताच ते उभे राहिले व खणखणीत आवाजात त्यांनी साऱ्या सभागृहाला 'एकाद्याचे विचार आपणाला पटले नाहीत तरी ते आपण ऐकून घेतले पाहिजेत भाषणात अडथळा आणणे साफ चुकीचे आहे ' अशी त्यांनी समज दिली श्रीमती रोझा देशपांडे यांच्या विचाराशी सहमत नसलेल्यांनी व्यास पीठावर येऊन हवे तर त्यांचे मुद्दे मांडावेत प्रत्येकाला मत व्यक्त कर-ण्याचा अधिकार आहे पण तो सभाशास्त्राच्या नियमांना धरून अमला

पाहिजे आता पुन्हा कोणी गोंधळ करण्याचा प्रयत्न केला तर स्वयसेवकाना बोलावून गैरवर्तन करणाऱ्या प्रतिनिधीला बाहेर घालविले जाईल असा इशाराहि त्यानी दिला पुन्हा श्रीमती देशपांडे याना त्यानी भाषण पुढे चालविण्याची विनती केली पण त्या वेळपावेतो त्या सभागृहातून बाहेर गेल्या होत्या . असे दोन प्रसग सोडले तर परिषदेचे कामकाज अतिशय शिस्तबद्धपणे व ऐक्याच्या वातावरणात झाले

आयटकचे ३१ वे अधिवेशन भरविण्याचा बहुमान विशाखापट्टणम्च्या कामगार वर्गाला लाभला. त्याची कारणेही तशीच महत्वाची आहेत या चिमुकल्या शहरात १९३६ साली प्रथमच गोदी आणि बंदर (Harber & port workers union) कामगार युनियनची स्थापना झाली व त्या युनियनचे पहिले सरचिटणीसपद कॉ सी राजेश्वर राव याच्याकडे होते तसेच डॉ. एम् व्ही कृष्णराव अध्यक्ष व माजी राष्ट्रपती व्ही व्ही. गिरी हे या युनियनचे उपाध्यक्ष होते विशाखापट्टणम आज चिमुकले राहिले नाही शहराचा विस्तार अफाट झालेला आहे पूर्व किनाऱ्यावरील हे नैसर्गिक बदर असल्याने येथे भारत सरकारचे स्थान शिपयार्ड भारत पेट्रोलियम हिंदुस्थान झिक लि , भारत हेवी प्लेटस आणि व्हेसल्स लि , कोरोमंडळ फर्टिलायझर्स इत्यादी प्रचड कारखाने आहेत या उद्योगधद्यात प्रत्येकी एकच एक युनियन असून ती आयटकशी सलग्न आहे. आंध्र सरकारने मान्य केलेल्या अहवालानुसार ३ लाख सभासद या राज्यात आयटकला मानणारे आहेत कामगार वर्गाच्या प्रत्येक लढ्यात अग्रभागी राहण्याचा मान या शहराने मिळविला आहे. मग आयटकच्या अधिवेशनाला याहून योग्य असे ठिकाण दुसरे कोणते असू शकेल ?

या भागात उन्हाळा अतिशय कडाक्याचा असतो पण आश्विन महिन्याचे हे शेवटचे दिवस असल्यामुळे हवा चागली होती बदरावर आल्यानतर समुद्रात पर्यटन करण्याचा मोह अनावर होत होता. दोन्ही बाजूला दोन डोंगराच्या रांका उभ्या आहेत आणि मधल्या भागात समुद्र घुसलेला असून तेथे खोल पाणी असल्यामुळे सुदर नैसर्गिक बदर तयार झाले आहे. येथील कार्यकर्त्यांना आमच्या मनातले विचार कळले असावेत एकदा त्यानी दुपारच्या लाऊडस्पीकरवरुन जाहीर केले

की ज्याना बंदर पहावयाचे आहे त्यानी स्वागत समितीच्या कार्यालयावर नावे द्यावीत थोड्याच वेळात दीड दोनशे नावे आली आणि एका तीन मजली जहाजातून आम्ही समुद्रात निघालो देखील ! बोटीच्या कप्तानाने व इतर कर्मचाऱ्यानी बोटीवर आमचे हार्दीक स्वागत केले आणि त्यानी तळमजल्यापर्यंत आम्हाला घेऊन जाऊन बोट दाखविली राडार यंत्रे, अग्नीशामक यंत्रे, गोड्या पाण्याचा साठा, अपघात प्रसगी वापरायच्या लहान होड्या, अंडी, लोणी, मांस इत्यादी साठविण्यासाठी आवश्यक असलेले शीतगृह वगैरे सारे पाहून आम्ही थक्क झालो कप्तानाची विश्रांतीची खोली तर अगदी जमिनीवरच्या खोलीसारखी होती दरवाजा बंद करून घेतला तर कल्पनाही येणार नाही की आम्ही बोटीवरच्या खोलीत आहोत थोड्या वेळाने डेकवर आलो सभोवताली निळाभोर पूर्वसागर पसरला आहे. प्रचड फेसाळ लाटा उठत आहेत आणि मदगतीने पाणी कापीत आमची बोट चालली आहे जहाजे बांधण्याचा कारखाना, भारत सरकारचे आरमार याच भागात आहे समुद्रातून विशाखापट्टम शहराचे दृश्य मोठे विलोभनीय दिसते आश्चर्य म्हणजे डोंगराच्या माथ्यावर एक मोठे मदिर आहे त्याच्या शेजारीच एका बाजला मशीद आहे व दुसऱ्या बाजूला तेवढेच मोठे चर्च आहे एकाच डोंगर माथ्यावर शेजारी तीन धर्मातील तीन पवित्र स्थाने निर्माण करण्याची कल्पना ज्याने शोधून काढली त्या महापुरुषाला राष्ट्रीय एकात्मतेचे पारितोषिक देऊन गौरविले पाहिजे ! सुमारे तासभर समुद्रपर्यटनाचा आनद लुटून पुन्हा आमची बोट धक्क्यावर आली कप्तानाचे आणि इतर कर्मचाऱ्याचे मनोमन आभार मानून आम्ही पुन्हा सायकल रिक्षाने मच्छिमाराची स्थिती पहाण्यासाठी एका ठिकाणी निघालो

या ठिकाणी मच्छिमार गलबते धक्क्यावर आली होती आणि मासळीच्या व्यापाराला जोर चढला होता. प्रत्येकजण घाईत होता गडबड आणि गोंधळ याचे साक्षात प्रतिक म्हणजे मच्छी मार्केट ! मग येथे अपवाद कसा असेल ? निळ्या नॉयलॉनची जाळी घेऊन कोळी बोटीतून उतरत होते मचव्यातील पाट्या मासळीने भरल्या होत्या कोळिणी व इतर हमाल मालाची ने-जाण करीत होते धक्क्यावरच्या मच्छीमार

पडावामध्ये 'टाटा' ही इंग्रजी अक्षरे पाहून मी थक्कच झालो चौकशी करता समजले की उत्तम जपानी बनावटीचे आधुनिक मचवे खरेदी करून टाटामहाशय आता मासेमारीच्या धंद्यातही उतरले आहेत मिळालेली मासळी डबाबंद करून परदेशी पाठविण्याचा धंदा त्यांनी काढला आहे सुक्या आल्या मासळीचा दर्प नाकाला झोंबत होता मंद पावले टाकीत मी धक्क्यावरुन चालत होतो थोड्याच अंतरावर कोळ्याच्या झोपड्या होत्या. अठरा विश्वाचे दारिद्र्य उशाशी घेऊन त्या झोपड्या वाळूत पसरल्या होत्या लंगोटी घातलेले काळेभोर कोळी व त्यांची उघडी नागडी लेकरं खुशाल वाळूत खेळत होती दुर्गंधीने परिसर भरुन गेला होता त्या मागे असलेल्या मुख्य रस्त्यावर उत्तम बर्चची इमारत होती बाजूलाच उंची मद्याचे बार व हॉटेल नव्या व्यवस्थेखाली चालू झाल्याची जाहिरात रंगीबेरंगी दिव्यांच्या झगमगाटात झळकत होती रस्त्यावर पोहोचण्यापूर्वी मच्छिमाराचे कॅन्टीन लागले संध्याकाळ होऊन गेली होती मावळत्या सूर्याचे दर्शन मला नेहमीच घ्यावेसे वाटते समुद्राच्या दिशेने मी नजर टाकली. पण तेथे दूर क्षितीजावर काळोखाची अस्पष्ट छटा दिसत होती कारण हा पूर्व समुद्र असल्याने सूर्यास्त समुद्रावर दिसणंच शक्य नसते ।

मिशनची शाळा सुटली होती पिंजऱ्यातून पाखरे उडून जावीत त्याप्रमाणे मुले पळत होती, पायातील बूट आणि दप्तराचे ओझे सांभाळणे त्यांना जड जात होते काहींच्या 'ममी' आणि काहींचे 'पपा' तर काहींचे गाडी मुलांची मार्गप्रतिक्षा करीत बाहेर थांबले होते शाळेच्या फाटकातून एक तरुण शिक्षिका हळू हळू, जणू पावले मोजीत बाहेर येत होती. तिची कमाल म्हणजे संध्याकाळची वेळ असून देखील तिने आपली रंगी बेरंगी छत्री उघडून ती व्यवस्थितपणे धरली होती शेजारीच महानगरपालिकेची इमारत समुद्राकडे तोंड करुन उभी होती इतका भटकलो की आता माझ्याच्याने चालवेना म्हणून नाईलाजाने सायकल रिक्षात बसून निघालो रस्ता उंच सखल नसल्याने रिक्षा चांगलीच धावत होती. अनेक ठिकाणी बंदुकीचे चित्र भिंतीवर दिसत होते व 'सत्ता ही बंदुकीच्या नळीतूनच प्राप्त होत असते' हे माओचे वचन लिहिलेले

पाहिले रॅशनॅलिस्ट सोसायटीने देखील काही घोषणा भिंतीवर ठळक अक्षरात लिहिल्या होत्या. The hand that works is thousand times better than the lips which prey !' ही त्यापैकीच एक घोषणा होती रिक्षावाल्याला त्यानं मागितलेले भाडे तक्रार न करता दिले तो खूष झाला मी पायीच निघालो कोपऱ्या वरच्या दुकानातील दोन केळी घेतली आणि समोरच्या सहकारी दुग्ध व्यवसायाची पाटी वाचत ती केळी संपवली आता मुख्य रस्त्यावर येऊन लागलो होतो लाल-पताकांनी सारा परिसर सजविण्यात आला होता. कमानी उभारण्यात आल्या होत्या प्रतिनिधींचे बिल्ले छातीवर लावून अनेक प्रतिनिधी मंडपाकडे चालले होते. आज रात्री विशाखापट्टमचा आम्हाला निरोप घ्यावयाचा होता ..

ग्रंथालय ठाणे

५

# सिहाचलम

रात्रीच्या निबीड अधारात डाबरी सडकेवरून आमची गाडी भर-धाव वेगाने धावत होती. मोटारीच्या प्रकाशात रस्त्याकडेने असलेले पाढरे दगड तेवढे दिसत होते दोहोबाजूला गर्द झाडी होती दूर अतरावर कोठेतरी दिवे लुकलुकत होते, अगदी काजव्यासारखे आमचा प्रवास डोंगरमाथ्यावरून चालला होता आध्र प्रदेशातील पूर्व सागर पट्टीवर डोंगरात वसलेल्या सिहाचलमकडे आम्ही चाललो होतो विशाखापट्टम पासून हे ठिकाण पाऊण तासाच्या अतरावर, म्हणजे पधरा सोळा मैल तरी असावे मुख्य रस्त्यापासून गाडीने एक तीक्ष्ण वळण घेतले व ती चढावाला लागली पुन्हा एक दोन वळणे घेऊन एका टुमदार बगल्यासमोर ती येऊन उभी राहिली आध्र सरकारच्या पर्यटन विभागाचे हे अतिथी सदन होते गाडीतून खाली उतरुन अंगाला आळोखे-पिळोखे देत एक दीर्घ जाभई देऊन मी माझे प्रवासी साहित्य खाली घेतले, त्यावेळी थडगार वाऱ्याची सुखद लाट आली वॉचमनने सामान उचलून आत आणले नोदवहीत माझ्या नावाची आणि पत्त्याची नोद करून क्रमाक १ ची सुदर खोली त्याने ताब्यात दिली मग त्याने पलग सुरु केला पलगपोस पुन्हा झटकून नीट केला थोपटून उशी व्यवस्थित केली गार पाण्याने भरलेला छोटासा घडा एका स्वच्छ ग्लाससह उशाजवळच्या कोपऱ्यात ठेवून दिला व कमरेची लुगी सावरत तो निघूनही गेला. जाताना त्याने

दारहि ओढून घेतले ट्यूबलाईटच्या निळ्या प्रकाशात मी खोली नीट पाहून घेतली ड्रेसिंग टेबलवर उच आरसा होता शेजारीच एक कपाट होते त्याच्या बाजूला कपडे ठेवण्यासाठी लाकडी स्टँड होता दोन भल्या मोठ्या खिडक्याना पिवळे जाड पडदे लावलेले होते जोडूनच बाथरुमचीहि व्यवस्था होती. नळाला पाणी होते अधिक विचार करण्याची वेळ नव्हती प्रवासाने अग चिंबून गेले होते कॉटवर अग टाकताच केव्हा झोप लागली हे समजलेही नाही

सवयीने पहाटे जागा झालो जवळपास कोठेतरी कोंबड्याचे अरवणे ऐकू आले खिडकी उघडली, चाफ्याचे डेरेदार झाड शेजारीच होते वाऱ्याच्या झुळकीबरोबर त्याचा छान वासहि येत होता मी बाहेरच्या अगणात आलो आणि विस्फारलेल्या नेत्रानी आसमत न्याहाळीत राहिलो बगल्याच्या दोहोबाजूला केशरी रंगाच्या चाफ्याची दोन मोठी झाडे फुलानी बहरलेली होती काही फुले खाली बुध्याजवळ पडली देखील होती थोडे पुढे गेल्यावर अनताची पाढरीशुभ्र फुले फुललेली होती- ते छोटेसे हिरवेगार झाड फुलानी डवरुन गेले होते पूर्व क्षितिजावर लाली पसरु लागली होती. आकाशीच्या चांदण्या केव्हा अदृष्य झाल्या कळलेच नाही ! शुक्राची चादणीहि तेजहीन झाली होती अखेरपर्यंत आकाशाची सोबत ती एकटीच करीत होती. बगल्याच्या पाठीमागून अती उच्च डोंगराची राक गेली होती गडद हिरवेपणामुळे डोंगर शोभून दिसत होता समोरच्या बाजूने पुन्हा थोडासा आडवा डोंगर आला होता त्यामुळे सूर्योदयाला प्रारभ होऊन देखील या दरीत सूर्याची किरणे येऊन पोहोचली नव्हती उलट दूर असलेल्या दोन डोगराच्या फटीतून हळूहळू प्रकाशझोत उधळत चालल्याचे अवर्णनीय दृष्य दिसत होते माथ्यावर निळेभोर आकाश कसलाच ध्वनी नाही की प्रतिध्वनी नाही मात्र पोपटाचा थवा आपल्या नेहमीच्या चिरक्या आवाजात ओरडत गेला एक खारुताई धिटाईने डाबरी सडकेवरून येत होती मला पहातच ती बुजून शेजारच्या झाडावर बुध्याला वळसे घालून कोठे गेली कोण जाणे ! बराच वेळ शोधूनहि ती दिसली नाही तसाच पुढे निघालो तर मळकट रगाचे आणि लालबुद डोळ्याचे मुगुस रस्ता ओलाडताना दिसले मला मुगुसाचे दर्शन अप्रिय वाटते

मुंगुस पाहिल्यावर सापाची आठवण येते कारण साप-मुंगसाचे युद्ध मी स्वतः पाहिलेले आठवले. अशीच सकाळची वेळ होती. सूर्य नुकताच क्षितीजावर उगवला होता. आकाश निरभ्र होते कोवळी किरणे शेतावर पसरली होती गवतावरचे दवबिंदू मोत्यासारखे चमकत होते विळा हाती घेऊन मी भराभर गवत कापीत होतो तोच उजव्या हाताच्या बाजूने मोठा फुत्कार आला मला वाटले जवळून वाहणाऱ्या ओढ्यात बैल घुसला असावा व त्याचा तो फुत्कार असावा पण बैल कोठे दिसत नव्हताच उलट वाढलेल्या गवतावर, हातभर उंचीचा फणा काढून पिवळा-जर्द नाग फुत्कारत होता भीतीने माझे अंग शहारले, हातातील विळा गळून पडला आणि मी तेथून वेगानेच पळत निघालो व जवळच्या बांधावर उडी घेऊन मागे पाहू लागलो कोवळ्या किरणात नागाची सुवर्णकांती चमकत होती जमिनीपासून उंचावलेली त्याची फणा स्पष्ट दिसत होती तो पुढे सरकत होता पण वारंवार मागे वळून जोराने दंश करण्यासाठी फणा आदळत होता व त्यावेळी मोठा फुत्कार ऐकू येत होता क्षणभरात तो नाग गवत कापलेल्या मोकळ्या जागेत आला व त्याच्यामागून हाताच्या मुठीइतके लहानसे मुंगुस अंगावरचे केस पिंजारून आले अहि-नकुलाचे हे भीषण युद्ध जास्त वेळ चालले नाही माझ्या उप-स्थितीचा सुगावा लागताच मुंगुस गवतात अदृश्य झाले आणि बिथरलेला नाग जीव मुठीत घेऊन धनुष्यातून सुटलेल्या बाणासारखा दुसऱ्याच दिशेने पसार झाला मुंगुसापुढे गर्भगळीत झालेला नाग पहाणे मोठे विलोभनीय होते प्रभातकाळीच दर्शन देऊन गेलेल्या मुंगसाने माझ्या स्मृतीपटलावरील जुनी आठवण ताजी केली

मी माघारी फिरलो मंद पावले उचलीत बंगल्याकडची चढण चालू लागलो समोरून एक छोटी पोर हातात वेताची टोपली घेऊन येत होती रस्त्याकडेला असलेल्या झुडुपातून एक छोटे झाड उगवले होते त्यावर जांभळ्या रंगाच्या कळ्या होत्या गोरटीच्या कळ्यासारख्याच या काळ्या होत्या ती पोर आपल्या सराईत बोटांनी भराभर फुले तोडीत होती लालसर रंगाचे, मातीने विटलेले परकर-पोलके तिने घातले होते रंगाने ती इतकी काळी होती की क्षणभर मी पहातच राहिलो मोठी

चुणचुणीत पोर तिला फुले तोडण्यास मदत करावी म्हणून मी अनंताची पांढरी फुले खूप तोडली व ती फुलांची ओंजळ तिला बोलावून तिच्या हातात रिकामी केली चिमुकला काळाभोर सुंदर हात ' त्यात पांढरी फुले खरोखरच शोभून दिसत होती. मला तेलगू येत नसल्याने तिच्यापुढे मी मुकाच होतो नंतर तिने एक लांब काठी आणली व चाफ्यावर चढून तिने खूप फुले काढली. केसरी रंगाची चाफ्याची फुले फारच सुरेख होती डोंगरातून एक पाण्याची धार सतत वहात होती, तेथे गेलो गार पाण्याने हात–पाय धुतले आणि एका मोठ्या दगडावर बसून आसमंतात नजर फिरविली. इतकी सुंदर सकाळ व अशी प्रसन्न शांतता माझ्या वाट्याला कोठेच आली नव्हती शहरापासून दूर एकांतवासात व चिंतनात रमून जायला अशी जागा शोधून सापडणार नाही मनात या जागेची स्तुतीस्तोत्रे गात असताना एकदम कर्कश आवाजात लाऊड स्पिकर किंचाळू लागला डोंगराच्या माथ्यावर अगदी उंच जागी 'श्री वराह लक्ष्मी नरसिंह स्वामी वारी देवस्थानम्' असल्याचे समजले व तेथ पूजा चालली होती डोंगराच्या कुशीत संस्कृत श्लोक निनादू लागले होते संस्कृतसारख्या कर्णमधुर भाषेचे उच्चारण इतक्या कर्कशपणे होऊ शकते हे मी प्रथमच अनुभवत होतो कदाचित लाऊड-स्पिकरच्या आवाजाबद्दल माझ्या मनात असलेल्या अढीमुळे मला तसे वाटले असेल पूज्य विनोबा भावे यांनी आपल्या पदयात्रेच्या अनुभवा–बद्दल बोलताना असे सांगितले होते की खेड्यापाड्यातून मोकाट भटक-णारी कुत्री रात्री अपरात्री केकाटून शांततेचा भंग करतात आणि शहरा-तून वेळी अवेळी किंचाळणारे रेडिओ आणि लाऊडस्पिकर हेहि शांततेचा भंग करतात सिंहाचलमच्या खेड्यात कुत्रीही होती आणि रेडिओ–लाऊड-स्पिकरहि होता पण हे जास्त वेळ चालले नाही अर्ध्या पाऊण तासात पूजा आटोपली व मंत्र थांबले. लाऊडस्पिकरवरील रागाने का होईना वराह लक्ष्मी नरसिंहाचे देवालय पाहून घेण्याची इच्छा झाली, म्हणून दुसरे दिवशी पहाटे तेथे जायचा संकल्प करुन मी पुन्हा विशाखापट्टणमच्या बसमध्ये चढून बसलो ' राईट ' म्हणून कंडक्टरने इशारा करताच आमची गाडी भरधाव वेगाने निघाली

त्यावेळी सकाळचे सहाहि वाजले नव्हते स्टँडवर कोणीहि नव्हते एक रिकामी बस तेवढी उभी होती पण कोठे जाणारी होती हे समजायला मार्ग नव्हता. बसस्टँडच्या शेजारीच नारळाची दुकाने दुतर्फा होती आणि बरेच पूजा साहित्यहि तेथे विकायला ठेवले होते. एक दोन दुकानांचा अपवाद वगळता सारी दुकाने बंद होती दुकानाच्या शेजारुनच देवस्थानाच्या दिशेने जाणाऱ्या पायऱ्या दिसत होत्या थोड्या अंतरावर उंच ठिकाणी सुंदर नक्षीदार कमान होती त्या पलिकडे पुन्हा क्रमाने उंच होत जाणाऱ्या पायऱ्या दिसत होत्या एकप्रकारे ते मला आव्हानच वाटले हळूहळू रेंगाळत कसाबसा कमानीपर्यंतचा टप्पा गाठला आसपास, दूरवर डोंगराच्या उभ्या–आडव्या रांका होत्या दरीतून थोडासाच आकाशाचा तुकडा दिसत होता येथे येईपर्यंत माझ्या गुडघ्यातून कळा येऊ लागल्या कपाळावर ओलसरपणा आला थोडा थकवा वाटू लागला. चिंचेचे भले मोठे झाड कमानी शेजारीच होते रानकेळया फोफावल्या होत्या लांब–रुंद पोपटी पानांनी त्या सजल्या होत्या डोंगरातून झिरपणाऱ्या पाण्यामुळे पायऱ्या ओल्या झाल्या होत्या कांही ठिकाणी शेवाळ उगवले होते त्या निर्मनुष्य मार्गाने मी एकटा निघालो निरव शांतता अनुभवीत होतो वहाणा घालून चालणे अवघड वाटून मी त्या हातात घेतल्या दमाने मार्गाक्रमण करू लागलो क्षणभर मागे वळून पाहिले आणि आश्चर्याने मी थक्कच झालो कितीतरी पायऱ्या चढून मी बऱ्याच उंचीवर आलो होतो एक बैरागी मारुतीच्या फोटोला हार घालून, उदबत्ती पेटवून काहीतरी वाचीत बसला होता समोरच त्याने मळकट कपडा अंथरला होता व वाऱ्याने तो उडून जाऊ नये म्हणून त्यावर चारीबाजूला त्याने दगड ठेवून दिले होते 'दया ! बाबूसाब ' म्हणून त्याने अपेक्षित नजरेने माझ्याकडे पाहिले पण त्याला देण्यासाठी माझ्याजवळ सुटी नाणी नव्हती त्यामुळे मलाच शरमल्यासारखे झाले. त्याची भवानी मी वाया घालविली होती आणखी थोडे पुढे गेल्यावर पायरीवर बसकण मारण्याशिवाय अन्य मार्ग नव्हता ! घामाने मी पुरता न्हाऊन निघालो माझे पाय पुढे उचलेचनात देऊळ दृष्टीच्या टप्प्यात देखील येईना पायऱ्या सपता सपेनात

आता लख्ख उजाडले होते पण या भागात सूर्यकिरणे पोहोचण्यासारखी नव्हती उचच उच डोंगराच्या पश्चिम बाजूने मी वर चढत होतो वर्षापूर्वी याच महिन्यात सधीवाताने मी खूप आजारी होतो गुडघे आणि घाटे दुखायचे पाय दुमडायला होत नसे आता यापुढे भटकती बद असेच माझ्या मनाने घेतले होते पण आज इतक्या पायऱ्या चढून आलो याचेच मला आश्चर्य वाटले मी सपूर्ण निरिश्वरवादी असल्याने वराह लक्ष्मी कृपाप्रसादाने इतक्या पायऱ्या चढून येण्याचे बळ मला लाभले असले भावभावी विधान मी करणार नाही पण डोगरमाथ्यावरून दिसणाऱ्या अपूर्व निसर्ग दृष्याच्या ओढीने व येथील अद्भुत शाततेमुळे मी या पायऱ्या चढ-ण्याचा निर्धार केला होता चार पाच मिनिटाच्या विश्रातीनतर नव्या जोमाने मी पुन्हा पायऱ्या चढू लागलो डाव्या बाजूने एक पाण्याचा मोठा ओहोळ डोगरातून उडी घेत आणि खाली झेपावत होता एक तेलगू कुटुब तेथे स्नान करीत होते तीन चार वर्षाच्या एका काळ्याभोर बालकाला त्याची आई अत्यत श्रद्धेने एका पाण्याच्या कुडात त्याला न्हाऊ घालीत होती सुदरतेचे आणि गोऱ्या रंगाचे आपल्याकडे का समीकरण करण्यात येते याचा उलगडा मला अद्याप झालेला नाही गोरीपान स्त्री जितकी आकर्षक दिसू शकते तितकीच काळीभोर स्त्रीही आकर्षक दिसू शकते हे का मान्य केले जात नाही हे समजत नाही श्रीकृष्णाला श्याम सुदर ' म्हणतात. इग्रजीमध्ये ' Black the beautiful ' असेच याचे भाषातर करावे लागेल-ते गुटगुटीत काळेभोर बालक मला अतिशय आवडले नुकताच त्याच्या डोक्याचा गोटा करण्यात आला होता हे दिसत होते येथे देवाला केस अर्पण करण्याची प्रथा असून तरुण मुलीदेखील आपला लाब सुदर केशभार देवाला अर्पण करतात कित्येक वेळा कुटुबातील सारीच माणसे मुडण करून घेतात

आणखी थोडी विश्राती घेऊन पुन्हा पायऱ्या चढू लागलो डोगराच्या मध्य भागातून वळण घेऊन पायऱ्या पुन्हा समोर दिसू लागल्या आता उभी चढण लागली होती एक एक पायरी चढताना थकवा जाणवू लागला पण आता मागे वळून बघण्याचे मी सोडून दिले आणि निर्धाराने पायऱ्या चढू

लागलो घामाने पाठ ओली होऊन सदर पाठीला चिकटून बसू लागला शेवटी समोर पहातो तर डाबरी सडक आली स्टँडवर ज्या बसने यावयाचा मी प्रथम विचार केला होता तीच बस येथे येऊन पोहोचली. दहा—वीस भक्तगण खाली उतरले, कारण येथेच स्टँड आहे गाडी पकडून आलो असतो तर एवढी पायपीट चुकली असती असा विचार मनात येऊन गेला पण तसे झाले असते तर एवढ्या पायऱ्या चढण्यातल्या एका आगळ्याच आनंदाला मी मुकलो असतो असेही वाटले !

रस्त्यावरून वराह लक्ष्मी मंदिराचे दर्शन झाले एवढ्या उंच डोंगर-माथ्यावर अवघड जागी हे देऊळ का बांधले गेले याचा शोध घेणाऱ्यांनी घ्यावा पण येथील थंड हवा, रम्य वनश्री, खळाखळ वाहणारे निर्झर आणि आसपास पसरलेल्या डोंगराच्या उभ्या आडव्या रांगा व विशेष म्हणजे येथील निरव शांतता मनाला एक वेगळीच मोहिनी घालते यात शंका नाही ! क्षण-भर उसंत घेउन मी देवळाच्या दिशेने निघालो देवळासमोर एक उंच स्तंभ होता व त्या समोरील प्रचंड भिंत कोसळली होती त्यामुळे तेथे दुरुस्तीचे काम चालू होते डाव्या हाताने वळसा घालून देवालयाच्या उत्तरेकडील प्रवेशद्वारावर येऊन पोहोचलो दरवाजा बंद होता तेथे एक पोलिसही उभा होता प्रवेशाबाबत त्याच्याकडे चौकशी केली तेव्हा तो म्हणाला दोन रुपये देऊन तिकीट काढा पाच रुपये देऊन खास प्रवेश देण्याची सोयही असल्याचे त्याने सांगितले भिक्षुकशाहिचे हे नग्न प्रदर्शन पाहून मनस्वी चीड आली ९९८ पायऱ्या चढून येथे आल्यावर झालेले हे स्वागत बघून मी हतबुद्ध झालो शिवाय ९ वाजल्याशिवाय देवालयात प्रवेश नाही, कारण ९ वाजता तिकीट विक्री सुरू होते आता कोठे साडेसात वाजत आले होते पोलिसाबरोबर थोडी हुज्जत घालून आवाज चढवून त्याला न समजणाऱ्या मराठीत मी तावातावाने बोलू लागलो याचा योग्य असाच परिणाम झाला व त्याने एक मोठे दार थोडे कलते करून प्रवेश दिला आत जाऊन पाहतो तो पंचवीस धनिक मंडळी सहकुटुंब सहपरिवार आत उपस्थित होती पुन्हा मी माझा निषेध ओरडून नोंदविला तेव्हा डोक्यावर शेंडी, कमरेला पंचा, मनगटावर एच एम टी चे 'कांचन'

घडचाळ अशा थाटात एक भटजीबुवा आले व इंग्रजीत मला टम देण्याचा प्रयत्न करू लागले त्यांच्या सागण्याप्रमाणे या मंडळींना 'स्पेशल एन्ट्रन्स' खास प्रवेश दिलेला होता देवाचिया द्वारी असा भेदाभेद पाहून मी वैतागलो व देवालयात प्रवेश न करता देऊळ घडवून दगडाला देवपण आणून देणाऱ्या पूर्वज कलावताचे अत करणपूर्वक अभिनदन करीत तेथेच एका चौथऱ्यावर बसून राहिलो बाराव्या शतकात बाधलेले हे देऊळ अनेक सुदर खाबाच्या आधारे आठ–नऊशे वर्षे सुस्थितीत उभे आहे पण दुर्दैवाने अनेक देवळाच्या ठिकाणी पहात आलो आहे त्याप्रमाणे येथेही सुदर अप्सराच्या मूर्तीचे नाक फोडून त्या विद्रूप करण्यात आलेल्या आढळल्या प्रेमालिगनात तद्रूप झालेल्या नाग सर्पाचे शिल्प अतिशय सुदर होते छतावरची कमलफुले आणि नक्षीकाम, काळ्याशार दगडात कोरलेल्या अनेक देवादिकाच्या मूर्ती अत्यत प्रेक्षणीय होत्या देवाल्याची प्रमाणबद्धता, गर्भगृहापासून निमुळते होत जाणारे शिखर आणि त्यावर शोभून दिसणारा कळस सारेच विलोभनीय होते देवालयाच्या विस्तृत प्रागणातले अल्पकाळाचे माझे परिभ्रमण सपवून मी पोलिसाचे आभार मानून परत आलो

देवालयाच्या आसपास थोडी फार वस्ती होती तयार कपड्याची दुकाने, शखापासून तयार करण्यात आलेली खेळणी, देवाची चित्रे वगैरे सारे होते पण देवालयाबद्दलची माहिती सागणारी साधी चार पानाची पुस्तिका देखील शोधून सापडली नाही डोगरमाथ्यावरुन उड्या घेत जसा एकदा ओहोळ वळणावळणाने धावत सुटावा त्याप्रमाणे खाली पायथ्याकडे जाणाऱ्या पायऱ्या दिसत होत्या पुन्हा पादत्राणे हाती घेऊन पायऱ्यावर लयीत नृत्य केल्याप्रमाणे खाली उतरणीला धावत निघालो आता सूर्य बराच वर आला होता सूर्याच्या किरणानी सारा आसमत लख्ख उजाळून गेला होता. दूर अतरावर दोन डोंगरामधल्या सपाट भूप्रदेशात हिरवीगार भातशेती दिसत होती. मघाचा तो 'दया। बाबूसाब' म्हणणारा बैरागी तसाच निर्विकार मनाने बसला होता त्याच्या समोर अथरलेल्या कपड्यावर एकही नाणे पडले नव्हते मी खिशात हात घालून सापडलेली चाळीस–पन्नास पैशाची चिल्लर त्याच्या कपड्यावर ठेवून दिली

पुन्हा झपाझप पायऱ्या उतरत खाली, अधिक खाली झपाट्याने येऊ लागलो. एक दोन कमानी ओलांडताच स्टँडवरच्या बसचे दर्शन झाले आता बरीच दुकाने उघडलेली होती बहुतेक दुकानात स्त्रियाच बसलेल्या होत्या तुरळक संख्येने आलेले भाविक नारळ, उदबत्ती, कापूर, फुले विकत घेत होते मी मात्र देवळात जाऊन देवदर्शन न घेता परत आलो, याबद्दलचा विचार मनात आला आणि मला तुकारामाच्या अभंगाच्या दोन ओळी आठवल्या

पाषाण देव पाषाण पायरी ।
पूजा एकावरी पाय ठेवी ॥
सार तो भाव सार तो भाव ।
अनुभवी देव तेचि झाले ॥

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६ :

# चिक्कमगळूर धाकट्या लेकीचे गाव

## स्वादिष्ट कॉफीचे आगर

पतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी चिक्कमगळूर लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढविली आणि साऱ्या भारताचेच नव्हे तर साऱ्या जगाचे लक्ष तिकडे लागून राहिले त्यावेळी श्रीमती गांधी पतप्रधान नव्हत्या दुसऱ्या एका कारणासाठी चिक्कमगळूर प्रसिद्ध आहे ते म्हणजे उत्कृष्ट कॉफी ! या भागातील हवामान आणि जमीन कॉफीच्या लागवडीसाठी अतिशय अनुकूल आहे त्यामुळे लाखो हेक्टर जमिनीत कॉफीची लागवड करण्यात आलेली आहे अशा चिक्कमगळूरला येण्याचे आमंत्रण तेथील कार्यकर्त्यांनी दिल्यामुळ मी नकार कसा देणार ? डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात 'महालक्ष्मी' ने बेळगाव सोडले आणि रात्री येथील डाग बंगल्यात येऊन पोहोचलो वडाच्या वृक्षांनी माझ्या स्वागतासाठी फांद्यांची कमान केली होती निलगिरीची सरळ उंच झाडे 'दक्ष' राहून मानवंदना देत होती सुंदर चांदणे धरतीवर पसरले होते निळाकाळा उंच डोंगर समोर दिसत होता रिक्षातून खाली उतरताच टयूब लाईटच्या प्रकाशाने डोळे दिपून गेले माळयाने दरवाजा उघडून दिला. नेहमीप्रमाणे नळ, पाणी, बिछाना इत्यादि सोयींशी आणि बऱ्याच गैरसोयींशी परिचय झाला, चारशेहून अधिक किलो

मिटरचा प्रवास करून येथे आलो असल्यामुळे थकवा वाटत होता मार्ग-शीर्षातील पौर्णिमा जवळ आली होती त्यामुळे थंडी चांगलीच होती

जलदगतीने झोप डोळ्यावर उतरत होती इतक्यात चिरचिऱ्या आवाजात एकदम पाचसहा तरी पक्षी ओरडल्याचा आवाज झाला आणि मी दचकून जागा झालो आवाज तसा अगदीच अपरिचित नव्हता पण अन-पेक्षित होता त्यामळे तसे झाले ही सारी वटवाघळे होती व आता कोठे त्यांचे उजाडले होते अशा अवेळी काही कावळेही ओरडले घुबड ओरडले की नाही याची नोंद घ्यायच्या मन स्थितीत मी नव्हतो पुन्हा झोपेची आराधना करू लागलो पण कोणीतरी दार खटखटले भूताटकीवर माझा मुळीच विश्वास नाही, पण झपाटलेल्या भूतबंगल्याच्या वाचलेल्या कथा आठवू लागल्या पांढऱ्या शुभ्र पातळातल्या त्या स्त्रीने दारावर थाप दिली. भारावलेल्या मन स्थितीत मी दार उघडले ती मंद पावलाने आत आली. पण तिच्या शरीरावर मुंडकेच नव्हते पांढऱ्या साडीवर लाल लाल रक्ताचे डाग होते हातही रक्ताने माखले होते...मी गोष्ट पुढे आठवू लागलो दारावरची थाप अधिक मोठी झाली, मी उठून बसलो दिवा पेटवायला कळ सापडेना पण बाहेरचा दिवा पेटलेला असल्यामुळे दार सापडले व कडी काढून दार उघडले माझा त्रासलेला चेहरा पाहून बाहेर उभा असलेल्या इसमाला माझी अधिक काही विचारपूस करण्याची धास्ती वाटली असेल 'I am Sorry ! This is not my room where is my room ?' त्याची खोली हरवली होती ती शोधून देण्याचे सत्कार्य मलाच करावे लागले विचाऱ्याने थोडी अधिक झोकली होती !

पहाटे उठून बाहेर आलो थंड डोंगरी वारे वहात होते डाक बंगल्याच्या आवारात डांबराचे पिंप आणि सिमेंटचे पाईप टाकून येथील सुंदर आवाराचे गोदाम बनवून टाकण्यात आले होते उत्तरेला डोंगर-माथ्याची छान रांग दिसत होती. त्या दिशेने निघालो डोंगर तर अगदी जवळ भासत होते पण माझ्या अनुभवी नजरेने अंदाज बांधला की ते किमान २० ते २५ किलोमिटर दूर असतील बंगल्यासमोर विस्तीर्ण

मैदान पसरले होते बाजूला सुरूची उंच झाडे होती आणि बेलफळाच्या झाडावर बेलफळे लटकत रहावीत त्याप्रमाणे झाडाच्या शेंड्यापर्यंत साऱ्या झाडावर वटवाघळे लटकत होती पोटाखाली पिवळा रंग असलेल्या काळ्या चिमण्यांचे थवे उडत होते. क्षितिजाचे रंग बदलत होते आणि पहाता पहाता डोंगराच्या फटीतून नारंगी रंगाचा सूर्य आपल्या पूर्ण तेजासह उगवताना दिसला चालता चालता गर्द पालवीचे आंब्याचे झाड आड आले व त्यामागे सूर्यबिंब हे दृष्य पाहून मी भान हरवून बसलो अशा घडीत देखील कोठून तरी कोकिळेने तरुशिखरावर बसून लाविलेला पंचम कानावर आला. कान तृप्त झाले चिक्कमळुरची प्रभात तर आनंद आणि उल्हास घेऊन आलो ! ...

लोक सांगतात इतिहासकाळात कोणी एक राजा येथे होऊन गेला त्याला दोन कन्या होत्या. मोठीला त्याने एक गाव दिले त्याला हिरेमगळूर म्हणतात ते तेथून जवळच आहे धाकटीला एक गाव दिले त्याला चिक्क मगळूर म्हणतात कन्नड भाषेत हिरे म्हणजे मोठी आणि चिक्क म्हणजे लहान आणि मगळू म्हणजे मुलगी व ऊर म्हणजे गाव म्हणजे चिक्कमगळूर म्हणजे 'धाकट्या लेकीचे गाव' काही इतिहासकाराचे म्हणणे असे की मगळूर म्हणून दक्षिण कॅनरा जिल्ह्याचे जे ठिकाण आहे त्या गावाचा या गावाशी काही संबंध नाही इतिहास काळात हे घडले म्हणतात खरे खोटे तो एक राजाच जाणे !

दुपारी चार वाजता चिक्कमगळूरचे रस्ते घोषणा मिरवणुकीने निनादून गेले दूरदूरच्या कॉफी मळ्यातून काम करणारे शेकडो-हजारो नरनारी कामगार आपल्या मुलाबाळासह गांधी मार्गावर येऊन पोहोचले वावटळीसारखे ते येथे येऊन पोहोचले. मद्रदेशीय वाद्याच्या तालावर त्यांचे मिरवणुकीसमोर नृत्य सुरू झाले बहुतेक सारे कामगार तामिळ भाषिक होते, काही मल्याळीही होते चिक्कमगळूरचा मुख्य रस्ता कामगारानी दुथडी भरून चालला होता हजारो लाल झेंडे फडकत होते. गगनाला भिडणाऱ्या घोषणा उमटत होत्या शिरा ताणून कॉम्रेड मंडळी घोषणा देत होती. आझाद मैदानावर सभा आयोजित करण्यात आली होती. केरळचे

माजी मंत्री कॉं सुब्बाराव मुख्य वक्ते होते यांनी कन्नड भाषेत भाषणाचा प्रारंभ केला आणि मल्याळी भाषेत शेवट केला काहींची तामिळी भाषेत भाषणे झाली तर मी हिंदी–इंग्रजीचा आधार घेऊन भाषण केले भाषा कोणतीही असली तरी विचार एकच होते 'या देशातील बेकारीचे व महागाईचे उच्चाटन झाले पाहिजे धनिक वर्गाकडून होणारे समाजाचे शोषण थांबवून नवे समाज परिवर्तन या देशात घडले पाहिजे निधर्मीपणा, लोकशाही, समाजवाद या थोर जीवनमूल्यासाठी कामगारानी संघटीतपणे लढले पाहिजे। इंदिरा गांधीचे एकाधिकारशाहीचे सरकार बदलून त्या ठिकाणी डाव्या व लोकशाहीवादी शक्तीचे सरकार आणले पाहिजे।

तब्बल चार तास सभेचे काम चालले होते या भागातील वक्ते दीर्घ भाषण करतात एक वक्ता अडीच तीन तास सहज बोलू शकतो आणि लोक देखील अशी भाषणे ऐकतात दहा पंधरा मिनिटांची भाषणे ही काय भाषणे झाली ? राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा आढावा घेऊन गावातील पक्षोपक्षाच्या ताकदीचा उल्लेख त्याच्या भाषणाला असतो व वक्ता सारे भाषण विस्ताराने कथन करतो भाषणाला विनोदाची झालर अजिबात नसते रटाळ आणि कंटाळवाणे विश्लेषणही नसते असते केवळ तीक्ष्ण धार त्याच्या शब्दाना तलवारीची धार असते सोप्या शब्दात तो समाजाच्या व्यथा मांडतो, यावर उपाय सांगतो वक्त्याच्या भाषणाने श्रोते अंतरबाह्य पेटून उठतात वारंवार घोषणा देऊन वक्त्याला प्रोत्साहन देतात असे तास दोन तास सहज चालते मला अशा प्रसंगी भाई तुळशीदास जाधव यांची आठवण येते मराठी भाषेत यांच्या इतकी दीर्घ भाषणे करणारा वक्ता अद्याप झाला नसेल। त्यांनी तीन तास बोलत रहावे आणि श्रोत्यांनी ते चित्त देऊन ऐकावे अशा सभा माझ्या स्मरणात अजून आहेत

तीन चार दिवसाच्या मुक्कामात भात खाऊन वैतागलो इडली वडे–दोसा हे नेहमीचे सारी पक्वान्ने तांदळापासूनच केलेली सध्याकाळी सुंदरेश भेटला त्याच्याबरोबर त्याची पत्नीही होती. दुसरे दिवशी सकाळी

भेटला त्याच्याबरोबर त्याची पत्नीही होती दुसरे दिवशी सकाळी न्याहरीसाठी त्यांनी घरी येण्याचे आमंत्रण दिले मी म्हणालो एनम्मा ! 'नमेगे बिसी रोटी बेकु नमगे इडली वडे ब्यादा' माझे आई' मी, तुमच्या गावात इडली वडे खाऊन दमून गेलो आहे मला भाकरी देशील का ? 'का नाही ! उद्या आम्ही भाकरीचाच बेत केला आहे' असे सागून ती पुढे म्हणाली, रोटी यत उट बिल्ल होट्टी यत हेडती बिल्ड ही म्हण मला पूर्ण समजली नाही पहिल्या ओळीचा अर्थ 'भाकरी सारखे जेवण नाही दुसरी ओळ मात्र बुचकळ्यात टाकणारी वाटली त्याचा अर्थ असा 'मुक्या पत्नीसारखी पत्नी नाही ! अर्थांच्या तपशीलात न शिरता भाकरी खायला येण्याचे आमंत्रण मात्र मी आनंदाने स्वीकारले

दुपारचा सूर्य डोक्यावर घेत आम्ही स्टँडवर पोहोचलो आणि येथून वीस किलोमिटरवर असलेल्या बाबा बुडनगिरी हिलसकडे निघालो सारा डोंगर परिसर हिरव्या वनराईने नटला होता नागमोडी रस्ता आणि उभी चढण हे येथील वैशिष्टय डोंगराच्या खोल उतरणीवर सिल्वर वृक्षाच्या गार छायेत कॉफीचे मळे सर्वत्र विखुरलेले विलोभनीय दृष्य प्रथमच पहात होतो कॉफीच्या झाडाना ऊन सोसत नाही त्यामुळे दुसऱ्या झाडाच्या सावलीत कॉफीची झाडे वाढवावयाची असतात कॉफीचे झाड भारतीय नाही अरबानी कॉफीचे वी प्रथम भारतात आणले म्हणतात म्हणून सध्या ज्या जातीची झाडे या भागात आहेत त्या कॉफीचे नाव 'अरेबिका' असे आहे त्यानंतर रोबस्ट स्वाद यादृष्टीने अरेबिका कॉफी उत्कृष्ट समजली जाते. रोब स्टचा क्रमांक दुसरा पण या जातीची झाडे मोठी आणि उत्पन्नाच्या दृष्टीने म्हणजे भरपूर पीक देणारी असतात आता अनेक संकरीत जातीही येऊ लागल्या आहेत बाबा बुडनगिरी हिलसच्या अगलखान विभागात आम्ही भट-कत होतो वनराजी अजिबात नसलेला हिरवा बोडका डोंगर आभाळात उंच गेला होता आणि त्याच्या मध्यावर कॉफीची लागवड करण्यात आली होती कॉफीच्या बागा अतिशय स्वच्छ असतात दोन झाडात सारखे अंतर ठेवून एका ओळीत झाडे लावलेली असतात व सावलीसाठी सिल्वर

वृक्षांची उच झाडे असतात कॉफीबरोबरच या वृक्षापासून देखील मळे माल-काना भरघोस उत्पन्न मिळते या झाडाच्या लाकडापासून काडयाच्या पेटया आणि आतल्या काड्या बनवितात

वाकडी तिकडी अवघड वळणे घेत आमची गाडी चढ उतारावरून धावत होती काही वेळाने रस्त्याकडेला असलेल्या कामगाराच्या वस्तीवर आम्ही उतरलो पेरेस्वामी नावाच्या तरुण कामगाराने आमचे स्वागत केले तामिळनाडच्या तिरूची गावचा हा कामगार गेली सात वर्षे येथील कॉफी मळयात कामाला आहे बोलत बोलत त्याच्या घरी गेलो आम्हाला आत घेऊन जाण्यास तो उत्सुक दिसला नाही पण मला तर घर आतून बघायचे होते हे घर पाहून कोणत्याही सहृदय माणसाच्या अंगावर काटा यावा असे ते घर होते पालापाचोळयाचे जळण त्यामुळे भिंती काळयाभिन्न झाल्या होऱ्या अल्युमिनीयमच्या एक दोन भांडयाशिवाय घरात तिसरे भांडे नाही बाकीची सारी काळी मडकीच मळकट परकरातील एक पोरगी डोक्याच्या झिंज्या सोडलेली, चूल फुकत होती ती भात करणार होती व कामावरून आल्यावर तिची आई सार करणारी होती कोपऱ्यात धूर ओकणारी रॉकेलची चिमणी भणभणत होती सारे वातावरण कळकटलेले ! शेजारच्या अंगणात काही बाया डोक्यातल्या उवा शोधीत होत्या कोणत्याही कामगाराच्या खोलीत विजेचे दिवे नाहीत सर्वांचे किमान वेतन सात रुपये पचवीस पैसे या भागात शाळा नाही दवाखाना नाही करमणूकीचे साधन नाही उघडी नागडी पोरे रस्त्याच्या धुळीत झुंडीने खेळत होती कुटुंबनियोजन येथपर्यंत येऊन पोहोचलेच नव्हते !

बाजूची लहानशी सडक एका शानदार बंगल्याकडे जाते डाव्या हाताच्या चढणीवर ओळीने कॉफीची बाग व उजव्या हाताच्या खोल दरीत ती तशीच पुढे पसरलेली थंडगार हवा कोवळे ऊन. संध्याकाळची वेळ रस्ता सोडून आम्ही बागेत शिरलो हिरव्या आणि लाल फळांचा साज लेवून सारी बाग नटली होती कामगार लाल फळे तोडीत होते, हीच ती कॉफीची बुंदे व यांत्रिक प्रक्रिया करून एका फळातून दोन बिया

घेतात व पूर्ण सुकलेल्या बिया दळून मग कॉफी पावडर तयार केली जाते ६५ हजार मजूर कॉफीच्या मळ्यातून काम करीत आहेत. हा सरकारी आकडा असला तरी प्रत्यक्षात लाखावर मजूर या भागात कामाला आहेत थोडे पुढे गेल्यावर डोंगराच्या कुशीत एक बंगला पाहिला टवटवीत पिवळे गुलाब बागेत फुलले होते साखळीने बांधलेल्या अल्सेसियन कुत्र्यानी जोराने भुंकून आमचे स्वागत केले इमानी जात ! बंगला अतिशय निटनेटका होता. कॉफी मळ्याच्या मालकाचे वैभव येथे ऊतू जात होते. भिंती, छत आणि जमीन सारे मोझॅकच्या गिलाव्यात होते निळे काळे सुंदर ! मालकाचा स्वत चा सिनेमा प्रोजेक्टर, रेकार्ड प्लेअर दोन–तीन फोन, फ्रीज सारा थाट आधुनिक होता मालक रेसमध्ये घोडीवर पैसे लावण्यासाठी बेंगळूरला गेले होते बंगल्याच्या मागील भागात गोठा होता जर्सी आणि हॉस्टीन गायींना नोकर शॉवर बाथ घालीत होते व साबण लावून धुवीत होते माझ्या डोळ्यासमोर कामगार वस्तीत असलेला डाबरी पिंप आठवला गरिबी हटविणाऱ्या पतप्रधानांच्या समाजवादाला मनोमन दंडवत घालून मी त्या बंगल्याच्या निरोप घेतला दीड–दोन मैल चालून रस्त्याकडेच्या हॉटेलात कॉफी पिण्यासाठी बसलो. पण मला ती कॉफी अधिक कडू वाटली

* *

७ :

# गुलबर्ग्याच्या किल्ल्यात 'अल्ला हो अकबर'

गुलबर्ग्याला येऊन दोन दिवस झाले हॉटेल बहामनच्या समोर असलेल्या विस्तीर्ण मैदानावर धुळीतले कण आपल्या चिमुकल्या चोचीने टिपत असलेला चिमण्यांचा थवा न्याहाळत मी थांबलो होतो एक काळीभोर ॲम्बेसडर वेगाने धूळ उडवत आली आणि तो चिमण्यांचा थवा अदृष्य झाला. अल्लाउद्दीन खिलजीच्या घोडदलाने अशीच धूळ इतिहासकाळात केव्हा तरी उडविली होती आणि मराठ्यांचा देवगिरीचा किल्ला शरण आला होता या घटनेची आठवण झाली. आता हवा तापू लागली होती उन्हाचे चटके जाणवू लागले होते समोरचे मैदान ओलांडून मी रस्ता गाठण्यासाठी झप झप पावले उचलीत होतो 'अल्लाउद्दीन हसन गंगू बहामन शाह' अशी पदवी धारण करणाऱ्या जाफरखानाने स्थापन केलेल्या बहामनी राजघराण्याचा किल्ला पहाण्यासाठी निघालो नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेल्या त्या विशाल बहामनी घराण्याचे नाव हॉटेलला देणाऱ्या पर्यटक विभागाच्या अधिकाऱ्यांना मनात शिव्याशाप देत मी निघालो

रस्त्यावर पोहोचताच रिक्षावाल्याने गाठले सायकलरिक्षात बसणे मला काहीसे अमानुष वाटू लागले पण मी रिक्षात बसलो व किल्ल्याकडे घेऊन जाण्यास सांगितले खाचखळग्याच्या रस्त्याने रिक्षा धावू लागली बैलाच्या गळ्यातील घाटांचा मंजूळ नाद ऐकू येऊ लागला या घाटां

बैलाच्या गळ्यातील नव्हत्या तर रिक्षेवाल्याने त्या रिक्षाला बांधलेल्या होत्या आपल्या ग्रामीण जीवनाची स्मृती चाळवीत तो कदाचित रिक्षा चालवीत असावा रिक्षाबरोबर छनक छन् तालबद्ध असा घुगरूचा आवाजही येऊ लागला जणू बहामनी राज्यातील राजनर्तकी आमचा पाठलाग करीत आहे ' नंतर लक्षात आले की रिक्षाच्या मागे घुंगर बांधलेले आहेत रिक्षात बसल्या बसल्या पॅडलवरील काळ्याभोर अनवाणी पायाकडे माझे लक्ष गेले दमाने तो रिक्षा चालवीत होता चढण अगर वळण असले तर खाली उतरुन हाताने रिक्षा ओढीत होता

## मशिदीची कलात्मक वास्तू

भर दुपारच्या रणरणत्या उन्हात किल्ल्याच्या पूर्व दरवाजापाशी खाली उतरलो. नगरपालिकेने दुतर्फा गावातील कचरा येथे रिकामा केल्यामुळे भयंकर दुर्गंधी सुटली होती कशी तरी वाट काढून दरवाजातून आत गेलो भयानक शुकशुकाट जाणवत होता आत शिरताच किल्ल्याचा ओसाड व निर्मनुष्य विस्तार अंगावर चालून आला पण मशिदीच्या कलात्मक वास्तूने मला आकर्षित करून घेतले व त्या दिशेने मी निघालो एकटाच या किल्ल्याच्या अफाट विस्तारात माझे एकटेपण मला वारवार जाणवू लागले का छोट्या कमानीखालून गेलेल्या पायवाटेने मी चाललो होतो उजव्या हाताला एक प्रचंड बुरूज होता अनेक शतके ऊन, पाऊस, थंडी, वारा, सहन करीत तो उभा होता. क्षणभर त्याकडे बघत उभा राहिलो कबुतराची एक जोडी बुरूजाच्या दगडात आसरा शोधीत होती काही पोपट औदु-बराच्या पर्णहीन फांद्यावर बसून कलकलाट करीत होते माझे लक्ष वेधून घेतले ते या झाडावरील नीळकंठ पक्षाने । पंख वरून करड्या रंगाचे पण आतून सुंदर निळेभोर, पक्षी उडत असला की त्याचा घननीळा रंग पाहून डोळ्याचे पारणे फिटून जाते असे पाच-सात निळकंठ औदुंबराला लटकल्या सारखे दिसत होते त्याचा आवाज मात्र कोकीळेच्या पंचमासारखा नव्हता अगर आमच्याकडच्या सड्यासारखी कर्णमधूर शीळही या निळकंठाला वाज-

विता येत नव्हती या पक्षाचा आवाज षडजातला होता पण त्याला एक वेगळाच गोडवा होता !

## मशिदीचे वर्णन

मशिदीच्या पायऱ्या चढून वर आलो पहातो तर सर्वत्र कमानी आणि खांब थोडे आत शिरून चोहोबाजूला पाहिले, पण कसेही पहा कमानीची आणि खांबाची सुंदर ओळ दिसते मोजून पाहिले तर एकशे चाळीस खांब पावले मोजली तर शभर भरली पूर्वेकडून पश्चिमेला जायला शभर पावले. येथे भिंतीपाशी मध्यभागी एक छोटासा चौथरा होता व त्यावर उर्दूत 'अल्ला हो अकबर ' असे लिहिलेले मी वाचले याचा अर्थ परमेश्वर सर्वश्रेष्ठ आहे चौथऱ्यावर उभा राहिलो आणि अगदी एखाद्या मौलवीच्या थाटात आवाज दिला अल्ला हो अकबर ! एक दोनदा आवाज दिल्यावर खांब, कमानी, भिंती, छत, जमीन न्याहाळीत त्या प्रचंड मशिदीत भटकत होतो इतक्यात पाठीमागून एक व्यक्ती आली आणि 'सलाम साब ! ' म्हणून उभी राहिली त्याच्या हातात झाडू होता आणि कपडे खाकी होते त्यावरून तर्क केला की पुराणवस्तू संशोधन खात्याचा हा नोकर असावा 'क्या भाई ! क्या नाम है आपका ?' मी चौकशी केली तो म्हणाला 'मेरा नाम पांडुरंग साब ! ' मशिदीत भेटलेल्या या पांडुरंगाला दंडवत घालून नमस्कार करावा अशी इच्छा मनात उफाळुन आली आणि नेहमीच्याप्रमाणे त्याची अधिक चौकशी केली त्याने आपले नाव पांडुरंग चिंचणकर असे सांगितले मग आता मी या पांडुरंगाबरोबर मराठीत बोलू लागलो केवळ दरमहा एकशे पंचवीस रुपये पगारावर हा आमचा पांडुरंग मशिदीची झाडलोट करण्याचे काम करीत असतो इ सन १३६७ साली बहामन वशातल्या महमद शहाने ही अप्रतिम सुंदर मशीद या किल्लात बांधली आणि आपले भारत सरकार सव्वाशे रुपयाचा पांडुरंग येथे ठेवून या पुरातन वास्तुची देखभाल करीत आहे या मशिदीचे वैशिष्टय म्हणजे भिंती जवळच्या चबुतऱ्यावरून उच्चारलेला प्रत्येक शब्द मशिदीत अगदी शेवटो

कोठेही बसलेल्या माणसाला स्पष्ट ऐकू येतो. गोल घुमटाच्या खालोखाल या मशिदीतले ध्वनी नियत्रण वाखाणण्यासारखे आहे

## अजस्त्र तोफ

पाडुरगाला बरोबर घेऊन तटावर गेलो आसपास नजर पोहोचेपर्यंत दूरवर पाहून घेतले. ओसाड मैदान माळ पसरलेले कोठे एखादी टेकडी नाही की डेरेदार वृक्ष नाही सारे रखरखीत उन्हाने कोरपळून गेलेले। दूरवर आणखी दोन चार मशिदीचे घुमट नजरेला पडले धापा टाकीत चढण ओलांडून एका प्रचंड बुरूजावर आलो तेथे एक मोठी तोफ पश्चिमेकडे तोड करून ठेवलेली होती अजस्त्र तोफ बिजापूरच्या उपली बुरूजावर ठेवलेली आहे तशी ही तोफ आहे बुरूजाच्या पलिकडे आणखी एक तट आहे त्यापलिकडे खदक आहे अशा प्रकारे सरक्षणाच्या दृष्टीने हा किल्ला पूर्वी इतिहासकाळात नावाजलेला असला पाहिजे यात शका नाही पाडूरग येथे बरीच वर्षे असला तरी याला अधिकृत म्हणून सागता येण्यासारखी काही माहिती ठाऊक नाही। तो बिचारा आ त्याला मिळणाऱ्या सव्वाशेशी मान राखून झाडायचे काम करी अगदी एवढेच परत मशिदीत आल्यावर याने माठातले म्हणण्यापेक्षा राजणातले थडगार पाणी दिले एक रुपया त्याच्या हातावर ठेवून मी त्याचा निरोप घेतला त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर समाधानाची एक रेषा उमटलेली पाहून मला बरे वाटले त्याचा निरोप घेवून मी गावाकडे निघालो किल्ल्याची ढासळलेली तटबदी निर्मनुष्य परिसर, ऊन आणि धूळ यामुळे निर्माण झालेला ढकाळपणा अवलोकन करीत मी बाहेर पडलो पहातो तर पानवेलीनी झाकलेल्या खदकात काही म्हशी डुबत होत्या. तापलेली धूळ पायाने उडवित एक पोरगे रखडत चालले होते. बुरखा घातलेली एक युवती हातात पुस्तके घेऊन बहुतेक कॉलेजला चालली होती किल्ल्याबाहेर असलेल्या चद्र हनुमानच्या देवालयासमोरुन निघून मी मुख्य रस्त्यावर आलो आता थोडी रहदारी जाणवू लागली

## बदे नवाजचा दर्गा

गुलबर्ग्यात आल्यानतर बदे नवाजच्या दर्ग्याला भेट न देता जाणे म्हणजे काशीला जाऊन विश्वेश्वराचे दर्शन न करण्यासारखे होईल याची

मला कल्पना होती म्हणून कार्पोरेशन चौकात येऊन थांबलो व तेथून जाणारी बस पकडावी असा विचार केला एका बाजूला बसवेश्वराचा पुतळा व दुसऱ्या बाजूला बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा व मागे तुडुंब भरलेला तलाव असे सुंदर दृष्य पहात असतानाच बस आली आणि बंदे नवाजच्या दर्ग्याकडे निघालो रस्त्यात सात घुमट असलेल्या मशिदी पाहिल्या व त्यापलिकडे काही अंतरावर मोटार येऊन थांबली मागून धुळीचा लोट पाठलाग करीत होताच

## मनिषापूर्तीसाठी बंदे नवाज

दर्ग्याच्या प्रथम दर्शनाने मन मोहित होऊन गेले कमानी आणि घुमट ही इस्लामी स्थापत्यशास्त्राची खुण आहे विशाल कमान आणि घुमट पहातच रहावे असे देखणे आहेत दुतर्फा फुलाची व नारळाची दुकाने तांबडी, पांढरी खूप फुलेच फुले धूप आणि अगरबत्ती हे तर दर्ग्याचे वैशिष्ट्य पांढरी फुले नंदनबटव्याची असावीत तांबड्या फुलाचे नाव दुकानदारालाही माहित नव्हते ओंजळभर फुले घेऊन बंदे नवाजच्या दर्ग्याच्या पायऱ्या चढू लागलो गर्दी होती पण रेटारेटी होण्याइतपत नव्हती आत सुंदर संगमरवरी फरशी आहे छाया देणारे वृक्ष आहेत पाण्याने काठोकाठ भरलेला संगमरवरी फरशीने बांधुन काढलेला हौद आहे. उन्हातून आल्यामुळे गार पाण्याने पाय शांत केले आणि बंदे नवाजच्या कबरीकडे निघालो दूरदूरच्या भागातून आलेल्या स्त्रिया आणि मुले गार फरशीवर खुशाल विसावली होती काही जोडपी फुले घेऊन जात होती भक्तीभाव अनेकाच्या मुखावर विलसत होता बंदे नवाजच्या दर्ग्याला इतकी गर्दी कशी ? कारण आपण मनात काहीही ठरवून या आणि आपली मनिषा पूर्ण झालीच म्हणून समजा ! हा समज दृढ असल्यामुळे मागणे घेऊन अनेक भाविक बंदे नवाजच्या दर्ग्याकडे आलेले असतात.

## मन की मुराद पुरी हो जाय

दक्षिणाभिमुख दरवाजाने मी कबरीच्या गाभाऱ्यात प्रवेश केला आणि ओंजळभर फुले वाहिली. धुपाच्या आणि अत्तराच्या वासाने गर्भ-गुढीतले वातावरण अतिशय प्रसन्न वाटत होते काही भाविक कबरीला

मिठी मारून नमस्कार करीत होते तर काही जण मोरपिसाची जुडी अंगावरून, तोंडावरून फिरवून घेत होते दक्षिणेच्या पेटीत चिल्लर आणि नोटा कोंबल्या जात होत्या एक प्रदक्षिणा घालून मी बाहेर आलो बऱ्याच बाया दरवाजाबाहेर खोळंबल्या होत्या स्त्रियाना आत प्रवेश नाही ! बाहेरूनच त्या आपले मागणे मागत होत्या 'मन की, मुराद पुरी होनेके बाद नवस कर्जा फेडू याबद्दल त्या स्वखुषीने बदे नवाजला अभिवचन देत होत्या आमच्या भोळ्या भाबड्या माता-भगिनी, हिंदु तशा मुसलमान !'

## कबरीवर लाल फुलांची चादर

मी सारे काही बारकाईने व कुतुहलाने पहात असल्याचे पाहून एक मिया माझ्यापाशी येऊन उभे राहिले मी त्याना म्हणालो भाई ! बदे नवाजाबद्दल काही माहिती सागाल का ? त्या बिचाऱ्याला विशेष काही माहित नव्हते. दर्ग्याच्या बाहेर एक किताबघर आहे तेथे पुस्तक मिळेल ते वाचा एवढीच त्याने माहिती सांगितली व म्हणाला 'बदे नवाजकडे काहीही मागा आपली इच्छा पूर्ण होईल काही महिन्यापूर्वी पुण्याहून एक दारू व्यवसायातले भक्त (एक्साईज कत्राटदार) आले होते. त्यानी मागणी केली त्याची इच्छा पूर्ण झाली त्यामुळे ही संगमरवरी फरशी लाख रुपये खर्चून त्यानी बसविली आहे त्याचवेळी चार पाच वर्षांचे एक कोवळे बालक माझा सदरा ओढीत म्हणाले, 'साब ! पाच दस पैसा दे दो ' ते पुन्हा पुन्हा मागत होते मी त्याच्या हातावर दहा पैसे ठेवले देखील तेव्हा मी त्या मियाला म्हणालो देखो भाई ' बदे नवाजकेपास मेरे लिये कुछ माँगनेकी इच्छा नही है लेकिन ' इस छोटे बच्चेकेलिये इतना माँगूगा की कोईभी बच्चेपर दुसरोके सामने हात फैलानेकी आफत न आये ' मियाँला गहिवरून आले सदऱ्याच्या टोकाने त्याने आपले अश्रु पुसले भीक मागणारा मुलगा त्याला बिलगला कदाचित तो त्याचाच मुलगा असावा बेलाशक मीही प्रार्थना केली की ' बदे नवाज ! या देशातून दुःख, दारिद्र्य, वचना अवहेलना नाहीशी कर तुझ्या कबरीवर सुंदर लाल फुलाची चादर घालीन '

मला माहित आहे माझे हे मागणे अवैज्ञानिक, अगतिक आणि काहीशा मनोदुर्बलतेतून निर्माण झाले आहे !

* *

८

# छू मंतर नव्हे ! जंतर मंतर
# दिल्लीतील जुनी वेधशाळा

दिल्लीच्या संसद मार्गावरील चार्टर्ड बँकेत काही मित्राना भेटण्यासाठी गेलो त्यावेळी तेथील वातानुकुलीत व्यवस्था पाहून मन प्रसन्न झाले ऑगस्ट महिन्यातील भाजून काढणारे ऊन आणि ढगाळ आकाशामुळे हवेतील उकाडा यामुळे अगदी हैराण होऊन गेलो होतो थंड हवेत प्रवेश करताच भलतेच बरे वाटले काम संपले तरी उठवत नव्हते काचेचा भला मोठा दरवाजा कलता करून बाहेर आलो तर अंगावर एक उष्णतेची लाटच आल्यासारखे वाटले झपझप पावले टाकीत पार्लमेंटच्या दिशेने निघालो. इतक्यात पावसाची एक मोठी सर आली आकाश भरून आले होते धावत आसरा शोधत निघालो तर समोरच 'जतर मतर' ही प्रचंड वेधशाळा दिसली

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याच्या ताब्यात ही वास्तु असून 'ज्योतिष यंत्रोकी वेधशाळा' असा फलक तिथे आहे पावसाची सर आली आणि सर्वांना न्हाऊ घालून गेली ऊन इतके कडाक्याचे होते की, ओले कपडे सुकविण्याची चिंता नव्हती.

हे जतर मतर पाहिल्याशिवाय येथून पाय निघणेच शक्य नव्हते हे 'छू मतर' असते तर येथे थांबून मूल्यवान वेळ खर्च करण्याचे कारणच नव्हते हे तर जतरमतर होते ही वेधशाळा होती जयपूरचे महाराजा

जयसिंह यानी ही वेधशाळा १७२४ साली बांधली त्यावेळी दिल्लीच्या गादीवर महमद शहा हे राज्य करीत होते व महाराजा जयसिंह दिल्ली विभागाचे सुभेदार होते राजाज्ञा घेऊन त्यानी ही वेधशाळा बांधली या नंतरच्या काळात जयपूर, उज्जैन, बनारस, मथुरा इत्यादी ठिकाणी अशा व याहून चांगल्या वेधशाळा बांधल्या गेल्या त्या आजही चांगल्या अवस्थेत आहेत फक्त मथुरेची वेधशाळा मात्र साफ कोलमडून नष्ट झालेली आहे. या ठिकाणी दगडावरचे नक्षीकाम अगर कलाकुसर असले काही नाही तर उलट अंतराळातील ग्रहे, तारे, नक्षत्रे, सूर्य, चंद्र याबद्दलचे संशोधन आहे येथील बांधकाम विटा आणि चुना यात केले आहे.

दोहो बाजूला सदाफुलीची झाडे लावलेली होती व मधोमध एक छोटा रस्ता गेला होता काही कारंजे होते पण कोरडे होते. हिरवळ मात्र डोळ्यांना सुखावत होती त्रिकोणी भिंत, गोल उंच एकच खांब, अर्धवर्तुळात वरती जाणारा भिंतीतला जिना मध्येच खोल हौदात भरलेले पाणी भिंतीवरच्या गिलाव्यावर करण्यात आलेल्या नोंदी हे सारे पहाताना चमत्कारिक वाटते पण ही आहे भारतातील पहिली वेधशाळा महाराजा जयसिंग हा या वास्तूचा जनक आहे त्याच्या कल्पकतेतून हे सारे साकारले आहे. या महाराजाने पाश्चात्य आणि पौर्वात्य खगोलशास्त्राचा अभ्यास केला आणि त्या आधारे ही वेधशाळा बांधली

पृथ्वीचा आस कललेला आहे हे भौगोलिक सत्य आहे त्यामुळे विषववृत्त, कर्कवृत्त, मकरवृत्त तसेच अक्षांश व रेखांश हे कल्पिलेले आहेत व पृथ्वी ३६५ दिवसांत आपल्या आसाभोवती फिरत असताना सूर्य कर्कवृत्तात केव्हा येतो तो विषववृत्तावर केव्हा जातो तो मकरवृत्तात केव्हा असतो हा तपशिल येथील यंत्राच्या सहाय्याने समजून घेता येतो येथे एक उत्तराभिमुख भिंत आहे रात्रीच्यावेळी आकाश निरभ्र असताना भिंतीच्या निमुळत्या टोकाकडून वर पाहिल्यास आपली दृष्टी ध्रुव ताऱ्यावर खिळून राहील म्हणजे सप्तर्षींचे सहाय्य न घेताच या भिंतीमुळे क्षणार्धात ध्रुवतारा सापडतो येथे चार यंत्रे आहेत १) सम्राट यंत्र २) जयप्रकाश यंत्र ३) राम यंत्र ४) मिश्र यंत्र ही यंत्रे म्हणजे त्रिकोणी भिंती, अर्धवर्तुळाकार भिंती,

उच खाब वगैरे आहेत भितीच्या गिलाव्यात आकडे कोरलेले आहेत. येथील समर्थ यत्राच्या सहाय्याने वेळ अचूक सागता येते अर्ध्या सेकदापर्यंत अचूक सांगता येते वास्तविक त्यावेळी कॅलेंडरही नव्हते आणि भारतापर्यंत घडयाळही येऊन पोहोचले नव्हते पण महाराजा जयसिह यांच्या वेधशाळेत 'घडयाळ' आले या घडयाळात भारतातीलच वेळ सागता येते असे नव्हे तर इग्लड, स्विट्झरलड, जपान व पॅसिफीक महासागर येथील वेळाही सागता येतात येथील एका यत्रावरून सूर्योदय आणि सूर्यास्त तसेच चद्रोदय आणि त्याचा अस्त अचुकपणे सागता येतो २३ सप्टेंबरला १२ तासाचा दिवस व बरोबर १२ तासाची रात्र येते हे येथील गणितावरून स्पष्ट होते आकाशातील नक्षत्रेही येथून अचूक सागता येतात. येथील मार्गदर्शकाला गाठून जतरमतरचा अर्थ विचारला त्याने सांगितले जतर म्हणजे साधन (Instrument) व मतर म्हणजे पहाणे आणि बेरीज (Observation and Calculation जतरमतर हा शब्द वरवर पहाता जादूटोण्यातल्या मत्रातल्या वाटतो पण तेथे तसले काही नाही तर येथे शुद्ध विज्ञान आहे।

भारतात खगोल शास्त्राचा अभ्यास पुरातन काळापासून चालत आलेला आहे. चद्रग्रहण सूर्यग्रहण हे प्राचिन काळात भारतीयांना माहित होते हा सूर्य हा जयद्रथ हे श्रीकृष्णाच्या तोंडचे वाक्य सर्वांना माहित आहे सूर्यास्त झाला समजून अर्जुन चिता रचतो व तीत उडी घेणार असतो त्यावेळी गमत पहाण्यासाठी जयद्रथ आणि सोबती आलेले असतात पण अधार पुन्हा हटतो व सूर्य आपल्या पूर्वीच्या तेजाने चमकू लागतो ती सध्याकाळ नसून सूर्यग्रहणाची वेळ असते हे कृष्णाला माहित असते मग अर्जुन जयद्रथाला ठार मारतो. ही महाभारतातील कथा या कथेवरून हे स्पष्ट होते की त्यावेळी सूर्यग्रहण माहित होते पण ते सर्वांना माहित अस ण्याचे कारण नाही त्याचे जाणकार फार थोडे होते पण ज्यावेळी खगोल शास्त्रात फलज्योतिष शिरले त्यावेळी खगोल शास्त्रात बळी गेला आणि अधश्रद्धेचा कालखड सुरू झाला सूर्य, पृथ्वी, चद्र जेव्हा एका एका रेषेत येतात त्यावेळी चद्रग्रहण लागते ही शास्त्रीय चिकित्सा मग मागे पडते व राहू–केतू या दोन राक्षसाचे चद्र देणे लागतो व त्यामुळे ते त्याला

ग्रासून टाकतात आम्ही मानवानी नदीत स्नान करून दान दिले की ग्रहण सुटते अशा भाकड कथा जन्माला येतात

दुर्दैवाने भारतात लाबी, रुदी, खोली, उची वगैरे मोजण्याचे प्रमाण सखोल व शास्त्रशुद्ध माडले गेले नाही अगुळे (बोटे) हात, पाऊले, वाव यावर मोजमाप चालते विहिरीत पाणी किती आहे ? या प्रश्नाचे उत्तर दोन माणूस पाणी आहे असे आजही मिळते तसेच आपल्याकडील वजनाचेही झाले आहे मापेही वेगवेगळी होती शेर, पायली, घडे या मापांचा वेग-वेगळया ठिकाणी वेगळा वेगळा अर्थ होता पावले मोजून जमीन मापली जायची लहान मोठी पावले असतात म्हणन इग्रज राजाचा 'पाय' हे प्रमाण मानण्यात आले व इग्रजीत त्यालाच आजही 'फूट' म्हणतात पुढे त्याचे विभाग पाडून इच बनविण्यात आले इग्रजी राजवटीबरोबर भारतात फूट–इच, पौंड अस इत्यादी मापे आली वेळ मोजण्याच्या बाबतही तसेच आहे आपल्याकडे घडयाळ फार उशिरा आले सकाळ, दुपार, सायकाळ, रात्र आणि दिवस मग महिने वगैरे कालमान मोजणे आपल्याकडे प्रचलित आहे. ऋतूही आहेत पण दिवस २४ तासात विभागून तास ६० मिनिटात आणि मिनिटे ६० सेकदात विभागून अचूक वेळेचे निदान करणे हे फार उशिरा आपल्याकडे आलेले आहे अजूनही आपल्या सार्वजनिक जीवनात अचूक वेळेचे अनधान येऊन पोहोचले नसल्याने ४ वाजताची सभा ५ वाजता असा सूर सभासचालक मडळी काढतात कोणतेही काम वेळेवर न करणे याला उपरोधाने 'इडियन टाईम' असे आजही सबोधले जाते यावरून आम्ही कोठे आहोत याची कल्पना येते

अशा या सदर्भावरून विचार केल्यास १७२४ साली दिल्ली येथे जतरमतरची स्थापना करून महाराजा जयसिह यानी एक प्रकारे वैचारिक क्रातीच केली असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये भारतात मठ-मशिदी, आणि मदिरे उदड झालीत पण वेधशाळा प्रथम महाराजा जयसिह यानी काढली धर्माला विज्ञानाचे नेहमी वावडे असते बायबलमध्ये पृथ्वी सपाट आहे असे लिहिले आहे बायबल हे अचूक व अपरिवर्तनीय आहे मग

पृथ्वी गोल आहे असे प्रतिपादन करणारा व सिद्ध करणारा शास्त्रज्ञ गुन्हेगारच मानला पाहिजे तसा तो गुन्हेगार मानला गेला व त्याला देहांत प्रायश्चित्तही मिळाले हे पोलंडच्या कोपरनिकसच्या उदाहरणावरून सहज लक्षात येते

आज शास्त्रज्ञाना तसे कोणी फासावर देत नाहीत अगर जाळून टाकीत नाहीत तो कालखंड मागे पडला आहे पण अंधश्रद्धा जोपासण्याचे कार्य मात्र जोरात चालू आहे प्रत्यक्ष वेधशाळा जरी आज बांधायची असेल तरी ज्या जागेवर ती बांधायची त्या जागेचे भूमिपूजन केले जाईल आणि ती बांधून झाल्यावर वेधशाळेत प्रवेश करण्याचा समारंभ मुहूर्तावर सुरू होईल व त्यापूर्वी जागेची शांती वगैरे सारे प्रकार झालेले असतील श्रद्धेने मोटार चालत नाही, प्रचंड इमारती उभ्या रहात नाहीत किंवा समुद्रावर बोट तरंगत नाही ! मोटार चालण्यासाठी पेट्रोलसारखे इंधन लागते इमारतीसाठी स्थापत्यशास्त्र लागते दगडाची बनवून चालत नाही श्रद्धेची जागा शास्त्राने घेतली पाहिजे पण एका अध्यात्मवादी व्यक्तीचे शिष्यगण जाहीरपणे थाप मारतात की, रशियात म्हणे एक स्त्री आहे ती केवळ आपल्या दृष्टीच्या प्रभावाने कात्रीचे पाते वाकवून दाखविले ! (तिचे लग्न झाले असेल तर नवऱ्याचे हाल !) कोणी म्हणे आपल्या दृष्टीच्या प्रभावाने पोलादाचा पत्रा कापून दाखवतो या साऱ्या अशास्त्रीय भाकडकथा आहेत पण दुर्दैवाने यावर देखील विश्वास ठेवणारे काही महाभाग आहेतच काही वर्षापूर्वी आपण कोणीतरी महान योगी आहोत असा आव आणून हटयोगी श्री राव यानी आपण पाण्यावरून चालून दाखविण्याचा प्रयोग करणार आहोत असे जाहीर करून भक्तगण व पत्रकार याना बोलाविले व प्रयोगाच्या वेळी ते सपशेल पाण्यात पडले हे अनेकाना आठवत असेल

रहस्यमय चमत्कारिक, गूढ वाटणाऱ्या आत्मा, परमात्मा वगैरेच्या फापटपसारा मांडून पोट भरण्याचा धंदा करणाऱ्यानी आतापर्यंत वरूपदा विज्ञानाच्या नावे बोटे मोडलेली आहेत पण थोडा वेळ काही लोक फसले म्हणून सर्व लोक सर्वकाळ फसतील अशी गफलत कोणी करून घेणार नाही।

१७२४ साली एक वेधशाळा एका राजाने दिल्लीत बांधली, आणि

आज प्रत्यक्षात किती तरी वेधशाळा भारतात आहेत आर्यभट्टाला अतराळात पाठवून आपण पुन्हा खऱ्या खगोल शास्त्राची कास धरली आहे पृथ्वीच्या कक्षेबाहेर अतराळात स्वर्ग आहे म्हणून आतापर्यंत सांगत असत. आता भारताचे दोन अतराळवीर मलहोत्रा–शर्मा अंतराळात पृथ्वीच्या कक्षेबाहेर जाणार आहेत. पाहू या त्याना तरी स्वर्ग दिसतो का ? राजा महाराजांच्या सरजामशाहीला विरोध करणाऱ्या पथातले आम्ही लोक आहोत पण त्यातले पुरोगामी, शाश्वत असे एखादे मूल्यवान काही गवसले तर त्याची नोद कृतज्ञतेने घेणे आम्ही कर्तव्य मानतो म्हणून राजे जयसिग याच्या वेधशाळेबद्दल हे चार शद्ब ! जतर मतर वेधशाळेतून बाहेर पडताना हीच भावना मनात होती.

* *

९ :

# बेंगळूरात भेटलेला असा एक ' सुलतान '

दक्षिण भारतातले एक सुंदर शहर म्हणून बेंगळूर फार पूर्वीपासून प्रख्यात आहे. अलिकडे सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख उद्योगधंदे या शहरात आल्यापासून या शहराची कीर्ती देशाबाहेर देखील गेली आहे. पाकिस्तान–बरोबरच्या युद्धात पराक्रम गाजविणारी विमाने येथेच तयार झालेली. हिंदुस्थान मशिन टूल्स कारखान्यात तयार होणारी सुबक आणि टिकाऊ घड्याळे जागतिक बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करीत आहेत. शहराचा लौकिक एवढा मोठा की, भारताच्या संसदेचे अधिवेशन देखील येथे भरवावे अशी मागणी करण्यात आली होती. आशिया खंडात क्वचितच आढळेल इतकी मोठी विधान सभेची इमारत या शहराची शोभा वाढवीत आहे. लाल रंगाची हायकोर्टची इमारत, त्यामागे असलेले वृक्षलतांनी बहरलेले सुंदर पार्क, या भागातील आखीव रस्ते आणि रेखीव इमारती सारेच कसे डौलदार आहे.

वर्तमानकाळाइतकाच या शहराचा इतिहासही गौरवशाली आहे. काही काळ हे शहर शहाजी राजांची राजधानी म्हणून गाजले होते. शिवाजी महाराजांनी आपल्या पिताजींची भेट घेण्यासाठी या शहरात आपल्या निवडक सैनिकांसह प्रवेश केला. त्यावेळी शहाजी राजांनी त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले आणि शिवाजी महाराजांचा एक विवाह येथे

घडवून आणला व हत्तीवरुन मिरवत त्याना महालावर नेले. हैदर अली आणि टीपू सुलतान यांचीही काही काळ येथे राजधानी होती जुने इतिहास-कालीन अवशेष आता या शहरात फारच थोडे उरलेले आहेत व त्याकडे कोणाचे लक्षही दिसत नाही दिसतात फक्त जयचामराज वडियार यांच्या नावाच्या पाट्या कोठे या नावाचे वसतिगृह तर कोठे एखादे कॉलेज अथवा एखादे पॅलेस येथे इतिहासकाळात घोडी दौडली होती राज्याचे रक्षण करण्यासाठी अगर राज्याचा विस्तार वाढविण्यासाठी आताही बेंगळूर शहराच्या मध्यभागी घोडी दौडतात ती रेसची[1] तेथे बक्यांची झुबड उडते दौलतीचा खुर्दा होतो राजरोस कायदेशीर जुगार तेजीत चालतो. देशाच्या अनेक भागातून लक्ष्मीपुत्र येथे रेससाठी लोटलेले असतात तर कधी श्रमजीवी आंदोलन करतात हरताळ, लाठीमार, गोळीबार होतो विधान सभेत प्रश्नोत्तराचा तास गाजतो व सभात्यागानंतर त्यावर पडदा पडतो

बेंगळूर शहराचे सिटी मार्केट बरेच मोठे आहे त्याच्या समोरच एक अत्याधुनिक इस्पितळ आहे माझे मित्र एस् व्यंकटराम याना बरोबर घेऊन या इस्पितळात आजारी असलेल्या एका सहकाऱ्याला भेटण्यासाठी आलो झाडाच्या गर्द छायेत हे इस्पितळ विसावले होते. डॉक्टर आणि परिचारिकाची वर्दळ नेहमीसारखीच होती फिनेल आणि डेटॉलच्या संमिश्र वासाने आपण इस्पितळात आलो आहोत याची पूर्ण जाणिव झाली आजारी मित्र झोपला होता त्याला जागे करणे योग्य वाटले नाही म्हणून आम्ही तेथून बाहेर पडलो बाहेर पडताना दुसऱ्याच मार्गाने बाहेर आलो पहातो तर भले थोरले बुरूज रस्त्याशी समांतर पसरले आहेत व्यंकटराम म्हणाला, हा तर टीपू सुलतानचा किल्ला पूर्वी हा फार मोठा व बळकट भूईकोट, किल्ला होता व त्याच्या मध्यभागी तीन मजली उंचीचा टिपू सुलतानचा महाल होता किल्ला ढासळून नामशेष झालेला असला तरी टिपू सुलतानचा महाल आजही काहीसा चांगल्या अवस्थेत येथून जवळच आहे माझी उत्सुकता चाळविली गेली एस् व्यंकटराम्‌बरोबर मी चालतच टिपूच्या महालाकडे गेलो.

रस्त्याच्या कडेला एका मोठ्या दगडाच्या पाटीवर ' टिपू सुलतान का महल ' अशी अक्षरे लिहिलेली होती शेजारीच लालसर रंगाचा टिपू

सुलतानचा महाल अनेक खांबाच्या आधारे उभा होता वरचे २ मजले पूर्ण ढासळलेले आहेत व आता केवळ एकच मजली इमारत दीनवाण्या अवस्थेत उभी आहे. इमारतीसमोर मोठे अंगण आहे टिपू सुलतान मोठा रसिक आणि फुलांचा चाहता होता त्याने देशविदेशातून आणलेली अनेक फुलझाडे या अंगणात लाविली होती अशी पाटी सरकारच्या पुरातत्वखात्याने लावलेली आहे. पण सध्या तेथे फक्त हिरवळ आहे संबध महालाचा भार लाकडी, कोरीव खांबानी पेलला असून ५ कमानींनी महालाला एक वेगळीच शोभा आणली आहे तीन दालने ओलांडून गेल्यावर उजव्या व डाव्या हाताला असे वर जाण्यासाठी दोन जिने आहेत छत, कमानी, खांब हे अतिशय रेखीव, भव्य आणि कलाकुसर, नक्षी यामुळे देखणे आहेत टिपू सुलतानाने या महालाला (Abode of happiness) सुखाचे आगर असे नाव दिलेले आहे हैदर आणि टिपू यांच्या वैभवाची साक्ष पटविणारा हा महाल आहे खरा

नबाब हैदर अलिखान याने १७८१ साली महालाच्या बांधकामाचा प्रारंभ केला आणि सुलतान टिपूने १७९१ साली याचे बांधकाम पूर्ण केले या महालाला दोनशे वर्षे होत आली तरी भिंतीवरचे रंगकाम, लाकडावरची नक्षी व छत चांगल्या स्थितीत आहे काही ठिकाणी कोपऱ्यात कोळीष्टके लटकत होती याचे आश्चर्य वाटले नाही कारण सरकाचे पुरातत्व खाते कार्यक्षमतेबद्दल मुळीच प्रसिद्ध नाही बेळगावपासून जवळच असलेल्या कोलारला जन्मलेला हैदरअल्ली १७६१ साली म्हैसूरचा राजा झाला त्या काळी दिल्लीच्या मोंगलाच्या सत्तेला उतरती कळा लागली होती मराठे माधवराव पेशव्यांच्या नेतृत्वाखाली वरचढ ठरु लागले होते बंगाल मद्रासच्या बाजूने कंपनी सरकारचा वॉरन हेस्टींग्ज हातपाय पसरू लागला होता हैदरअलीने आपल्या शौर्याने राज्य कमावले व सांभाळण्यासाठी टिपू सुलतानाच्या ताब्यात दिले या ऐतिहासिक महालाच्या दालनामागून दालनातून भटकती करीत असताना इतिहासाची पाने मन पटलावर का मागून एक उमटू लागली महालाच्या एका खोलीत लहानसे प्रदर्शन आहे. त्यात दहा बारा छायाचित्रे आहेत आकडेबाज मिशा असलेला आणि

'शेळी होऊन दोनशे वर्षे जगण्यापेक्षा वाघ होऊन दोन वर्षं जगलेले बरे' असे म्हणणारा टिपू सुलतान शोधून सापडला नाही

बेंगळूरपासून जवळच असलेल्या देवनहळळी या गावी टिपू जन्मला पार्शियन, अरेबिक, उर्दू आणि कन्नड या भाषा त्याला चांगल्या येत असत. त्याचे ग्रंथालयही मोठे होते. इंग्रजांचा काटा काढण्यासाठी फ्रेंचांची मदत घ्यावी असा धोरणी व शूर राजा टिपू होऊन गेला मराठे, इंग्रज व अर्काटचा नबाब यांच्याशी लढून उत्तरेस कृष्णेपासून दक्षिणेस त्रावणकोरपर्यंत त्याने आपले राज्य पसरविले होते इंग्रजांबरोबर त्याने ३ वेळा युद्ध केले, आणि १७९९ साली इंग्रज सेनानी ऑर्थर वेलस्ली यांच्या बरोबर श्रीरंग-पट्टणम येथे झालेल्या भयानक रणकंदनात टिपू सुलतान बंदूकीच्या गोळीने ठार झाला १९५७ साली प्लासीच्या लढाईत सिराजउद्दौलाचा कपटनीतीने इंग्रजांनी पराभव करून बंगाल गिळकृत केला आणि १७९९ साली टिपू, सुलतानचा वध करून ब्रिटीशांनी म्हैसूर ताब्यात घेतले व्यापारासाठी आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने तराजू टाकुन तलवार घेतली. पाऊण शत-काच्या कालावधीत सारा भारत देश गुलाम करून सोडला... एस् व्यंकटराम् आणि मी अंतर्मुख होऊन टिपू सुलतानच्या महालात किती वेळ फिरत होतो कोण जाणे! शरीर आणि मन दोन्ही थकल्यासारखे वाटू लागलेली म्हणून महालासमोरच्या हिरवळीवर आम्ही बसलो व्यंकटराम् तसा मितभाषी पण हुषार बोलता बोलता मराठी भाषेतील आडनावावर आमची चर्चा येऊन ठेपली मी म्हणालो, 'आमच्याकडे राजे-प्रधान, सरदार, सुभेदार, किल्लेदार, चिटणीस, टिपणीस, सबनीस, शिलेदार, राजवैद्य तोफखाने, देसाई, पाटील, देशपांडे, इनामदार त्याचप्रमाणे आगलावे, बंदीसोडे, डोईफोडे, कानकापे अशी अनेक आडनावे आहेत की ज्यांचा इतिहास काळाशी संबंध आहे सरंजामशाहीच्या काळात शासन यंत्रणेमध्ये ही मंडळी जबाबदारीच्या जागा भूषविणारी होती व त्यांची आडनावे म्हणजे त्यांना बहाल केलेल्या पदव्या अगर ती वतने असायची तो काळ निघून गेला पण आडनावे तेवढी शिल्लक राहिली आहेत

माझ्या बोलण्यावर एस व्यंकटराम् एकदम खूष झाला तो म्हणाला ' जे तुमच्याकडे तेच आमच्याकडे ! माझ्या नावामागे एस आहे त्याचा अर्थ माहित आहे काय ? मी नकारार्थी मान हलविली आणि आता हा काय' सांगणार ते उत्सुकतेने ऐकू लागलो हिरवळीवर आडवा झालेला व्यंकटराम् सरळ उठून बसला आणि आणि गभीरपणे म्हणाला तुम्हाला आश्चर्य वाटेल! माझ्या नावामागचे एस म्हणजे सुलतान ! मी तसा ' सुलतान ' व्यंकटराम ' माझी जिज्ञासा शिगेला पोहोचली. व्यंकटराम्चा सुलतान कसा झाला हे मला जाणून घ्यावयाचे होते मी आग्रह केल्यावरून त्याने सांगायला सुरवात केली

'आमचे घराणे विणकराचे टिपूच्या दरबारी आमच्या घराण्यातले कोणीतरी दरबारी विणकर म्हणून नोकरीला होते इग्रजाविरूद्धच्या पहिल्या लढाईत यश मिळवून आल्यावर धुळीने मळलेली आपली पगडी टिपूने काढून ठेवली व पगडीला गुडाळलेला रेशमी शेला दरबारी परटाने धुवायला नेला रिठ्याच्या फेसाने स्वच्छ धुवून तो शेला त्याने एका भितीवर वाळत घातला. तासाभराने परिट येऊन पहातो तर तेथे कपडाच नाही टिपू सुलतानच्या पगडीचा कपडा चोरण्याची कोणाची हिंमत ! कोतवालाला निरोप गेला, चोहोदिशाना घोडेस्वार दौडले, गावात दवडी पिटली गेली पण चोर सापडेना शेवटी प्रधानाने विणकराला बोलावून घेऊन टिपू पुढे उभे केले बहुतेक ते आमच्या घराण्यातले खापर पणजोबा असावेत त्यावेळी परिटा-लाही बोलून घेण्यात आले आमच्या विणकर पूर्वजाने कपडा वाळत घात-लेली जागा पाहाण्याची इच्छा दर्शविली सर्वजणच तेथे गेले आणि त्यावेळी वाळत घातलेला पण भितीला चिकटून बसलेला अतिशय तलम कपडा हळुवार हाताने त्या विणकराने भितीवरून जसाच्या तसा काढला आणि टिपू सुलतानपुढे त्याची घडी ठेवून दिली उपस्थित दरबारी थक्क झाले असे तलम आणि सुदर वस्त्र विणणाऱ्या विणकराची टिपूने तारिफ केली आणि हवे ते माग असा हुकूम फर्माविला आमचे घराणे कुशल विणकराचे त्यामुळे आर्थिक परिस्थिती बरी होती म्हणून आमच्या खापर पणजोबाने पैसा अडका, जमीनजुमला मागितला नाही तो एवढेच म्हणाला, ' महा-

राज ! या गरीब विणकरावर असाच लोभ ठेवावा टिपू सुलतान खूष झाला आणि त्याने यापुढे तुझ्या घराण्याला ‘ सुलतान ’ असा किताब बहाल केल्याचे जाहीर केले. तेव्हापासून आम्ही सुलतान विणकर झालो पण आमच्या पूर्वजानी टिपूकडे अभय का मागितले माहीत आहे ?’ व्यकट-रामच्या या प्रश्नाचे मी काय उत्तर देणार ? तो पुढे म्हणाला, टिपूच्याच काळात डाक्का येथील ब्रिटीश राजवटीने विणकरांचे अगठे तोडून विण-कामाचा धदा बद पाडण्याचा क्रूर खेळ सुरू केला होता डाक्याची मलमल बद पाडून तेथे मँचेस्टरची मलमल आणायची होती

असा हा माझा मित्र सुलतान व्यकटराम ! त्याच्या इतिहास कथना-मुळे खूष होऊन मी त्याला मिठीच मारली. ‘ हवे ते माग ’ हे सांगायला मी काही टिपू सुलतान नव्हतो माझी शक्ती चहा देण्याइतकीच टिपूच्या महालाचा निरोप घेऊन चहासाठी आम्ही बाहेर निघून गेलो

* *

१०

# पश्चिम किनाऱ्यावरील पहारेकरी डोंगरीदुर्ग तेरेखो ?

पावसाळी हवा, धुके, मधून मधून पावसाच्या सरी आणि त्यात रात्रीचा प्रवास त्यामुळे आपली गाडी कोणत्या दिशेने धावत आहे याचा काही केल्या अदाज लागत नाही गोगटे माईन्सच्या अतिथीगृहात ज्यावळी आम्ही पोहोचलो त्यावेळी आमची स्थिती तशीच झाली कोठे आलो, समुद्र कोठे आहे, परिसर कसा आहे, खाणी कोठे आहेत, गाव कोठे आहे कांही अदाज करता येईना पावसाची रिपरिप, रातकिड्याचा आवाज, दूरवर पश्चिम सागराचा धनगभीर ध्वनी. सुरुच्या झाडातून वाऱ्याने धरलेला ताल, वाद्यवृन्द चागलाच जमला होता समुह नृत्याला वातावरण एकदम चागले होते पण भिडू होते न नाचणारे, न गाणारे मराठी पत्रकार सघाची वार्षिक बैठक घेण्यासाठी आम्ही रेडी येथील अतिथीगृहात जमलो होतो, अपवाद होता शामराव देशपाडचा ! रात्रीच्या त्या नीरव शाततेत त्यानी मुक्तकठाने गायला सुरुवात केली ' पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा दोष ना कुणाचा ' आवाज चागला लागला होता आम्ही कौतुकाने टाळ्याही वाजविल्या. मी म्हणालो, वा देशपाडे, तुम्ही तर सुधीर फडकेची आठवण करून दिलीत झोपताना या गाण्याच्या ओळी मी गुणगुणू लागलो व तसाच विचारही करू लागलो. ग दि माडगूळकरानी मानवपुत्राला पराधीन दैवाधीन नीयतीच्या हातातील खेळणे असेच का मानावे ? आज

मानवपुत्र गगनाला गवसणी घालीत आहे शंकराच्या जटेत विसविणाऱ्या चंद्रावर तो अवतीर्ण झाला आहे शुक्र–मंगळ त्याच्या आवाक्यात आले आहेत साता समुद्राची त्याने पायवाट केली आहे आकाश गंगेला मार्ग पुसत तो अंतराळात भ्रमण करीत आहे मानव पुत्रच नाही तर मानव-पुत्रीही या परिक्रमेत मागे नाही! तर मग मानवपुत्र पराधीन कसा ? तो दैवाधिन कसा? हा अर्थ काही पटत नाही असा विचार करीत करीत मी केव्हा निद्राधीन झालो समजलेच नाही

पहाटे उठून पहातो तर आम्ही एका टेकडीवरील बंगलीत विसावलो आहोत पश्चिमेला क्षितीजापर्यंत सागर पसरला आहे पाऊस पडून गेल्या मुळे अंगण स्वच्छ झाले होते, आणि आकाशाचेही अंगणही तितकेच स्वच्छ झाले होते सर्वत्र हिरवीगार पर्णराजी दिसत होती नारळी पोफळाची पाने कोवळ्या उन्हात चकाकनही होती बागेतील गुलाबाच्या पाकळ्यावर दवबिंदू जमले होते पक्षी मात्र कोठेच आढळले नाहीत टिपर आणि उपरच्या सतत होणाऱ्या खडखडाटामुळे त्या बिचाऱ्यानी येथून स्थलांतर केले असावे समुद्र किनाऱ्यावरील रेशमी वाळूत पाय रुतवून चालताना मोठी गम्मत वाटते एखादी खोडकर लाट न कळत चालून येते आणि पायाला हळूच गोंजारुन जाते. मोठे विलोभनीय दृष्य! मला कुसुमाग्रज आठवतात

'अनंत अमुची ध्येयासक्ती
अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला'

रेडीला आल्यानंतर डोंगरी दुर्ग तेरेखोल न पहाता परत जाणे म्हणजे पश्चिम किनाऱ्यावरील त्या महान पहारेकऱ्याचा अवमान केल्यासारखे होणार नाही का ? आमच्या समोरच्या रस्त्याला म्हणजे रेडी रे रेवस या मार्गाला 'स्मगलर्स हायवे अर्थात अतुले मार्ग' असे नामाभिधान आहे हे समजताच आम्ही मनमोकळेपणाने हसून घेतले व असे नामकरण करणाऱ्या व्यक्तीला धन्यवाद दिले पत्रकाराच्यापेक्षा हा माणूस कल्पक बुद्धिचा वाटला! ज्या मार्गाने जायचे नाही त्यांची वाट पुसाच कशाला ?

आम्ही वेगळ्याच मार्गाने किल्ले तेरेखोलकडे निघालो. उजव्या बाजूला अतिशय खोल अशी गोगटे माईन्सची खाण होती खाणीच्या पोटात पॉवर शॅवेल (यांत्रिक फावडा) शिरत होता आणि पिवळ्या मोटारी लोहकण घेऊन समुद्राकडे धावत होत्या रोज सोन्याचे अंडे देणारी ही हंस पक्षीण कुतूहलाने पहात आम्ही तेरेखोलच्या किल्ल्याकडे निघालो.

लाल मातीची आणि खाच खळग्यांची सडक संपून आता काळाभोर डांबरी रस्ता लागला आणि आमच्या लक्षात आले की, महाराष्ट्राची हद्द संपून आम्ही आता गोवा, दीव व दमणच्या हद्दीत प्रवेश केलेला आहे. रस्त्यांचे आणि महाराष्ट्र शासनाचे काय वाकडे आहे समजत नाही रस्ते खराब ठेवणे हीच त्यांना गौरवशाली परंपरा वाटत नसावी म्हणजे मिळ-वली ! डाव्या हाताला तेरेखोलचे चर्च स्वागतास उभे होते. त्याला ओलांडून एक छोटीशी चढण घेऊन आमची गाडी एका वडाखाली थांबली समोरच तेरेखोलचा डोंगरी किल्ला उभा होता त्यातील बालेकिल्ल्यावरच्या बुरुजावर तिरंगी राष्ट्रध्वज डौलाने फडकत होता. त्याला मानवंदना करून आम्ही किल्ल्याच्या परिसरात पाऊल ठेवले पहिली आठवण झाली हुतात्मा हिरवे गुरुजींची ! १९५५ साली गोमंतक मुक्ती आंदोलनाच्यावेळी ऑगस्ट महिन्यात पनवेलच्या हिरवे गुरुजींनी या किल्ल्यावर तिरंगा ध्वज फडकविण्याचा प्रयत्न केला त्यावेळी पोर्तुगीज सैनिकांनी या किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळच त्यांना गोळी घालून ठार केले पोर्तुगीजांच्या गुलामगिरीविरूद्ध लढताना हिरवे गुरुजींनी प्राणार्पण केले पण दुर्दैवाने आज त्या ठिकाणी स्मारक म्हणून एक पणती पेटलेली नाही त्यांच्या नावाने तेथे एक चिरा उभारण्यात आलेला नाही ! या उलट ९ डिसेंबर १९७६ रोजी या सुंदर किल्ल्याचे 'थ्री स्टार' हॉटेलमध्ये रूपांतर करून हे पर्यटन केंद्र म्हणून जाहीर करण्यात आले व तशी पाटी तेथे लावण्यात आली आहे आणि त्या पाटीवर सौ शशीकला काकोडकर यांचे 'शुभनाम' कोरण्यात आलेले आहे ऐतिहासिक वास्तूस हॉटेल-खानावळीत रूपांतर करणाऱ्या शशिकला बाईंच्या सरकारचे काय गुणवर्णन करावे ? त्यातर महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाच्या मुख्यमंत्री होत्या

१८ व्या शतकाच्या प्रारभी मराठयानी हा किल्ला बांधला गोमत-काच्या मुख्य भूमीपासून वेगळा व महाराष्ट्राशी सलग्न अशी या किल्ल्याची रचना आहे. गोमतक आणि तेरेखोल किल्ला यामधून तेरेखोल ही नदी वहाते व समुद्राला जेथे मिळते तेथेच एका डोंगराच्या कड्यावर हा किल्ला बाधण्यात आलेला आहे गोमतकाच्या इतिहासात तेरेखोलच्या किल्ल्याला तसे विशेष महत्त्व नाही. महत्व आहे फोंड्याच्या किल्ल्याला जो किल्ला सभाजी राजानी एकदा जिकला होता (१६८३) आणि दुसरा महत्वाचा किल्ला म्हणजे पणजीजवळ असलेला अग्वादचा किल्ला होय। १९५५ साली त्यापूर्वी झालेल्या मुक्ती सग्रामात ज्यांनी ज्यानी भाग घेतला त्या स्वातत्र्यवीराना या किल्ल्यात कैदी म्हणून ठेवण्यात आले होते साथी मधू लिमये, कॉ राजाराम पाटील, जगन्नाथराव जोशी इत्यादी विविध पक्षीय सत्याग्रहीच्या अस्तित्वाने हा किल्ला पावन झालेला आहे तसाच तो अगदी अलिकडे स्मगलर वाखियाच्या नाटचपूर्ण पलायनामुळे गाजला आहे या किल्ल्यात गोवा सरकारचा जेल आहे

तेरेखोलचे प्रवेशद्वार मोठे आकर्षक आहे लाल–पिवळ्या कर्दळीनी बहरलेली बाग ओलांडून आपण आत गेलात की एक मोठा दरवाजा लागतो• दरवाजा भक्कम असून त्याला बाहेरून अणकुचीदार पोलादी मोठे खिळे ठोकण्यात आलेले आहेत डावीकडील कमानीतून आत गल्यावर समोरच एक जुने चर्च दिसते हीच पोर्तुगीज सत्तेची एकमेव खूण साक्ष म्हणून उभी आहे चोहोबाजूला मजबूत तटबदी व दक्षिणेच्या बाजूने खाली समुद्रापर्यंत पोहोचण्यासाठी पायऱ्या केलेल्या आहेत येथून अथाग पसरलेला निळाभोर अरबी सागर आणि तेरेखोल नदीचे समुद्राला मिळणारे पात्र हा देखील भान हरपून टाकतो दूरवर पसरलेले गर्द हिरवे डोगर पिवळसर रगाचा अफाट समुद्रकिनारा, नदीत ये जा करणाऱ्या होड्या आणि दोन्ही तिरा-वरची सुरुची उच उच झाडे। नजर खिळून टाकणारे दृश्य येथून दिसते.

१८२५ साली पोर्तुगीजाच्या सत्तेविरुद्ध अनेक उठाव झाले त्यापैकी एक उठाव या किल्ल्यातून झाला. डॉ. बरनादी पेरेस डि-सिल्वा या नावाचे गोमतकीय गृहस्थ गोव्याचे गव्हर्नर जनरल म्हणून प्रथमच नेमण्यात आले त्यानी या तेरेखोल किल्ल्याच्या आश्रयाने पोतुगीजांच्या पाशवी सत्तेविरुद्ध

उठाव केला पण दुर्दैवाने त्यात त्याना यश आले नाही व या किल्ल्यात पोर्तुगीज लष्कराने अमानुष कत्तल करून उठाव चिरडून टाकला व १९५५ पर्यंत हा किल्ला ओसाड व निर्मनुष्यच राहिला होता प्रथम मराठ्यानी बांधलेला हा किल्ला १७४६ साली पोर्तुगीज सैन्याने जिंकून घेतला त्यानतर १७९४ साली मराठ्यांनी पुन्हा हल्ला चढवून किल्ला काही काळच आपल्या ताब्यात ठेवला व पुन्हा तेथे पोर्तुगीज सत्ता आली व १९६१ साली गोमतक मुक्त होईपर्यंत तो किल्ला त्यांच्याच अधिपत्त्याखाली राहिला

तेरेखोल किल्ल्याच्या आत, या बुरुजावरून त्या बुरूजावर धावपळ करीत असताना गोमतकाच्या इतिहासात व किल्ल्याच्या जीवनात झालेल्या चढउतारीचा आलेख आपोआप तयार होत होता या किल्ल्याला माझी ही दुसरी भेट होती

दुपारचे उन्ह वाढू लागले कपाळावर घाम जमू लागला गोमत-काच्या भूमीतील या ऐतिहासिक वास्तूचा निरोप घेऊन आम्ही परत गोगटे माईन्सच्या अतिथीगृहाकडे परत आलो रस्त्याच्या डाव्या बाजूला प्रचड खोल खाणी होत्या मेकॅनिज गोल्ड या इग्रजी चित्रपटाची आठवण यत होती. पूर्वी उच डोंगरमाथा असलेल्या ठिकाणी आता प्रचड विवरे तयार झाली होती कामगाराच्या अफाट श्रमशक्तीचे व त्याना मार्ग-दर्शन करणाऱ्या बुद्धिमान अभिनेत्यांचे मनोमन अभिनदन करीत पुन्हा तो परिसर पहात पहात आम्ही मुक्कामाला आलो अतिथीगृहाच्या व्हरांड्यातून समोर पाहीले तर दूरवर निळ्या सागरात प्रचड बोटी उभ्या आहेत तेथील लोहकण घेऊन त्या जपान, अमेरिका, रूमानिया इत्यादी देशाना जाणार आहेत

पुन्हा प्रश्न पडला की आमच्या देशातील खनिजे बाहेरच्या देशाना पाठविणे योग्य की अयोग्य, असे एकच का लाख प्रश्न आहेत की ज्यांची उत्तरे पत्रकारानी मिळविली पाहिजेत आयात निर्यात हा देशाच्या अर्थ-रचनेचा अविभाज्य भाग आहे ज्या देशाची निर्यात जास्त व आयात कमी तो समृद्ध समजला जातो भारत काही प्रमाणात समृद्ध होऊ लागला आहे विचाराचे द्वद मनात उसळत असतानाच आम्ही अतिथीगृहाचा आणि तेथील मित्राचा निरोप घेऊन बेळगावकडे निघालो सूर्य मावळायच्या आत आम्हाला आंबोलीवर पोहोचायचे होते. व समुद्रात मावळणारा सूर्य डोळे भरून पहायचा होता

❋ ❋

११ ·

# विज्ञान आणि आध्यात्माची दोन पीठे कोनार्क–जगन्नाथपुरी

कोनार्कचे सूर्यमंदिर म्हणजे ओरिसा राज्यात तेराव्या शतकात विकसित झालेल्या विज्ञानाचे आणि शिल्पकलेचे सर्वोत्तम उदाहरण आहे विज्ञान आणि कलेचा येथे अप्रतिम संगम आहे. इतकी भव्य, इतकी नाजुक शिल्पकृती भारतात अन्यत्र क्वचितच असेल !

रात्रीचे ९ वाजून गेले होते. एका लहानशा डांबरी सडकेने कोनार्क येथील पांथ निवासाच्या दिशेने आम्ही निघालो होतो विशाखापट्टणमपासून भुवनेश्वर व भुवनेश्वराहून मोटारने असा सतत प्रवास केल्यामुळे अंग ठणकत होते वाटेत दुपारचे जेवणही चुकले होते, त्यामुळे पांथ–निवासात विश्रांती घेण्यासाठी म्हणून झपाझप पावले उचलण्याचा प्रयत्न करीत होतो. पण वेगाने चालवत नव्हते रस्ता निर्मनुष्य होता रात्र अंधाराची होती दूर अंतरावर पांथ निवासाचे दिवे दिसत होते पांथ निवास हे ओरिसा सरकारने बांधलेले विश्रामधाम खास कोनार्कला येण्यासाठी होते गर्दी अशी विशेष नव्हती चांगली प्रशस्त खोली मिळाली तसेच मासाचे कालवण आणि भरपूर गरम भात मिळाला सरकारच्या प्रवासी विभागाला मन पूर्वक धन्यवाद देत जेवण उरकून घेतले आणि मनसोक्त झोप घेतली. पहाटे पाचपूर्वी येथून तीन किलोमीटर लांब असलेला समुद्रकिनारा

गाठावयाचा होता व पूर्व सागरात दिसणारे उगवत्या सूर्याचे दर्शन घ्यावयाचे होते

पहाटे चार वाजता पांथ निवासाच्या शिपायाने बाबूजी, बाबूजी ' अशा गोड हाका मारून जाग आणली थोड्याच वेळात आम्ही बाहेर निघालो सर्वत्र काळोखाचे साम्राज्य पसरले होते पूर्वेला शुक्र आपल्या पूर्ण तेजाने चमकत होता उत्तरेला सप्तर्षी कसे छान दिसत होते सवयीनुसार ध्रुव तारा शोधायला वेळ लागला नाही आणखी काही नक्षत्राचा शोध घेत समुद्राच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याने पायीच निघालो रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुरूची उंच झाडे ओळीत उभी होती. मंद वाऱ्याने सुरूच्या पानातून एक कर्णमधूर शीळ ऐकू येत होती पक्षीगण अजून जागे झाले नव्हते पायाखालचा रस्ता अस्पष्ट दिसत होता रस्ता कच्चा असल्याने अनेकवेळा ठेचकळावे लागत होते कसलाच आवाज कोठे ऐकू येत नव्हता खडीच्या रस्त्यावर आमच्याच पावलाचा आवाज काय तो उमटत होता वाटेत चहा घेऊन पुढे निघालो समुद्राच्या प्रचंड लाटांचा आवाज अगदी स्पष्टपणे ऐकू येत होता हळूहळू सायकल रिक्षातून काही मंडळी येऊन पोहोचली. बहुतेक ते बंगाली असावेत काही मोटारीही येऊ लागल्या त्या अफाट किनाऱ्याजवळ काळोखात तसे चेहरे अस्पष्टच दिसत होते पूर्व क्षितीजावर किंचित लाली दिसत होती कृष्ण पक्षातल्या एकादशीचा चंद्र मलूल झाला होता शुक्र बुध चमकत होते शनि रंग फिर-वित होता प्रचंड फेसाळ लाटा किनाऱ्यावर फुटत होत्या, गर्जत होत्या पश्चिम क्षितीज काळेभोर दिसत होते हळू हळू सारे स्पष्ट दिसू लागले कोळ्याच्या होड्या शिडाचे निशाण उंचावून समुद्रात जात होत्या एक, दोन, तीन, चार, मोजता मोजता साठ सत्तर तरी होड्या दिसू लागल्या पूर्व क्षितीज अधिक तेजस्वी झाले शुक्राची चांदणी तेज हरवून बसली शोधून सुद्धा ती लवकर दिसेना मंद होत होत ती केव्हा लुप्त झाली कोण जाणे ! आकाशाच्या अंगणातील तारकांची अनंत फुले रवि किरणाच्या केरसूणीचे केव्हाच झाकून टाकली गेली विश्वाचे अंगण आता कसे लख्ख दिसू लागले पण सूर्याचा अजून

पत्ताच नव्हता प्रभाकरला मी म्हणालो बघ आज सूर्यच उगवणार नाही आणि खरोखरच तसे झाले तर काय मजा होईल नाही ? आम्ही पूर्वेकडे पहात कल्पना करीत राहिलो तोच सागराच्या क्षितीजावरून लालबुंद सूर्यबिंब हळू हळू वर येऊ लागले जणू काय सूर्य पहिल्यादाच पहात आहोत अशा भावनेने आम्ही सागर किनाऱ्यावरील वाळूत उड्या मारल्या. मऊ रेशमासारखी वाळू होती समोर निळाभोर सागर पसरला होता वातावरण अत्यंत प्रसन्न होते काही भाविक चंद्रभागेत स्नान करीत होते आतापर्यंत मला पंढरपूरची चंद्रभागाच तेवढी माहित होती आता येथे एक लहानशी चंद्रभागा आहे ती या ठिकाणी समुद्राला मिळते. आम्ही मनसोक्त सूर्यदर्शन घेतले, पश्चिमेच्या अरबी समुद्रात मावळणारा सूर्य मुंबईच्या मलबार हिलवरून अनेक वेळा पाहिला आहे पण बंगालच्या उपसागरात उगवणारा सूर्य आज प्रथमच पहात होतो थोड्याच वेळात सूर्य बराच वर आला. परत मागे जाणे भाग होते तांबड्या मातीच्या सडकेने पांथ निवासाकडे निघालो सरळ रेषेत जाणाऱ्या रस्त्याने पहाटे आलो त्यावेळी केवळ अंधारच होता. आता चांगलेच उजाडले होते रस्त्याच्या दोन्ही बाजुला पाणी साचलेले होते कांही ठिकाणी कमळे फुललेली होती. सुरुच्या मोठ्या बागा लांबपर्यंत पसरल्या होत्या चिमण्यांचे थवे टेलिफोनच्या तारावर विसावले होते आममत न्याहाळीत आम्ही सावकाश चाललो होतो. कोनार्कच्या सूर्यमंदिरात जाण्यासाठी आम्ही आतूर होतो ते पाहून मग जगन्नाथपुरीकडे प्रयाण करायचे होते

## देऊळ पहावयास निघालो

अगदी जवळ येईपर्यंत देवालयाची कांही कल्पना आली नाही महालासारख्या भव्य डाकबंगल्याला डावीकडे सोडून वळण घेताच एक तलाव लागला, बारकी पोरे काठ्या घेऊन मासे पकडण्याचा प्रयत्न करीत होती सर्वत्र वाळूच वाळू ! दोन्ही बाजूला वाळूचे ढिगारे आणि मधल्या भागात काळे नक्षीदार सूर्यमंदिर ! इंग्रजी प्रवासी या मंदिराला Black pogoda म्हणत प्रथमदर्शनी तरी माझा मोठा भ्रमनिरास झाला रस्ता सोडून आता पाऊलवाटेने मंदिराकडे निघालो सर्वत्र वाळू होती झाडा-

झाडपानी रस्ता असा शिल्लकच ठेवला नव्हता पूर्वेच्या बाजूने त्यात प्रवेश केला तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी पडे प्रवाशाची वाटच पहात असतात त्याप्रमाणे अशा ठिकाणी 'गाईड' नावाचा प्राणी वाट पहात असतो मानधनाबाबत थोडी घासाघीस केल्यावर एका गाईडबरोबर देऊळ पहावयास निघालो गाईड सरावानुसार बराच बोलका होता इतिहास, पुराणे आणि दतकथा इत्यादिच्या मिश्रणाने यथेच्छ गप्पा मारणे हा त्याचा रोजचाच धदा असल्याने, त्याला प्रती प्रश्न विचारण्याच्या भरीला न पडलेले बरे असे ठरवून त्याचे सागणे फक्त ऐकत राहिलो. कपिल सहिता, प्राची महात्मा भविष्य पुराण, साब पुराण इत्यादिच्या आधारे त्याने सागितलेली कथा मात्र अत्यत मनवेधक होती.

## भारतातील कथा

महाभारतात कृष्ण–जाबुवताचे युद्ध होते व त्यात जांबूवताचा पराभव होतो म्हणून पराभूत झालेला जाबुवत आपली कन्या जाबवती कृष्णाला देऊन त्यांचा विवाह करतो कृष्ण–जाबवती याच्यापासून त्यांना साब नावाचा पुत्र होतो व तो अतिशय बलवान व देखणा असतो आपल्या देखणेपणाच्या गर्वात तो नारदमुनीचा अपमान करतो नारद धूर्त असल्यामुळे तो अपमान सहन करतो व बोलत बोलत सांबाला त्याची सावत्र आई ज्या ठिकाणी स्नान करीत असते त्या ठिकाणी घेऊन येतो ती कृष्णपत्नी त्याच्यावर खुष होते त्याच वेळी नारदमुनी श्रीकृष्णाला बरोबर घेऊन त्याठिकाणी येतो समोरचे दृश्य पहाताच कृष्णाचा राग अनावर होतो व शाप देऊन पुत्राला तो महारोगी बनवतो पण थोडयाच वेळात हे सारे नारदामुळे घडले हे लक्षात येते पण शाप मागे घेता येत नाही मग कृष्ण सांबाला मित्रवनातील चद्रभागेच्या तिरी जाऊन सूर्योपासना करण्याचा उपदेश करतो व त्याप्रमाणे बारा वर्षे तेथे वास्तव्य केल्यानतर साबाला आपले पूर्वीचे बळ आणि सौन्दर्य प्राप्त होते त्याचवेळी सांब याठिकाणी सूर्यमदिर उभारण्याचा सकल्प सोडतो आजही केवळ ३ किलो मिटर लांबीची चद्रभागा येथून वहाते व माघ वद्य सप्तमीला भाविक या ठिकाणी सूर्योदयापूर्वी स्नान करतात

सांबाच्या संकल्पनेप्रमाणे त्यानेच कोनार्कचे सूर्यमंदिर बांधले याला काही पुरावा नाही पण सूर्य ही आरोग्य देणारी व इच्छापूर्ण करणारी देवता असल्याने पुढे कोणी तरी हे प्रचंड देवालय बांधले असले पाहिजे गगवंशातील लांगुला नरसिंहदेव या राजाने इ स १२२५ मध्ये हे देवालय बांधले असल्याचा मात्र पुरावा आहे कदाचित प्राचीन काळी येथे असलेल्या लहानशा गर्भगुडीवर ही प्रचंड शिल्पाकृति या राजाने बांधली असावी त्या काळचे हिंदू ब्राम्हण सूर्याची पूजा करावयास तयार नसल्याने इराणमधून सूर्यभक्त ' मग ' येथे बोलावून घेतले होते व ते सूर्याची पूजा करीत असत असेही सांगितले जाते सध्या अस्तित्वात असलेली सूर्यदेवाची मूर्ति मात्र पहाण्यासारखी आहे उभी, उंच,रेखीव मूर्ति, पायात मोजे,कमरपट्टा मुकूट, धोतर व ही सध्याकाळच्या सूर्यदेवाची मूर्ति असल्याने चेहरा कोमेजलेला आहे सूयदेवाच्या अनेक मूर्ती तेथे आढळतात पण मुख्य देवालय बंद असल्याने आत काय आहे हे सागणे कठीण आहे

## विज्ञान आणि शिल्पकलेचे सर्वोत्तम उदाहरण

कोनार्कचे सूर्यमंदीर म्हणजे ओरिसा राज्यात १३ व्या शतकात विकसित झालेल्या विज्ञानाचे आणि शिल्पकलेचे सर्वोत्तम उदाहरण आहे विज्ञान आणि कलेचा येथे अप्रतिम संगम आहे इतकी भव्य, इतकी नाजूक शिल्पकृति भारतात अन्यत्र क्वचितच असेल ! ओरिसाच्या पुरी जिल्ह्यातील कोनार्क हे लहानसे खेडे आहे बंगालच्या उपसागरात जमिनीचे एक टोक पुढे जाऊन येथे एक त्रिकोण तयार झाला आहे म्हणून त्रिकोणातला सूर्य म्हणजे कोनार्क होय कोनार्कचे मंदिर म्हणजे एक अतिप्रचंड रथ आहे या रथाला चोवीस चाके आहेत म्हणजे बारा महिन्याचे कृष्ण पक्ष व शुक्ल पक्ष असे चोवीस भाग पडतात म्हणून चोवीस चाके एक वर्ष २४ भागात विभागले आहे आठवड्याचे सात दिवस म्हणून रथाला सात घोडे जोडलेले आहेत रथाच्या चाकाचे आठ भाग केले आहेत म्हणजे ३ तासाचा एक प्रहर या हिशेबाने चोवीस तास ८ प्रहरात विभागले आहेत म्हणून चाकाला आठ आरे आहेत चाकाचा आस वीतभर बाहेर आहे उगवत्या सूर्याची किरणे आसावर पडली म्हणजे त्याची सावली पश्चिमेच्या आरीवर पडते व त्यावेळी ६ वाजले असे धरले तर सूर्य जसजसा वर येत जाईल

त्यानुसार आसाची सावली खाली घसरत येते व बारा वाजता ती सरळ रेषेत येते अशा प्रकारे एक घड्याळच रथाच्या चाकात तयार झाले आहे अर्थात पावसाळ्यात ढग असल्याने आणि रात्रीच्या वेळी अधार असल्याने अशा चाकाद्वारे काल–मापन नेहमीच होते असे नाही. मात्र त्यादिशेने झालेला हा वैज्ञानिक प्रयोग गौरवास्पद आहे असेच म्हटले पाहिजे. १२७ फूट उंचीच्या या देवालयाचे बांधकाम दगडाला दगड जोडून झालेले आहे कोठेही चुना वगैरे नाही मात्र कोपरे जोडताना सांध्यात लोखंड व शीसे घातलेले दिसते त्यावेळी लोहचुंबक माहित होते व कळस हा प्रचंड लोहचुंबकाचा बनविण्यात आला होता सूर्यदेवाची धातूची मूर्ति वर आणि खाली लोहचुंबक ठेवून अधांतरी ठेवण्याची किमया या मंदिरात करण्यात आली होती असे म्हणतात १५५९ साली पोर्तुगिज सैन्याने हल्ला करून या देवालयाच्या शिखरावर असलेला ५२ टन वजनाचा लोहचुंबकाचा कळस काढून नेला कारण भारताच्या किनाऱ्या किनाऱ्याने जाणाऱ्या पोर्तुगिज जहाजाचा कंपास (होकायंत्र) देवळावरच्या लोहचुंबकाच्या प्रभावाने चुकीचे मार्गदर्शन करु लागला व ती जहाजे बंगालच्या उपसागरात रस्ता चुकून भलतीकडेच जाऊ लागली

## संभोग शिल्पकृती प्रवाशाचे आकर्षण

कोनार्क देवालयाचा मुख्य दरवाजा कायमचा बंद आहे कारण देवालयाचा कळस काढून तेथून वाळू आणि दगड भरून ते देऊळ कायमचे बंद करण्यात आले आहे दुरुस्तीचा प्रयत्न फार मोठ्या खर्चाचा असल्याने केंद्र सरकारने त्यात लक्ष घातले नसावे पण साधारणपणे दोनशे वर्षापूर्वी हे देऊळ अर्धे अधिक वाळूत रुतून बसले होते काही भागावर तर झाडे वाढली होती त्यावेळी ओरिसाचा हा भाग बंगालला जोडलेला होता व त्यावेळच्या गव्हर्नराच्या आदेशानुसार थोडी फार डागडुगी झाली होती अजूनही सरकारचे म्हणावे तेवढे लक्ष या वास्तूकडे नाही

देवळाच्या प्रवेश दारातच हत्तीने माणसाला सोंडेत पकडले आहे व एक सिंह त्या हत्तीवर हल्ला करीत आहे असे शिल्प एका प्रचंड शिळेवर कोरलेले आहे हत्ती म्हणजे धन, सिंह म्हणजे शक्ती धन आणि शक्ती

माणसावर हल्ला करतात असाही अर्थ येथे अभिप्रेत आहे असे आमच्या गाईडचे म्हणणे आहे. प्राण्यामध्ये हरण, मोर, बदक, रेडा यांचीही चित्रे कोरलेली आहेत. गोवर्धन पर्वत उचलणाऱ्या कृष्णाची छान कोरीव शिल्पाकृती आहे नागसर्पांचे संभोग चित्रही आहे. चिनी ड्रॅगान सारखा प्राणी, मत्स्यकन्या यांचाही अंतर्भाव शिल्पात आहे पण कोनार्कचे शिल्प यासाठी मुळीच प्रसिद्ध नाही. ते प्रसिद्ध आहे मुख्यत त्या देवालयाच्या चोहोबाजूला असलेल्या अनेक संभोग शिल्पकृतिसाठी ! कामसूत्राच्या आधारावर (Erotic Sculptures) संभोगमूर्ति बनविण्यात आलेल्या आहेत व प्रवाशाचे ते एक आकर्षण आहे मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी हे उघडे नागडे शृंगार कशासाठी हा एक मोठा संशोधनाचाच प्रश्न आहे काहीचे म्हणणे असे की, असा शृंगार पाहून देखील ज्याचे मन चळत नाही अशा भाविकानीच आत प्रवेश करावा. म्हणून अशी चित्र कोरलेली आहेत काहींच्या मते त्या काळात बुद्ध व जैन धर्माच्या प्रभावामुळे गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याची भावना मारून टाकण्यात आली होती व भिक्षूक व भिक्षूकिणी यांचा सुळसुळाट झाला होता हे देशाच्या व राज्याच्या दृष्टीने धोक्याचे होते म्हणून गृहस्थाश्रमातले शृंगार दाखवून तरुणाना कुटुंबवत्सल बनविण्याच्या उद्देशाने अशी शृंगार चित्रे सर्व देवळावर कोरण्यात आलेली आढळतात

एकंदरीत कोनार्कचे सूर्यमंदिर पाहून माणसाची मती गुंग झाली नाही तरच नवल या मंदिराशेजारीच एक पुराणवस्तू भांडार असून तेथेही या मंदिराच्या परिसरात सापडलेले अनेक जुने अवशेष सांभाळून ठेवलेले आहेत हे सारे पाहून डोके भणाणून गेले हे सारे करण्यामागील उद्देश तरी कोणता असावा याचा अंदाज मी अजून बांधू शकलो नाही. पण या मंदिराच्या परिसरातून पाय काढता घेऊन दुसरीकडे जाणे माझ्या जीवावर आले कितींदा पाहिले तरी पुन्हा पहावेसे वाटणारे हे शिल्प स्मृतिपटलावर कोरून ठेवून आम्ही या ठिकाणचा निरोप घेतला. भार्गवी, सुभद्रा इत्यादी नद्या ओलांडून पिपिरी मार्गे जगन्नाथपुरीच्या दिशेने आम्ही निघालो

# जगन्नाथपुरी

जगन्नाथपुरीच्या स्टँडवर, बस येऊन थांबली आणि वाळू धुळीचा एक लोट अंगावर आला बकाल उपहारगृहाची रांक शेजारीच होती बटाट्याची भाजी आणि पुऱ्या येथेही होत्याच न्याहरी आटोपून आम्ही सायकल रिक्षातून देवळाकडे निघालो रस्ता भरपूर रुंद होता गर्दी तशी फारशी नव्हती बऱ्याच सायकल रिक्षा रेंगाळत होत्या नीट नेटके कपडे घातलेले स्थानिक लोक कोणी दिसत नव्हते दारिद्र्याचे दर्शन हे या गावातले प्रथम दर्शन ! अर्थात यासाठी येथे येण्याची तशी आवश्यकता नाही ते भारतात कोठेही होऊ शकते देवालयासमोर नेहमीप्रमाणे भिकाऱ्यांची वस्ती चप्पल आणि कॅमेरा आत घेऊन जाण्याची मनाई असल्याने या दोन्ही वस्तू बाहेरच ठेऊन जावे लागते जळ तेथे मासा त्याप्रमाणे देऊळ तेथे पंडे हे वेगळे सांगण्याची गरज नाही रिक्षातून खाली उतरायची पुरसत एका तरुण पंड्यांने आम्हाला गाठलेच. ऐन विशीतला हा तरुण होता, कपाळावर केशरी गंधाचा टिळा, डोक्यावर गांधी टोपी, अंगात सदरा आणि आखूड धोतर असा त्याचा पेहराव होता रंगाने सावळा, गोड बोलणारा असा तो तरूण होता त्याने विचारायच्या अगोदरच आम्ही सांगून टाकले 'बाबारे ! आम्ही तुला फक्त पाच रुपये देऊ, अधिक काही नाही जे काय दाखवायची तुझी इच्छा असेल ते दाखीव प्रभाकरने खुलासा केला 'हे बघ ! या जगात परमेश्वर वगैरे कोणी तरी आहे असे आम्ही मुळीच मानीत नाही आम्ही मानतो तुला एक तरूण म्हणून याहून चांगले काम तुला मिळत नसल्यामुळे तू हे काम करतोस याची आम्हाला कल्पना आहे' तो तरुण पंड्या वस्ताद होता तो म्हणाला, 'बाबूजी आप लोग बम्बईसे आये हैं न ? वैसा तो यहाँ क्या देखना है ? समुदरमे पानी है, फत्तरका मंदिर हैं और लकडीका देव है ! यहाँ आपके लिये कुछ नही बाबूजी तो भी चलिये मंदिर तो देखिये!' आम्ही आत गेलो प्रवेशद्वार ओलांडताच प्रसादाचे दुकान लागले आसपास तुलसीदल, फुले, कमळे होती देवालयाच्या उत्तुंग शिखराकडे पहात पहात आम्ही आत प्रवेश केला आवार तसे स्वच्छ होते भाविकांनी भलतीच गर्दी केली होती

माणसावर हल्ला करतात असाही अर्थ येथे अभिप्रेत आहे असे आमच्या गाईडचे म्हणणे आहे. प्राण्यामध्ये हरण, मोर, बदक, रेडा याचीही चित्रे कोरलेली आहेत. गोवर्धन पर्वत उचलणाऱ्या कृष्णाची छान कोरीव शिल्पाकृती आहे नागसर्पांचे सभोग चित्रही आहे. चिनी ड्रॅगान सारखा प्राणी, मत्स्यकन्या याचाही अतर्भाव शिल्पात आहे पण कोनार्कचे शिल्प यासाठी मुळीच प्रसिद्ध नाही. ते प्रसिद्ध आहे मुख्यत त्या देवालयाच्या चोहोबाजूला असलेल्या अनेक सभोग शिल्पकृतिसाठी ! कामसूत्राच्या आधारावर (Erotic Sculptures) सभोगमूर्ति बनविण्यात आलेल्या आहेत व प्रवाशांचे ते एक आकर्षण आहे. मदिरासारख्या पवित्र ठिकाणी हे उघडे नागडे शृन्गार कशासाठी हा एक मोठा सशोधनाचाच प्रश्न आहे काहींचे म्हणणे असे की, असा शृन्गार पाहून देखील ज्याचे मन चळत नाही अशा भाविकानीच आत प्रवेश करावा. म्हणून अशी चित्र कोरलेली आहेत काहींच्या मते त्या काळात बुद्ध व जैन धर्मांच्या प्रभावामुळे गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याची भावना मारून टाकण्यात आली होती व भिक्षूक व भिक्षूकिणी याचा सुळसुळाट झाला होता हे देशाच्या व राज्याच्या दृष्टीने धोक्याचे होते म्हणून गृहस्थाश्रमातले शृन्गार दाखवून तरुणांना कुटुबवत्सल बनविण्याच्या उद्देशाने अशी शृगार चित्रं सर्व देवळावर कोरण्यात आलेली आढळतात

एकदरीत कोनार्कचे सूर्यमदिर पाहून माणसाची मती गुग झाली नाही तरच नवल या मदिराशेजारीच एक पुराणवस्तू भाडार असून तेथेही या मदिराच्या परिसरात सापडलेले अनेक जुने अवशेष साभाळून ठेवलेले आहेत हे सारे पाहून डोके भणाणून गेले हे सारे करण्यामागील उद्देश तरी कोणता असावा याचा अंदाज मी अजून बाधू शकलो नाही पण या मदिराच्या परिसरातून पाय काढता घेऊन दुसरीकडे जाणे माझ्या जीवावर आले कितींदा पाहिले तरी पुन्हा पहावेसे वाटणारे हे शिल्प स्मृतिपटलावर कोरून ठेवून आम्ही या ठिकाणचा निरोप घेतला भार्गवी, सुभद्रा इत्यादी नद्या ओलांडून पिपिरी मार्गे जगन्नाथपुरीच्या दिशेने आम्ही निघालो

# जगन्नाथपुरी

जगन्नाथपुरीच्या स्टँडवर, बस येऊन थाबली आणि वाळू धुळीचा एक लोट अगावर आला बकाल उपहारगृहाची राक शेजारीच होती बटाट्याची भाजी आणि पुऱ्या येथेही होत्याच न्याहरी आटोपून आम्ही सायकल रिक्षातून देवळाकडे निघालो रस्ता भरपूर रुद होता गर्दी तशी फारशी नव्हती बऱ्याच सायकल रिक्षा रेंगाळत होत्या नीट नेटके कपडे घातलेले स्थानिक लोक कोणी दिसत नव्हते. दारिद्र्याचे दर्शन हे या गावातले प्रथम दर्शन ! अर्थात यासाठी येथे येण्याची तशी आवश्यकता नाही ते भारतात कोठेही होऊ शकते देवालयासमोर नेहमीप्रमाणे भिकाऱ्यांची वस्ती चप्पल आणि कॅमेरा आत घेऊन जाण्याची मनाई असल्याने या दोन्ही वस्तू बाहेरच ठेऊन जावे लागते जळ तेथे मासा त्याप्रमाणे देऊळ तेथे पडे हे वेगळे सागण्याची गरज नाही रिक्षातून खाली उतरायची पुरसत एका तरुण पड्याने आम्हाला गाठलेच. ऐन विशीतला हा तरुण होता. कपाळावर केशरी गधाचा टिळा, डोक्यावर गाधी टोपी, अगात सदरा आणि आखूड धोतर असा त्याचा पेहराव होता रगाने सावळा, गोड बोलणारा असा तो तरूण होता त्याने विचारायच्या अगोदरच आम्ही सागून टाकले 'बाबारे ! आम्ही तुला फक्त पाच रुपये देऊ, अधिक काही नाही जे काय दाखवायची तुझी इच्छा असेल ते दाखीव प्रभाकरने खुलासा केला 'हे बघ ! या जगात परमेश्वर वगैरे कोणी तरी आहे असे आम्ही मुळीच मानीत नाही आम्ही मानतो तुला एक तरूण म्हणून याहून चागले काम तुला मिळत नसल्यामुळे तू हे काम करतोस याची आम्हाला कल्पना आहे' तो तरुण पड्या वस्ताद होता तो म्हणाला, 'बाबूजी आप लोग बम्बईसे आये हैं न ? वैसा तो यहाँ क्या देखना है ? समुदरमे पानी है, पत्तरका मदिर है और लकडीका देव है ! यहाँ आपके लिये कुछ नही बाबूजी तो भी चलिये मदिर तो देखिये !' आम्ही आत गेलो प्रवेशद्वार ओलाडताच प्रसादाचे दुकान लागले आसपास तुलसीदल, फुले, कमळे होती देवालयाच्या उत्तुग शिखराकडे पहात पहात आम्ही आत प्रवेश केला आवार तसे स्वच्छ होते भाविकानी भलतीच गर्दी केली होती

देशाच्या निरनिराळ्या भागातून गटागटाने आलेले प्रवाशी येथे काही महिने मुक्काम करतात व रोज दर्शन व भजनाचा कार्यक्रम असतो आम्ही आत शिरलो त्यावेळी देवाचा 'भोग' होता, त्यामुळे थोडा वेळ थांबावे लागले मंदिराची रचना, शिल्प, भव्यता व भाविकांची प्रचंड गर्दी न्याहाळत पंड्याबरोबर गप्पागोष्टी करीत वेळ घालवला जवळच देवस्थानतर्फे प्रसाद विकत देण्याची सोय होती ४ रुपयाचा प्रसाद खरेदी केला व देऊळ पहाता पहाता तो खाऊनही टाकला खास गाभाऱ्यात प्रवेश करून देवदर्शन करण्याची इच्छाही नव्हता आणि तेवढे पैसेही नव्हते पण भोग संपल्यावर प्रचंड दार उघडले गेले व आत आरती चाललेली पाहिली आतही खास लोकांची गर्दी होतीच गोंगाट खूपच होत होता या देवालयाच्या आवारात लहान लहान खूप देवालयें आहेत पौराणिक कथावर आधारलेले एक बाहुल्यांच प्रदर्शनही आहे. ते प्रदर्शन अगदीच पोरकट वाटल भाविकांच्या भावनांना आवाहन करुन पैसे उकळण्याचा तो एक केवळ धंदा आहे कोनार्कशी तुलना करता हे देऊळ अतिशय चांगल्या अवस्थेत आहे मोडतोड अगदीच कमी. दगड पांढुरका असल्याने याला White pagodo असेही म्हणतात आश्चर्य म्हणजे या देवालयात रतिक्रिडेत मग्न असलेल्या, युगुलाच्या शिल्पाकृति आढळून येतात प्रदक्षिणा घालताना भाविकांच्या नजरेस त्या स्पष्ट दिसतात आणि एखादे तरुण जोडपे प्रदक्षिणा घालीत असले तर असे दृष्य पाहून त्यांच्या भावना कशा चाळवल्या जातात हे आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे तरुण पंड्याही याबद्दल विशेष काही सांगू शकला नाही आद्य शंकराचार्यांनी स्थापन केलेल्या चारधामापैकी हे एक धाम या दृष्टीने भाविकांच्या मनात जगन्नाथपुरीबद्दल फार आस्था असते त्यामुळे येथे नेहमीच गर्दी असते. पण दुर्दैवाने मोठ्या देवस्थानाच्या गावातून दिसून येणारा बकालपणा, अस्वच्छता, गोंगाट, भामटेगिरी इत्यादि बाबतीत हे स्थान काही अपवाद नाही

देवळापासून समुद्र अगदीच जवळ जेमतेम एक किलो मिटरचे अंतर असावे चालतच निघालो बोळासारखा चिचोळा रस्ता, महारोगी, भिकारी,

चालून जातो त्यांना चावून रक्तबबाळ करतो मोठ्या शौर्याने तो कुत्र्यांशी झुंजतो. शेवटी कुत्रे पराभूत होऊन राजाकडे येतात त्यावेळी त्याचे शेपूट दोन पायाच्यामध्ये गेलेले असते आश्चर्याने राजा हे पहातच असतो असा अनुभव आयुष्यात त्याला प्रथमच आला असल्याने तो संभ्रमात पडतो सावध होऊन तो आपल्या ससाण्याला जवळच झाडावर बसलेली कबुतरे दाखवतो व आज्ञेनुसार पाळीव ससाणा कबुतरांच्या दिशेने झेपावतो पण गमत अशी की झाडावरची कबुतरे, चिमण्या, भारद्वाज वगैरे पक्षी ससाण्याला घाबरत नाहीतच तर उलट आपल्या तीक्ष्ण नखानी आणि चोचीने ते ससाण्यावर हल्ला चढवितात अशा वेळी काय करावे हे राजाला कळत देखील नाही राजा माघारी फिरतो व नदीकाठी पूजेस बसलेल्या एका साधूला झालेला प्रकार सागतो साधू प्रत्यक्ष जागेवर येऊन पहातो तर काय अजूनही ससा तेथेच लढण्याच्या आवेशाने उभा आहे व झाडावरील कबूतरे आणि इतरही पक्षी तेथेच आहेत इतकेच नव्हे तर शिकारी कुत्री त्या दिशेने पुढे जाण्यास तयार नाहीत सर्व परिस्थिती साधूच्या लक्षात येते तो म्हणतो राजा, ही जागा अपूर्व आहे ! येथील मातीचाच गुण असा आहे की, येथील दुबळा माणूस देखील सबळावर हल्ला चढवील तेव्हा या ठिकाणी किल्ला बांध आणि नगरीची स्थापना कर राजाने किल्ला बांधला व तेथेच एक गाव वसविले हेच गाव पुढे विजयनगर म्हणून भारताच्या इतिहासात प्रसिद्ध पावले कृष्णदेवराय राजाने ४० वर्षे राज्य केले. उत्तरेस कृष्णेपासून दक्षिणेस सिलोनपर्यंत आणि पश्चिमेच्या अरबी सागरापासून पूर्वेच्या उप-सागरापर्यंत विजयनगरचे साम्राज्याचे सुवर्णयुग मानले जाते

हा इतिहास प्रसिद्ध कृष्णदेवराय गादीवर कसा आला ? याबद्दलची हकीकतही मोठी रोमांचकारी आहे कृष्णदेवराय हा २० वर्षांचा होता त्यावेळी त्याचा सर्वांत मोठा भाऊ विजयनगरच्या राज्यावर होता त्याचा मुलगा त्यावेळी केवळ ६ वर्षांचा होता आपला मृत्यू समिप आला आहे व मृत्यूनतर राज्य आपल्या मुलाला न मिळता ते आपला भाऊ कृष्णदेवराय याला मिळणार याबद्दल मोठ्या भावाच्या मनात एक जखम सलत होती म्हणून त्याने आपला मुख्य प्रधान सालुवा तिम्मा उर्फ आप्पाजी यास आज्ञा करून कृष्णदेवराय याचे डोळे काढून आणून दाखविण्यास फर्माविले त्यावेळी

हातात नंगी समशेर आणि निवडक सैनिक घेऊन मुख्यमंत्री कृष्णदेवराया याच्या निवासस्थानात येतात त्यावेळी कृष्णदेवराय विनवितो ' प्रधानजी, माझे डोळे काढून मला ठार करावे असा कोणता मी गुन्हा केला आहे मला राज्य तर मुळीच नको मी सन्यास घेऊन निघून जाईन तेव्हा मला जीवदान द्या !' कृष्णदेवरायाचे म्हणणे प्रधानजीला पटते व एका शेळीचे डोळे काढून ते कृष्णदेवरायाचे आहेत असे सांगून त्याने कृष्णदेवराय याचे प्राण वाचविले कालांतराने कृष्णदेवराय याचा भाऊ मरतो व शेवटी कृष्णदेवरायच विजयनगरचा सम्राट म्हणून गादीवर बसतो व तो तब्बल चाळीस वर्षे राज्य करतो !

असा हा सारा विजयनगर साम्राज्याचा आणि कृष्णदेवरायाचा इतिहास डोळ्यासमोर तरगू लागला व सध्याकाळी सात वाजता मी स्टेडियमवर विजयनगर सम्राट कृष्णदेवरायबद्दलचे ध्वनी आणि प्रकाश योजनेत सादर केले जाणारे नाट्य पाहण्यासाठी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहिले कन्नड भाषेचे ज्ञान तोकडे असल्यामुळे अडचण जाऊ नये म्हणून बेंगळूरचे माझे स्नेही श्री सोमसुदर शर्मा याना बरोबर घेतले होते स्टेडियमच्या मैदानात दोन तीन हजार खुर्च्या माडलेल्या होत्या. शिवाय खाली बसून देखील पाहण्याची व्यवस्था होती शक्य तेवढे पुढे जाऊन आम्ही जागा पटकावली ही हिवाळ्यातील सध्याकाळ असल्याने थडी चांगलीच जाणवत होती आकाश निरभ्र होते चतुर्थीची चद्रकोर निळ्या आकाशाला शोभा आणीत होती मैदानाच्या पलिकडे घनदाट झाडी असल्यामुळे एक वेगळेच वातावरण निर्माण झाले होते ध्वनीमुद्रिकेतून कर्नाटक सगीताचे मजुळ स्वर निघत होते मला राग तालाचे फार ज्ञान नाही नर्तकीचा पदन्यास आणि अभिनय यातला मी दर्दी नाही तरी मला हे सारे आवडते म्हणून तर मी येथे आलो क्षणमात्र सारे दिवे मालविले गेले आणि समोर पाहतो तर डाव्या हाताला एक मशिद आहे त्याच्या बाजूला एक मंदिर आहे झाडावर एक क्रूस दिसतो आहे अगदी समोर राजमहलातले एक दालन आहे. लगेच बाजारातला एक भाग दिसतो आहे उजव्या बाजूला विरुपाक्षाचे एक प्रचड गोपूर दिसते आहे केवढा हा प्रचड रगमच !

नर्तकीच्या पायातले घुघरु छुमछुमले तिरुपतीच्या बालाजीची आरती सुरू झाली. मृदंगावर थाप पडली, घाट घणघणली. टाळयांची साथ मिळाली

आणि संस्कृतातून मंत्रोच्चार सुरु झाले असा हा शानदार नाटकाचा प्रारंभ झाला. तिरुपतीची आरती ही बहुतेक नाटकाची नांदी असावी आता प्रकाश झोत विजयनगरच्या बाजारावर टाकण्यात आला सुती, रेशमी आणि भरजरी कापडयाची विक्री तेथे होत होती गिऱ्हाईकाची माल घेण्यासाठी झुंबड उठे बाजारात करमणुकीचे खेळही होते गणिका देखील इशारे करत रस्त्यातून हिंडायच्या, कोठे कोठे कुस्तीचा फडही जमलेला असे मदिरापान करून झिंगलेले लोकही दिसत कलावंतानी त्यावेळच्या बाजारातले दृश्य प्रभावीपणे पेश केले किमान पन्नास साठ स्त्री पुरुष कलावंत त्यावेळी रंगमंचकावर होते व सर्वांच्या हालचाली अगदी प्रमाणबद्ध, मोजक्या आणि परिणामकारक होत असत

इतक्यात घोडयाच्या टापाचा खणखणाट होतो व प्रेक्षक सावध होतो दृष्य बदलते विजयनगरचा सम्राट, जनतेचा लाडका, शूर, विद्यावंत, बलवंत पराक्रमी राजा कृष्णदेवराय प्रवेश करतो. वाद्ये वाजविली जातात शंख फुकले जातात फुले उधळली जातात, हिरेजडीत मुकुट, कपाळावर गंध, खांद्यावर भरजरी उपरणी, हातात सोन्याचे कडे, कमरेला तलवार अशा थाटात कृष्णदेवराय जेव्हा प्रवेश करतो त्यावेळी हजारो प्रेक्षक टाळयांचा प्रचंड कडकडाट करतात राज्याच्या बरोबर त्याचा विश्वासू मुख्यमंत्री सालुवा तिम्या उर्फ आप्पाजी हा असतो त्यावेळी गोव्यातील पोर्तुगीज सत्तेचा वकील, सम्राट कृष्णदेवराय याच्या भेटीसाठी नजराणा घेऊन आलेला असतो अरबी आणि इराणी घोडी भारतात आणून विकण्याचा धंदा त्यावेळी पोर्तुगीज करत असत ज्याच्या घोडदळात उत्तम अरबी घोडी त्याचा विजय हे गणित ठरलेले असल्यामुळे कृष्ण–देवराय आपल्या साम्राज्याच्या विस्तारासाठी आणि रक्षणासाठी उत्तम घोडदळ उभी करतो यातूनच पोर्तुगीज व्यापाऱ्याशी त्याचा संबंध येतो जवळीक वाढते या संधीचा फायदा घेऊन वकील राजाला विनती करतो

'महाराज ! आम्हाला गोव्यात एक किल्ला बांधायला परवानगी द्या ' वकिलाच्या अपेक्षित मागणीने राजाला आश्चर्य वाटते राजा विचारतो 'किल्ला कशासाठी बांधणार ?'

'अर्थात संरक्षणासाठी महाराज !'

'किल्ला बांधणार तर सैन्य ठेवणारच ना ?'

'होय महाराज ! किल्ल्यात सैन्य ठेवावेच लागणार.'

मग सैन्याच्या पोटापाण्यासाठी धान्य लागणारच'

'हे काय विचारणे महाराज ! अन्नधान्य लागणारच'

'मग यासाठी कांही गावे तुम्हाला पाहिजे असणार.'

'होय महाराज ! किल्ल्याच्या २५ कोस परिसरातील गावे पाहिजेत म्हणजे व्यवस्थित चालेल महाराज !

अशा उपरोक्त संवादानंतर राजा खवळतो व स्वगत म्हणतो यांना किल्ला बांधायचा आहे ! किल्ल्यात सैन्य ठेवायचे आहे ! सैन्याच्या खर्चा-साठी यांना भोवतालची गावे पाहिजेत ! प्रधानजी फिरग्याला हाकलून द्या. त्याचा सांगा आमचे सरक्षण राहील किल्ला बांधण्याची मुळीच गरज नाही. तशी परवानगी मुळीच मिळणार नाही शिवाय त्यांच्याकडून लिहून घ्या विजयनगर साम्राज्याच्या शत्रूना घोडी विकणार नाही !'

राजा कृष्णदेवराय हा मुत्सद्दी, धोरणी, शूर तसाच मोठा रसिक राजा होता नाटकातील कलावंतांनी तो राजा आणि त्याचे वैभव, त्याचा पराक्रम इत्यादी विविध अंगे अतिशय प्रभाविपणे सादर केली ओरिसा येथपर्यंत पसरले होते लोकांना समजेल अशा भाषेत कारभार चालला पाहिजे असे कृष्णदेवराय म्हणत व त्यामुळे विजयनगर साम्राज्याचे दस्तऐवज तामिळ, तेलगू आणि कन्नड भाषेत आहेत संस्कृत भाषेलाही फार मानाचे स्थान दरबारात होते. त्याच्या दरबारात 'अष्टदिग्गज' म्हणून आठ विद्वान होते. राजा स्वत कवी होता कवींना दरबारात मानाचे स्थान होते विजयादशमीला दरबार भरल्याचे दृष्य फारच बहारदार झाले होते राजा कवींना आपल्या कविता गाऊन दाखविण्याचे आवाहन करतो तामिळ, तेलगू, कन्नड, संस्कृत कवी एकापेक्षा एक सुंदर, अलंकार, उपमा यांनी सज्ज अशा कविता गावून दाखवितात त्यावेळी राजा विचारतो 'या दरबारात असा एक कवी आहे का जो एकापेक्षा अनेक भाषातून आपले काव्य रचू शकतो' मुजरा करून एक काळासावळा तरुण कवी नम्रपणे पुढे येतो व आपल्या मधुर आवाजात तेलगू आणि संस्कृत कविता गाऊन दाखवितो या कवीचे नाव असते अल्लसाणी पेद्दण्णा राजा सिंहासनावरून उठतो व आपल्या हाताने सोन्याचा

बैरागी यांची दुतर्फा वस्ती, पुढे थोडीशी चागली घरे, दुकाने, उघड्या गटारी, असे पहात समुद्रावर येऊन पोहोचलो. क्षितीजापर्यंत पसरलेल्या त्या निळ्याभोर सागरावर प्रचंड लाटा उसळत होत्या लाटे मागून लाट येई आणि किनाऱ्यावर गर्जना करीत आपटे फेसाळपाणी सगळीकडे पसरे अतृप्त नेत्रांनी मी समुद्रदर्शन घेत राहिलो शहरातील साऱ्या उणीवा आणि दोष विसरून गेलो

नतर खिन्नपणे तेथून पाय काढून घेतला स्टॅंडवर जाऊन गाडी गाठायची होती म्हणून पुन्हा रिक्षा करून निघालो उतरलो त्यावेळी ७ वाजत आले होते गाडी मिळाली. आता पुन्हा भुवनेश्वराच्या दिशेने गाडी धावू लागली सुभद्रा, भार्गवी नदी ओलांडून आम्ही भुवनेश्वराला परत आलो त्यावेळी तरुण पड्याने व्यक्त केलेला अभिप्राय आठवू लागलो तो म्हणाला होता– 'बाबूजी ! पुरीमे क्या है ? समुदरका पानी फत्तरका देवालय आणि लकडीका देव !

१२ :

# ताजमहालने झुकून सलाम करावा असा इब्राहिम रोझा

विजापूरला अनेक वेळा गेलो आणि अनेक वेळा गोलघुम्मज पाहिला पण येथे असलेला इब्राहिम रोझा पाहिल्याशिवाय विजापूरची ऐतिहासिक स्थळे पाहिल्यासारखे होणार नाही याबद्दल खात्री पटली उन्हाने करपून पांढरी झालेली धरती आणि सपाट क्षितीजावर मावळणारा सूर्य हे एक वेगळेच दृष्य असते पश्चिमेच्या आकाशात नारगी रगाची उधळण झालेली आहे आणि लालबुद सूर्यबिंब क्षणाक्षणाने पृथ्वीच्या आड दडू लागले आहे पोपटाचे थवे आकाशात चौफेर उडत आहेत घुमटाच्या सापडीत पाखरे घुमटत आहेत चुकून एकादा खड्या आपल्या निळ्या पखाचा रुबाब दाखवून बाबळीत अदृष्य होत आहे हे सारे विलोभनीय चित्र इब्राहिम रोझाच्या नगारखान्यावर उभे राहून मी पहात होतो. हात लावील त्याचे सोने होईल असा वर मिडास राजाला मिळाला होता आता सायकाळची सूर्यकिरणे त्या मिडास राज्याच्या सिहासनावर बसली होती आणि जेथे जो किरणे पोहोचत होती तो सारा परिसर सुवर्णमय होऊन जात होता

## मुद्दामच टांग्यातून आलो

ॲटो रिक्षा आल्या आणि जुने टांगे आणि डमण्या मागे पडल्या पण विजापूरला अजून टागे आहेत म्हणून मी मुद्दामच टाग्यातून तोफ मलिक मैदान (Monarch of the plains) पहिली विजापूराच्या भोवती

असलेल्या एका तटावर ही ऐतिहासिक तोफ दिमाखाने उभी आहे ही तोफ म्हणजे आदिलशाच्या रणमैदानाचे वैभव आहे वजन आणि लांबी याबाबतीत ही तोफ अजोड आहे सिंहाने आपला जबडा उघडला असून हत्तीला चिरडीत आहे असे तोफेच्या मुखावर कोरलेले आहे कोणत्या युद्धात ही तोफ वापरली असेल याची कल्पना नाही मात्र ज्याअर्थी ही तोफ विजापूरच्या पश्चिम बुरूजावर ठेवलेली आहे त्याअर्थी विजापूरकरांना हल्ला पश्चिमेकडून संभवतो असे वाटत असावे असे अनुमान निघते ही अवाढव्य तोफ ओतण्यामध्ये त्यावेळच्या कुशल लोहारांनी आपले कसब पणाला लावले आहे ४०० हून अधिक काळ ऊन, पाऊस, वारा याला तोंड देत न गंजता अगदी नव्यासारखी ही तोफ दिसते असे म्हणतात की, पाच मण सोने या तोफेच्या पोलादात मिसळले आहे. त्यामुळे ती गंजत नाही

## अप्रतिम सौंदर्य

विजापूरचे रस्ते आणि बेळगावचे रस्ते खाचखळग्याच्या बाबतीत एकमेकांशी स्पर्धा करणारे आहेत हे टांग्यातून जाताना जाणवत होते रस्त्यावरची गर्दी, धूळ, मोकाट जनावरे, कुत्री यांच्याशी सामना देत आमचा टांगा इब्राहिम रोझाच्या परिसरात आला आणि मंत्रमुग्ध होऊन आम्ही पहातच राहिलो मध्यवर्ती सरकारच्या पुराणवस्तू संशोधन खात्याने प्रवेशद्वारातच विस्तीर्ण हिरवळ तयार करून रंगीबेरंगी फुलांचे ताटवे निर्माण केले आहेत त्यामुळे मन प्रसन्न होऊन जाते भरभक्कम दिंडी दरवाजातून आत जाण्यास प्रवेश आहे प्रवेश द्वाराच्यावर नगारखाना आहे पुढे गेल्यावर पाटी वाचली 'येथे वहाणा काढून ठेवाव्यात' अनवाणी पायाला काळ्या दगडाचा स्पर्श होताच आमचे कथ्थक नृत्य सुरू झाले. कारण दगड भलतेच तापले होते व त्याचे चटके पायाला बसत होते. भारता-तील ७० कोटी जनतेपैकी फक्त ११ कोटी लोकच चप्पल वापरतात व ५९ कोटी लोक अनवाणी फिरतात असे मी अनेकवेळा सभेतून सांगत आलो आहे आता अनवाणी फिरताना त्यांचे पाय कसे पोळत असतील याचा मी प्रत्यक्ष अनुभव घेत होतो पण इब्राहिम रोझाचे अप्रतिम सौंदर्य न्याहाळताना उन्हात पोळणाऱ्या पायाची जाणीव क्षणभर देखील झाली नाही !

## सहाजणांच्या कबरी

पायऱ्या चढत असतानाच एक गाईड धावत आला या भागात बराच वेळ कोणी फिरकले नसल्यामुळे त्याला ग्राहक लाभल्याचा आनद झाला होता हा काही अधिकृत गाईड नव्हता पण लाल शर्ट आणि खाकी पँट अशा युनिफॉर्ममध्ये तो अधिकृत गाईड सारखा वाटत होता एवढेच प्रथमच त्याने पाच रुपयाची बिदागी मिळावी अशी मागणी केली व दोन रुपयावर सौदा पटला तरी उत्साहाने त्याने इब्राहिम रोझा दाखविण्यास सुरवात केली त्याला बऱ्याच भाषा येत होत्या व इतिहासाचेही बरेच ज्ञान होते काळ्या पाषाणाने बनविलेली इब्राहिम अदिलशहा (दुसरा) याची ही कबर आहे वास्तविक या बादशहाने आपली लाडकी राणी ताजसुलताना हिच्यासाठी ही कबर बाधली होती पण राणी अगोदर हाच वारला त्यामुळे पहिली कबर त्याचीच बांधावी लागली म्हणून या वास्तुला इब्राहिम रोझा म्हणतात जर राणी प्रथम वारली असती तर ताज सुलाताना रोझा या नावाने ही वास्तु ओळखली गेली असती. मोंगल वशाच्या बादशहाप्रमाणेच इतर बादशहानाही आपली कब्र आपल्या हयातीतच बाधून ठेवण्याची मनिषा असे आणि साधारणपणे असे दिसते की, बादशहा, राणी, मुलगे, मुली, अशा सर्वांचे दफन शेजारी शेजारी होत असे इब्राहीम अदिलशहा याला काही अपवाद नव्हता इब्राहीम ताजसुलताना, जोहरा सुलताना, दरवेश आणि सुलेमान असे दोन मुलगे मिळून सहाजणाच्या कबरी येथे आहेत

## हिंदु मुस्लीम ऐक्याचा चाहता

इराणचा स्थापत्य विशारद मलकसदल याने ही कबर बांधली आहे इब्राहीम अदिलशहा (दुसरा) हा १५८० रोजी राज्यावर आला व १६२६ पर्यंत म्हणजे ४६ वर्षे याने विजापूरवर राज्य केले इब्राहिम रोझाचे काम १६१० साली सुरु झाले व १६२६ साली पूर्ण झाले सरकारी माहिती-प्रमाणे त्यावेळी ही इमारत बाधण्यासाठी १ लाख ५० हजार ९ शे होन खर्ची पडले (होन सोन्याचे नाणे) या कबरीच्या सभोवार दगडात कोरलेल्या नक्षीदार जाळ्या असून त्यात अरबी आणि पारशी भाषेतून कुराणाची आयते

कोरलेली आहेत पश्चिमेच्या बाजुने आत जाण्यासाठी जो दगडी चौकट आहे त्या चौकटीच्या दोहोबाजूला एक नकाशा कोरण्यात आला आहे असे म्हणतात की येथून चार किलोमिटर अतरावर असलेल्या सगीत महालकडे जाण्यासाठी जो भुयारी मार्ग आहे त्याचाच हा नकाशा आहे इमारतीच्या जोत्याखाली जाण्यासाठी एक अरुद पायवाट आहे त्यावाटेने आम्ही तळघरात शिरलो त्यावेळी काळोखातून मार्ग शोधणे मोठे अवघड गेले रहस्य कथेत वाचलेल्या वर्णनाशी हे तळघरातले वर्णन जुळणारे होते पण पुढील मार्ग भित बाधून बद करण्यात आला असल्यामुळे मागे फिरणे भागच होते. पुन्हा आम्ही वरच्या कबरीपाशी आलो आणि चौकटी, छत, कमानी यावरील विक्षोभनीय नक्षीकाम पहातच राहिलो एका दरवाजावर असलेल्या छतामध्ये रक्तवर्णीय पाषाणात काही कलाकुसर कोरलेली आहे त्याला Red stone indicator म्हणतात असे सागतात की या लाल फत्तरातून काही तुकडे खाली पडले तर समजावे की त्यानतर २० वर्षांनी ही सारी इमारत कोसळून पडेल. आणि खरोखरच काही तुकडे खाली पडले असल्यामुळे ब्रिटीश काळात लोखडी चॅनल आणि नट बोल्ट यांच्या सहाय्याने साऱ्या इमारतीच्या ढासळू पहाणारा सज्जा सावरून धरण्यात आला आहे व हे करताना मूळच्या सौंदर्याला बाध येणार नाही याची भरपूर दक्षता घेतलेली आहे इस्लामी धाटीच्या बाधकामात कमल फूल कोठेच आढळत नाही पण इब्राहीम रोझाच्या कबरीभोवती जे नक्षीकाम आहे त्यामध्ये जागोजागी कमल फुले कोरण्यात आली आहेत असे म्हणतात की अकबराप्रमाणे हा अदीलशहा हिंदुमुस्लिम ऐक्याचा चाहता होता

## ताजमहालने सलाम करावा

इब्राहीम रोझाची उची १०५ फूट असून केवळ चार खांबावर ही प्रचड वास्तू उभी आहे तळभागात प्रत्यक्ष पहावयास मिळणाऱ्या छोटया छोटया अर्धवर्तुळाकार कमानींनी इतका प्रचड दगडी भार साभाळलेला आहे चोहोबाजूला चार उच्च मनोरे आणि खाली डौलदार कमानी यामुळे सबंध वास्तुमध्ये एक प्रमाणबद्धता आली आहेच शिवाय त्या सर्वावर असलेले घुमट म्हणजे तर वैभवाचा कळसच म्हटले पाहिजे या इब्राहीम रोझाला

दक्षिणेतील ताजमहाल असे मानले जाते ताजमहालचा दगड मऊ पांढरा संगमरवरी आहे तर हा दगड काळा पाषाण आहे. यमुनेच्या तिरावर पौर्णिमेच्या निरभ्र रात्री ताजमहालचे जे सौंदर्य दिसते तो भाग वगळला तर इब्राहिम रोझा ताजमहालाहून अधिक सुंदर अधिक प्रमाणबद्ध आणि देखणा आहे हे मान्य करावे लागेल इब्राहिम रोझा बांधून झाल्यावर काही वर्षांनी ताजमहाल बांधण्यात आला आहे. म्हणजे सौंदर्यशास्त्राची वाटचाल करताना इब्राहिम रोझाची प्रतिकृती म्हणून ताजमहाल निर्माण झाला असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. म्हणूनच आम्ही म्हणतो की ताजमहालने झुकून सलाम करावा इतका निर्दोष आणि प्रमाणबद्ध इब्राहिम रोझा आहे

## आवाजाची किमया

इब्राहिम रोझाच्या शेजारी बऱ्याच दूर अंतरावर हौद असून तेथे कारंजाची व्यवस्था आहे येथून बऱ्याच दूर अंतरावर असलेल्या बेगम तालाबमधून नळाच्या सहाय्याने येथे पाणी आणले गेले होते आता मूळ तलावात पाणी नाही म्हणून येथील हौदातही पाणी नाही त्यापलिकडे याच धाटणीची एक डौलदार व रेखीव अशी मशीद असून कमानी आणि चौकोनी खांबानी तिचा भार सांभाळलेला आहे. या मशिदीचे वैशिष्टय म्हणजे या मशिदीच्या बाहेरच्या सज्ज्यामधून खाली लोंबत असणाऱ्या दगडी साखळया एकात एक अडकविल्यासारख्या कडचाऱ्या साखळया येथे पहावयास मिळतात एक अखंड दगड कोरून अशा साखळया निर्माण करण्यात आल्या आहेत. पश्चिमेकडच्या भिंतीत एक देवळी आहे व ज्यावेळी पेश-इमाम येथून 'अल्ला हो अकबर' म्हणतो त्यावेळी दूर अंतरावर असलेल्या इब्राहिम बादशहाच्या थडग्याजवळ उभे असलेल्यानाही हा आवाज स्पष्ट ऐकू येतो अशी आवाजाची किमया येथे निर्माण केलेली आहे

## गरीबोंकी मुहब्बतका उडाया है मजा

थडगी आणि मशिद या पलिकडे विस्तीर्ण मैदान असून त्यांच्या चोहोबाजूने घोडयासाठी तबेले व हत्तीसाठीही वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे सैनिक आणि सरदाराची निवासस्थानेही याच भागात आहेत येथेच मलक सदलची कब्र आहे जगाच्या स्थापत्यशास्त्रात विजापूरला

महत्वाचे स्थान मिळवून देणारा मलक सदल अगदीच मामूली अशा कब्रमध्य चिरशाती घेत आहे एका शाहनशहाने आपल्या प्रेयसीची यादगार चिरस्थायी करण्यासाठी तिच्या व आपल्या कब्रला पर्यटकाचे आवडते स्थान करून ठेवले आहे म्हणूनच उर्दू भाषेतील लोकप्रिय कवी मकदुम मोहद्दीन ताजमहाल पाहून म्हणतो 'एक शहानशहाने दौलतका सहारा लेकर हम गरीबोंकी मोहब्बतका उडाया है मजा।' रमजान आणि बकरी ईद दिवशी नमाज पढण्यासाठी या मशिदीत लोकाची झुबड उडते

o o o

सारा इब्राहिम रोझा, मशिद आणि परिसर पाहून पुन्हा नगारखान्याच्या तटबदीवर आलो या उच जागेवरून विजापूर शहरातील थडगीच थडगी नजरेस पडतात आणि आम्ही पुन्हा इतिहासाची पाने चाळू लागतो ११ व्या शतकात चालुक्य घराण्यातील राजाने या शहराचा पायाचा दगड बसविला- 'विजयपूरम' असे या शहराचे नामकरण करण्यात आले दिल्लीचा सूलतान अल्लाउद्दीन खिलजी याने प्रथम या शहरावर मुसलमानानी सत्ता आणली आणि त्यानतर १३४७ साली बिदरच्या साम्राज्याखाली हा भाग आला १४८१ साली युसूफ आदिलखान यास बिदरच्या बादशहाने सुलतानपद दिले थोड्याच अवधित बहामनी राज्याला उतरती कळा लागली आणि १४८९ साली युसूफ याने स्वतत्र, सार्वभौम अदिलशाहीच्या स्थापनेची घोषणा केली. तुर्कस्थानच्या मुरादचा युसूफ हा मुलगा होता अशी ही अदिलशाही वशाची सुरवात आहे

तसे पाहिल्यास विजापूरचा इतिहास हा अतिशय महत्त्वाचा आहे या चिमुकल्या शहराने ८ व्या शतकात चालुक्य पाहिलेत हिंदू सस्कृती, जैन आणि मुस्लीम सस्कृति पाहिली आहे आजही बदामी पट्टडकल, अहिहोळ इत्यादि महत्त्वाची गावे जिल्ह्यात पसरलेली आहेत. अदिलशाही तर तब्बल दोनशे वर्षे विजापूरात टिकून राहिली। मोगल बादशहा औरगजेब याने १६८६ मध्ये विजापूर जिंकून घेतले व अदिलशाहीचा अत केला असा हा इतिहास. असे हे विजापूर।

* *

दक्षिणेतील ताजमहाल असे मानले जाते ताजमहालचा दगड मऊ पांढरा संगमरवरी आहे तर हा दगड काळा पाषाण आहे यमुनेच्या तिरावर पौर्णिमेच्या निरभ्र रात्री ताजमहालचे जे सौंदर्य दिसते तो भाग वगळला तर इब्राहिम रोझा ताजमहालाहून अधिक सुंदर अधिक प्रमाणबद्ध आणि देखणा आहे हे मान्य करावे लागेल इब्राहिम रोझा बांधून झाल्यावर काही वर्षांनी ताजमहाल बांधण्यात आला आहे म्हणजे सौंदर्यशास्त्राची वाटचाल करताना इब्राहिम रोझाची प्रतिकृती म्हणून ताजमहाल निर्माण झाला असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. म्हणूनच आम्ही म्हणतो की ताजमहालने झुकून सलाम करावा इतका निर्दोष आणि प्रमाणबद्ध इब्राहिम रोझा आहे

## आवाजाची किमया

इब्राहिम रोझाच्या शेजारी बऱ्याच दूर अंतरावर हौद असून तेथे कारंजाची व्यवस्था आहे येथून बऱ्याच दूर अंतरावर असलेल्या बेगम तालाबमधून नळाच्या सहाय्याने येथे पाणी आणले गेले होते आता मूळ तलावात पाणी नाही म्हणून येथील हौदातही पाणी नाही त्यापलिकडे याच धाटणीची एक डौलदार व रेखीव अशी मशीद असून कमानी आणि चौकोनी खांबानी तिचा भार सांभाळलेला आहे या मशिदीचे वैशिष्ट्य म्हणजे या मशिदीच्या बाहेरच्या सज्ज्यामधून खाली लोंबत असणाऱ्या दगडी साखळ्या एकात एक अडकविल्यासारख्या कड्याच्या साखळ्या येथे पहावयास मिळतात एक अखंड दगड कोरून अशा साखळ्या निर्माण करण्यात आल्या आहेत पश्चिमेकडच्या भिंतीत एक देवळी आहे व ज्यावेळी पेश-इमाम येथून 'अल्ला हो अकबर' म्हणतो त्यावेळी दूर अंतरावर असलेल्या इब्राहिम बादशहाच्या थडग्याजवळ उभे असलेल्यानाही हा आवाज स्पष्ट ऐकू येतो अशी आवाजाची किमया येथे निर्माण केलेली आहे

## गरीबोको मुहब्बतका उडाया है मजा

थडगी आणि मशिद या पलिकडे विस्तीर्ण मैदान असून त्याच्या चोहोबाजूने घोड्यासाठी तबेले व हत्तीसाठीही वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे सैनिक आणि सरदाराची निवासस्थानेही याच भागात आहेत येथेच मलक संदलची कब्र आहे जगाच्या स्थापत्यशास्त्रात विजापूरला

महत्वाचे स्थान मिळवून देणारा मलक सदल अगदीच मामूली अशा कब्रमध्य चिरशांती घेत आहे एका शाहनशहाने आपल्या प्रेयसीची यादगार चिरस्थायी करण्यासाठी तिच्या व आपल्या कब्रला पर्यटकाचे आवडते स्थान करून ठेवले आहे म्हणूनच उर्दू भाषेतील लोकप्रिय कवी मकदुम मोहद्दीन ताजमहाल पाहून म्हणतो ' एक शहानशहाने दौलतका सहारा लेकर हम गरीबोंकी मोहब्बतका उडाया है मजा ।' रमजान आणि बकरी ईद दिवशी नमाज पढण्यासाठी या मशिदीत लोकाची झुबड उडते

० ० ०

सारा इब्राहिम रोझा, मशिद आणि परिसर पाहून पुन्हा नगारखान्याच्या तटबदीवर आलो या उच जागेवरून विजापूर शहरातील थडगीच थडगी नजरेस पडतात आणि आम्ही पुन्हा इतिहासाची पाने चाळू लागतो ११ व्या शतकात चालुक्य घराण्यातील राजाने या शहराचा पायाचा दगड बसविला- ' विजयपूरम ' असे या शहराचे नामकरण करण्यात आले दिल्लीचा सूलतान अल्लाउद्दीन खिलजी याने प्रथम या शहरावर मुसलमानानी सत्ता आणली आणि त्यानतर १३४७ साली बिदरच्या साम्राज्याखाली हा भाग आला. १४८१ साली युसूफ आदिलखान यास बिदरच्या बादशहाने सुलतानपद दिले थोडयाच अवधित बहामनी राज्याला उतरती कळा लागली आणि १४८९ साली युसूफ याने स्वतत्र, सार्वभौम अदिलशाहीच्या स्थापनेची घोषणा केली. तुर्कस्थानच्या मुरादचा युसूफ हा मुलगा होता अशी ही अदिलशाही वशाची सुरवात आहे

तसे पाहिल्यास विजापूरचा इतिहास हा अतिशय महत्त्वाचा आहे या चिमुकल्या शहराने ८ व्या शतकात चालुक्य पाहिलेत हिंदू सस्कृती, जैन आणि मुस्लीम सस्कृति पाहिली आहे आजही बदामी पट्टडकळ, अट्टि-होळ इत्यादि महत्त्वाची गावे जिल्ह्यात पसरलेली आहेत. अदिलशाही तर तब्बल दोनशे वर्षे विजापूरात टिकून राहिली । मोंगल बादशहा औरगजेब याने १६८६ मध्ये विजापूर जिकून घेतले व अदिलशाहीचा अत केला असा हा इतिहास असे हे विजापूर ।

❋ ❋

१३

# विजयनगरचे साम्राज्य

बेंगळूरच्या मुक्कामात वर्तमानपत्र चाळताना बातमी वाचली आज सायंकाळी ७ वाजता नृपतुंग रोडवरील ख्रिश्चन असोसिएशनच्या प्रचंड स्टेडियमवर ध्वनी आणि प्रकाश योजनेद्वारा विजयनगरचे साम्राज्य साकार करण्यात येणार आहे केंद्र सरकारच्या माहिती आणि नभोवाणी खात्याने हा कार्यक्रम आयोजित केला होता व प्रवेश फी फक्त एक रुपया व दोन रुपये अशी माफक होती. आतापर्यंत २ लाख रसिकांनी हा कार्यक्रम पाहिला अशी पुस्तीही बातमीला जोडली होती मी ठरवले की, वेळ काढून हा कार्यक्रम पहायचाच कारण या पूर्वी दिल्लीच्या लाल किल्ल्यात आणि श्रीनगरच्या शालिमार बागेत अशा स्वरुपाचे कार्यक्रम पाहिले होते व ते मला आवडले होते

कर्नाटक राज्यातील बेळ्ळारी जिल्ह्याच्या होसपेठ जवळ हंपी येथील परिसरात आजही विजयनगरचे अवशेष पहावयास सापडतात याच ठिकाणी विजयनगर का बसविण्यात आले याबद्दलची कथा मोठी सरस आणि उद्‌बोधक आहे एकदा भल्या पहाटे एक राजा शिकारीसाठी जंगलात निघालेला असतो त्याच्याबरोबर शिकारी कुत्री आणि एक पाळीव ससाणा असतो थोडे अंतर गेल्यावर राजाच्या दृष्टीस एक ससा पडतो व त्वरित राजाज्ञेप्रमाणे चार पाच शिकारी कुत्री सशावर तुटून पडतात. पण काय आश्चर्य ! तो ससा भिऊन पळत नाही तर उलट कुत्र्यावर तो

त्यानुसार आसाची सावली खाली घसरत येते व बारा वाजता ती सरळ रेषेत येते अशा प्रकारे एक घड्याळच रथाच्या चाकात तयार झाले आहे अर्थात पावसाळ्यात ढग असल्याने आणि रात्रीच्या वेळी अंधार असल्याने अशा चाकाद्वारे काल-मापन नेहमीच होते असे नाही मात्र त्यादिशेने झालेला हा वैज्ञानिक प्रयोग गौरवास्पद आहे असेच म्हटले पाहिजे. १२७ फूट उंचीच्या या देवालयाचे बांधकाम दगडाला दगड जोडून झालेले आहे कोठेही चुना वगैरे नाही मात्र कोपरे जोडताना सांध्यात लोखंड व शीसे घातलेले दिसते त्यावेळी लोहचुंबक माहित होते व कळस हा प्रचंड लोहचुंबकाचा बनविण्यात आला होता सूर्यदेवाची धातूची मूर्ति वर आणि खाली लोहचुंबक ठेवून अधांतरी ठेवण्याची किमया या मंदिरात करण्यात आली होती असे म्हणतात १५५९ साली पोर्तुगिज सैन्याने हल्ला करून या देवालयाच्या शिखरावर असलेला १३ टन वजनाचा लोहचुंबकाचा कळस काढून नेला कारण भारताच्या किनाऱ्या किनाऱ्याने जाणाऱ्या पोर्तुगिज जहाजाचा कंपास (होकायंत्र) देवळावरच्या लोहचुंबकाच्या प्रभावाने चुकीचे मार्गदर्शन करु लागला व ती जहाजे बंगालच्या उपसागरात रस्ता चुकून भलतीकडेच जाऊ लागली

## संभोग शिल्पकृती प्रवाशांचे आकर्षण

कोनार्क देवालयाचा मुख्य दरवाजा कायमचा बंद आहे कारण देवालयाचा कळस काढून तेथून वाळू आणि दगड भरून ते देऊळ कायमचे बंद करण्यात आले आहे दुरुस्तीचा प्रयत्न फार मोठ्या खर्चाचा असल्याने केंद्र सरकारने त्यात लक्ष घातले नसावे. पण साधारणपणे दोनशे वर्षांपूर्वी हे देऊळ अर्धे अधिक वाळूत रुतून बसले होते काही भागावर तर झाडे वाढली होती त्यावेळी ओरिसाचा हा भाग बंगालला जोडलेला होता व त्यावेळच्या गव्हर्नराच्या आदेशानुसार थोडी फार डागडुगी झाली होती अजूनही सरकारचे म्हणावे तेवढे लक्ष या वास्तूकडे नाही

देवळाच्या प्रवेश दारातच हत्तीने माणसाला सोंडेत पकडले आहे व एक सिंह त्या हत्तीवर हल्ला करीत आहे असे शिल्प एका प्रचंड शिळेवर कोरलेले आहे हत्ती म्हणजे धन, सिंह म्हणजे शक्ती धन आणि शक्ती

माणसावर हल्ला करतात असाही अर्थ येथे अभिप्रेत आहे असे आमच्या गाईडचे म्हणणे आहे. प्राण्यामध्ये हरण, मोर, बदक, रेडा याचीही चित्रे कोरलेली आहेत गोवर्धन पर्वत उचलणाऱ्या कृष्णाची छान कोरीव शिल्पाकृती आहे नागसर्पाचे सभोग चित्रही आहे. चिनी ड्रॅगान सारखा प्राणी, मत्स्यकन्या याचाही अतर्भाव शिल्पात आहे पण कोनार्कचे शिल्प यासाठी मुळीच प्रसिद्ध नाही. ते प्रसिद्ध आहे मुख्यत त्या देवालयाच्या चोहोबाजूला असलेल्या अनेक सभोग शिल्पकृतिसाठी ! कामसूत्राच्या आधारावर (Erotic Sculptures) सभोगमूर्ति बनविण्यात आलेल्या आहेत व प्रवाशाचे ते एक आकर्षण आहे मदिरासारख्या पवित्र ठिकाणी हे उघडे नागडे शृन्गार कशासाठी हा एक मोठा सशोधनाचाच प्रश्न आहे काहीचे म्हणणे असे की, असा शृन्गार पाहून देखील ज्याचे मन चळत नाही अशा भाविकानीच आत प्रवेश करावा. म्हणून अशी चित्र कोरलेली आहेत काहींच्या मते त्या काळात बुद्ध व जैन धर्माच्या प्रभावामुळे गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याची भावना मारून टाकण्यात आली होती व भिक्षूक व भिक्षूकिणी याचा सुळसुळाट झाला होता हे देशाच्या व राज्याच्या दृष्टीने धोक्याचे होते म्हणून गृहस्थाश्रमातले शृन्गार दाखवून तरुणांना कुटुबवत्सल बनविण्याच्या उद्देशाने अशी शृगार चित्रे सर्व देवळावर कोरण्यात आलेली आढळतात.

एकदरीत कोनार्कचे सूर्यमदिर पाहून माणसाची मती गुग झाली नाही तरच नवल या मदिराशेजारीच एक पुराणवस्तू भाडार असून तेथेही या मदिराच्या परिसरात सापडलेले अनेक जुने अवशेष साभाळून ठेवलेले आहेत हे सारे पाहून डोके भणाणून गेले हे सारे करण्यामागील उद्देश तरी कोणता असावा याचा अंदाज मी अजून बाधू शकलो नाही पण या मदिराच्या परिसरातून पाय काढता घेऊन दुसरीकडे जाणे माझ्या जीवावर आले कितीदा पाहिले तरी पुन्हा पहावेसे वाटणारे हे शिल्प स्मृतिपटलावर कोरून ठेवून आम्ही या ठिकाणचा निरोप घेतला भार्गवी, सुभद्रा इत्यादी नद्या ओलाडून पिपिरी मार्गे जगन्नाथपुरीच्या दिशेने आम्ही निघालो.

# जगन्नाथपुरी

जगन्नाथपुरीच्या स्टँडवर, बस येऊन थांबली आणि वाळू धुळीचा एक लोट अंगावर आला बकाल उपहारगृहाची रांग शेजारीच होती बटाट्याची भाजी आणि पुऱ्या येथेही होत्याच न्याहरी आटोपून आम्ही सायकल रिक्षातून देवळाकडे निघालो रस्ता भरपूर रुंद होता गर्दी तशी फारशी नव्हती बऱ्याच सायकल रिक्षा रेंगाळत होत्या नीट नेटके कपडे घातलेले स्थानिक लोक कोणी दिसत नव्हते दारिद्र्याचे दर्शन हे या गावातले प्रथम दर्शन ! अर्थात यासाठी येथे येण्याची तशी आवश्यकता नाही ते भारतात कोठेही होऊ शकते देवालयासमोर नेहमीप्रमाणे भिकाऱ्याची वस्ती चप्पल आणि कॅमेरा आत घेऊन जाण्याची मनाई असल्याने या दोन्ही वस्तू बाहेरच ठेऊन जावे लागते जळ तेथे मासा त्याप्रमाणे देऊळ तेथे पंडे हे वेगळे सांगण्याची गरज नाही रिक्षातून खाली उतरायची पुरसत एका तरुण पंड्याने आम्हाला गाठलेच. ऐन विशीतला हा तरुण होता. कपाळावर केशरी गंधाचा टिळा, डोक्यावर गांधी टोपी, अंगात सदरा आणि आखूड धोतर असा त्याचा पेहराव होता रंगाने सावळा, गोड बोलणारा असा तो तरुण होता त्याने विचारायच्या अगोदरच आम्ही सांगून टाकले 'बाबारे ! आम्ही तुला फक्त पाच रुपये देऊ, अधिक काही नाही जे काय दाखवायची तुझी इच्छा असेल ते दाखीव प्रभाकरने खुलासा केला 'हे बघ ! या जगात परमेश्वर वगैरे कोणी तरी आहे असे आम्ही मुळीच मानीत नाही आम्ही मानतो तुला एक तरूण म्हणून याहून चांगले काम तुला मिळत नसल्यामुळे तू हे काम करतोस याची आम्हाला कल्पना आहे ' तो तरुण पड्या वस्ताद होता तो म्हणाला, 'बाबूजी आप लोग बम्बईसे आये हैं न ? वैसा तो यहाँ क्या देखना हैं ? समुदरमे पानी हैं, फत्तरका मंदिर हैं और लकडीका देव है ! यहाँ आपके लिये कुछ नही बाबूजी तो भी चलिये मंदिर तो देखिये!' आम्ही आत गेलो प्रवेशद्वार ओलांडताच प्रसादाचे दुकान लागले आसपास तुलसीदल, फुले, कमळे होती देवालयाच्या उत्तुंग शिखराकडे पहात पहात आम्ही आत प्रवेश केला आवार तसे स्वच्छ होते भाविकांनी भलतीच गर्दी केली होती

देशाच्या निरनिराळ्या भागातून गटागटाने आलेले प्रवाशी येथे काही महिने मुक्काम करतात व रोज दर्शन व भजनाचा कार्यक्रम असतो आम्ही आत शिरलो त्यावेळी देवाचा 'भोग' होता, त्यामुळे थोडा वेळ थांबावे लागले मंदिराची रचना, शिल्प, भव्यता व भाविकांची प्रचंड गर्दी न्याहाळत पंड्याबरोबर गप्पागोष्टी करीत वेळ घालवला जवळच देवस्थानतर्फे प्रसाद विकत देण्याची सोय होती ४ रुपयाचा प्रसाद खरेदी केला व देऊळ पहाता पहाता तो खाऊनही टाकला खास गाभाऱ्यात प्रवेश करून देवदर्शन करण्याची इच्छाही नव्हती आणि तेवढे पैसेही नव्हते पण भोग संपल्यावर प्रचंड दार उघडले गेले व आत आरती चाललेली पाहिली आतही खास लोकांची गर्दी होतीच गोंगाट खपत होत होता या देवालयाच्या आवारात लहान लहान खूप देवालये आहेत पौराणिक कथांवर आधारलेले एक बाहुल्यांचे प्रदर्शनही आहे. ते प्रदर्शन अगदीच पोरकट वाटले भाविकांच्या भावनांना आवाहन करून पैसे उकळण्याचा तो एक केवळ धंदा आहे कोनार्कशी तुलना करता हे देऊळ अतिशय चांगल्या अवस्थेत आहे मोडतोड अगदीच कमी दगड पांढुरका असल्याने याला White pagodo असेही म्हणतात आश्चर्य म्हणजे या देवालयात रतिक्रिडेत मग्न असलेल्या, युगुलाच्या शिल्पाकृति आढळून येतात प्रदक्षिणा घालताना भाविकांच्या नजरेस त्या स्पष्ट दिसतात आणि एखादे तरुण जोडपे प्रदक्षिणा घालीत असले तर असे दृष्य पाहून त्यांच्या भावना कशा चाळवल्या जातात हे आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे तरुण पंड्याही याबद्दल विशेष काही सांगू शकला नाही आद्य शंकराचार्याने स्थापन केलेल्या चारधामापैकी हे एक धाम या दृष्टीने भाविकांच्या मनात जगन्नाथपुरीबद्दल फार आस्था असते त्यामुळे येथे नेहमीच गर्दी असते पण दुर्दैवाने मोठ्या देवस्थानाच्या गावातून दिसून येणारा बकालपणा, अस्वच्छता, गोंगाट, भामटेगिरी इत्यादि बाबतीत हे स्थान कांही अपवाद नाही

देवळापासून समुद्र अगदीच जवळ जेमतेम एक किलो मिटरचे अंतर असावे चालतच निघालो बोळासारखा चिंचोळा रस्ता, महारोगी, भिकारी,

चालून जातो त्यांना चावून रक्तबबाळ करतो मोठ्या शौर्याने तो कुत्र्याशी झुंजतो. शेवटी कुत्रो पराभूत होउन राजाकडे येतात त्यावेळी त्याचे शेपूट दोन पायाच्यामध्ये गेलेले असते आश्चर्याने राजा हे पहातच असतो असा अनुभव आयुष्य त त्याला प्रथमच आला असल्याने तो सभ्रमात पडतो सावध होऊन तो आपल्या ससाण्याला जवळच झाडावर बसलेली कबुतरे दाखवतो व आज्ञेनुसार पाळीव ससाणा कबुतराच्या दिशेने झेपावतो पण गमत अशी की झाडावरची कबुतरे, चिमण्या, भारद्वाज वगैरे पक्षी ससाण्याला घाबरत नाहीतच तर उलट आपल्या तीक्ष्ण नखानी आणि चोचीने ते ससाण्यावर हल्ला चढवितात अशा वेळी काय करावे हे राजाला कळत देखील नाही राजा माघारी फिरतो व नदीकाठी पूजेस बसलेल्या एका साधूला झालेला प्रकार सागतो साधू प्रत्यक्ष जागेवर येऊन पहातो तर काय अजूनही ससा तेथेच लढण्याच्या आवेशाने उभा आहे व झाडावरील कबूतरे आणि इतरही पक्षी तेथेच आहेत इतकेच नव्हे तर शिकारी कुत्री त्या दिशेने पुढे जाण्यास तयार नाहीत सर्व परिस्थिती साधूच्या लक्षात येते तो म्हणतो राजा, ही जागा अपूर्व आहे ! येथील मातीचाच गुण असा आहे की, येथील दुबळा माणूस देखील सबळावर हल्ला चढवील तेव्हा या ठिकाणी किल्ला बाध आणि नगरीची स्थापना कर राजाने किल्ला बांधला व तेथेच एक गाव वसविले हेच गाव पुढे विजयनगर म्हणून भारताच्या इतिहासात प्रसिद्ध पावले कृष्णदेवराय राजाने ४० वर्षे राज्य केले. उत्तरेस कृष्णेपासून दक्षिणेस सिलोनपर्यंत आणि पश्चिमेच्या अरबी सागरापासून पूर्वेच्या उप-सागरापर्यंत विजयनगरचे साम्राज्याचे सुवर्णयुग मानले जाते

हा इतिहास प्रसिद्ध कृष्णदेवराय गादीवर कसा आला ? याबद्दलची हकीकतही मोठी रोमाचकारी आहे कृष्णदेवराय हा २० वर्षाचा होता त्यावेळी त्याचा सर्वांत मोठा भाऊ विजयनगरच्या राज्यावर होता त्याचा मुलगा त्यावेळी केवळ ६ वर्षाचा होता आपला मृत्यू समिप आला आहे व मृत्यूनतर राज्य आपल्या मुलाला न मिळता ते आपला भाऊ कृष्णदेवराय याला मिळणार याबद्दल मोठ्या भावाच्या मनात एक जखम सलत होती म्हणून त्याने आपला मुख्य प्रधान सालुवा निम्मा उर्फ आप्पाजी यास आज्ञा करून कृष्णदेवराय याचे डोळे काढून आणून दाखविण्यास फर्मांविले त्यावेळी

हातात नंगी समशेर आणि निवडक सैनिक घेऊन मुख्यमंत्री कृष्णदेवराया याच्या निवासस्थानात येतात त्यावेळी कृष्णदेवराय विनवितो 'प्रधानजी, माझे डोळे काढून मला ठार करावे असा कोणता मी गुन्हा केला आहे मला राज्य तर मुळीच नको. मी सन्यास घेऊन निघून जाईन तेव्हा मला जीवदान द्या!' कृष्णदेवरायाचे म्हणणे प्रधानजीला पटते व एका शेळीचे डोळे काढून ते कृष्णदेवरायाचे आहेत असे सांगून त्याने कृष्णदेवराय याचे प्राण वाचविले कालांतराने कृष्णदेवराय याचा भाऊ मरतो व शेवटी कृष्णदेवरायच विजयनगरचा सम्राट म्हणून गादीवर बसतो व तो तब्बल चाळीस वर्षे राज्य करतो!

असा हा सारा विजयनगर साम्राज्याचा आणि कृष्णदेवरायाचा इतिहास डोळ्यासमोर तरगू लागला व सध्याकाळी सात वाजता मी स्टेडियमवर विजयनगर सम्राट कृष्णदेवरायबद्दलचे ध्वनी आणि प्रकाश योजनेत सादर केले जाणारे नाट्य पाहण्यासाठी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहिले कन्नड भाषेचे ज्ञान तोकडे असल्यामुळे अडचण जाऊ नये म्हणून बेंगळूरचे माझे स्नेही श्री सोमसुदर शर्मा यांना बरोबर घेतले होते स्टेडियमच्या मैदानात दोन तीन हजार खुर्च्या मांडलेल्या होत्या. शिवाय खाली बसून देखील पाहण्याची व्यवस्था होती शक्य तेवढे पुढे जाऊन आम्ही जागा पटकावली ही हिवाळ्यातील सध्याकाळ असल्याने थडी चांगलीच जाणवत होती आकाश निरभ्र होते. चतुर्थीची चद्रकोर निळ्या आकाशाला शोभा आणीत होती मैदानाच्या पलिकडे घनदाट झाडी असल्यामुळे एक वेगळेच वातावरण निर्माण झाले होते ध्वनीमुद्रिकेतून कर्नाटक संगीताचे मजुळ स्वर निघत होते मला राग तालाचे फार ज्ञान नाही नर्तकीचा पदन्यास आणि अभिनय यातला मी दर्दी नाही तरी मला हे सारे आवडते म्हणून तर मी येथे आलो क्षणमात्र सारे दिवे मालविले गेले आणि समोर पाहतो तर डाव्या हाताला एक मशिद आहे त्याच्या बाजूला एक मंदिर आहे झाडावर एक क्रूस दिसतो आहे अगदी समोर राजमहालातले एक दालन आहे लगेच बाजारातला एक भाग दिसतो आहे उजव्या बाजूला विरुपाक्षाचे एक प्रचड गोपूर दिसते आहे केवढा हा प्रचड रगमच!

नर्तकीच्या पायातले घुघरू छुमछुमले तिरुपतीच्या बालाजीची आरती सुरू झाली मृदगावर थाप पडली, घांट घणघणली. टाळ्याची साथ मिळाली

आणि संस्कृतातून मन्त्रोच्चार सुरु झाले अशा हा शानदार नाटकाचा प्रारंभ झाला. तिरुपतीची आरती ही बहुतेक नाटकाची नांदी असावी आता प्रकाश झोत विजयनगरच्या बाजारावर टाकण्यात आला सुती, रेशमी आणि भरजरी कपड्याची विक्री तेथे होत होती गिऱ्हाईकांची माल घेण्यासाठी झुंबड उठे बाजारात करमणुकीचे खेळही होते गणिका देखील इशारे करत रस्त्यातून हिंडायच्या, कोठे कोठे कुस्तीचा फडही जमलेला असे मदिरापान करून झिंगलेले लोकही दिसत कलावंतांनी त्यावेळच्या बाजारातले दृश्य प्रभावीपणे पेश केले किमान पन्नास साठ स्त्री पुरुष कलावंत त्यावेळी रंगमचकावर होते. व सर्वांच्या हालचाली अगदी प्रमाणबद्ध, मोजक्या आणि परिणामकारक होत असत

इतक्यात घोड्याच्या टापांचा खणखणाट होतो व प्रेक्षक सावध होतो दृश्य बदलते विजयनगरचा सम्राट, जनतेचा लाडका, शूर, विद्यावंत, बलवंत पराक्रमी राजा कृष्णदेवराय प्रवेश करतो वाद्ये वाजविली जातात शंख फुंकले जातात फुले उधळली जातात, हिरेजडीत मुकुट, कपाळावर गंध, खांद्यावर भरजरी उपरणी, हातात सोन्याचे कडे, कमरेला तलवार अशा थाटात कृष्णदेवराय जेव्हा प्रवेश करतो त्यावेळी हजारो प्रेक्षक टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करतात राज्याच्या बरोबर त्याचा विश्वासू मुख्यमंत्री सालुवा तिम्या उर्फ आप्पाजी हा असतो. त्यावेळी गोव्यातील पोर्तुगीज सत्तेचा वकील, सम्राट कृष्णदेवराय यांच्या भेटीसाठी नजराणा घेऊन आलेला असतो अरबी आणि इराणी घोडी भारतात आणून विकण्याचा धंदा त्यावेळी पोर्तुगीज करत असत ज्याच्या घोडदळात उत्तम अरबी घोडी त्याचा विजय हे गणित ठरलेले असल्यामुळे कृष्ण-देवराय आपल्या साम्रा-ज्याच्या विस्तारासाठी आणि रक्षणासाठी उत्तम घोडदळ उभी करतो यातूनच पोर्तुगीज व्यापाऱ्याशी त्याचा संबंध येतो. जवळीक वाढते या संधीचा फायदा घेऊन वकील राजाला विनती करतो

'महाराज! आम्हाला गोव्यात एक किल्ला बांधायला परवानगी द्या' वकिलाच्या अपेक्षित मागणीने राजाला आश्चर्य वाटते राजा विचारतो 'किल्ला कशासाठी बांधणार ?'

'अर्थात संरक्षणासाठी महाराज !'

'किल्ला बांधणार तर सैन्य ठेवणारच ना ?'

'होय महाराज ! किल्ल्यात सैन्य ठेवावेच लागणार.'

मग सैन्याच्या पोटापाण्यासाठी धान्य लागणारच'

'हे काय विचारणे महाराज ! अन्नधान्य लागणारच'

'मग यासाठी काही गावे तुम्हाला पाहिजे असणार.'

'होय महाराज ! किल्ल्याच्या २५ कोस परिसरातील गावे पाहिजेत म्हणजे व्यवस्थित चालेल महाराज !

अशा उपरोक्त सवादानतर राजा खवळतो व स्वगत म्हणतो याना किल्ला बाधायचा आहे ! किल्ल्यात सैन्य ठेवायचे आहे ! सैन्याच्या खर्चा-साठी याना भोवतालची गावे पाहिजेत ! प्रधानजी फिरंग्याला हाकलून द्या त्याचा सागा आमचे सरक्षण राहील किल्ला बाधण्याची मुळीच गरज नाही तशी परवानगी मुळीच मिळणार नाही शिवाय त्याच्याकडून लिहून घ्या विजयनगर साम्राज्याच्या शत्रूना घोडी विकणार नाही !'

राजा कृष्णदेवराय हा मुत्सद्दी, धोरणी, शूर तसाच मोठा रसिक राजा होता नाटकातील कलावतानी तो राजा आणि त्याचे वैभव, त्याचा पराक्रम इत्यादी विविध अगे अतिशय प्रभाविपणे सादर केली श्रीलका येथपर्यंत पसरले होते लोकाना समजेल अशा भाषेत कारभार चालला पाहिजे असे कृष्णदेवराय म्हणत व त्यामुळे विजयनगर साम्राज्याचे दस्तऐवज तामिळ, तेलगू आणि कन्नड भाषेत आहेत सस्कृत भाषेलाही फार मानाचे स्थान दरबारात होते. त्याच्या दरबारात 'अष्ठदिग्गज' म्हणून आठ विद्वान होते. राजा स्वत कवी होता कवीना दरबारात मानाचे स्थान होते विजयादशमीला दरबार भरल्याचे दृष्य फारच बहारदार झाले होते राजा कवीना आपल्या कविता गाऊन दाखविण्याचे आवाहन करतो. तामिळ, तेलगू, कन्नड, सस्कृत कवी एकापेक्षा एक सुदर, अलकार, उपमा यानी सज्ज अशा कविता गावून दाखवितात त्यावेळी राजा विचारतो 'या दरबारात असा एक कवी आहे का जो एकापेक्षा अनेक भाषातून आपले काव्य रचू शकतो' मुजरा करून एक काळासावळा तरुण कवी नम्रपणे पुढे येतो व आपल्या मधुर आवाजात तेलगू आणि सस्कृत कविता गाऊन दाखवितो या कवीचे नाव असते अल्लसाणी पेद्दण्णा राजा सिंहासनावरून उठतो व आपल्या हाताने सोन्याचा

तोडा तो कवी पेद्दण्णाच्या पायात घालतो राजाचे काव्य प्रेम पाहून सारा दरबार भारावून जातो

ऐन तारुण्यात राजाचे प्रेम एका स्वरुप, सुंदर, लावण्यवतीवर बसते व तिच्याशी तो विवाहबद्ध होतो. हे रिवाजाला सोडून असते कारण ती लावण्यवति चेन्नम्मा ही एका गणिकेची कन्या असते पण राजा तिच्यावर जीवापाड प्रेम करतो एकदा त्याची राणी महालात राजाची वाट पहात असते मध्यरात्र होऊन गेली तरी राजा येत नाही म्हणून ती थकून मचकावर झोपी जाते नुकताच तिचा डोळा लागलेला असतो त्यावेळी राजा महालात प्रवेश करतो व तिचे सौंदर्य न्याहाळत तिच्या पायाशी बसतो. इतक्यात राणी खडबडून जागी होते व तिचे पाय राजाच्या मुकुटाला लागतात व मुकुट खाली पडतो राजा भडकतो व महालातून निघून जातो. राणी त्याच्या मागे धावते, ती पार गोंधळून गेलेली असते नाटकातला हा भाग फारच प्रभावी झाला असून हजारो प्रेक्षक श्वास रोखून तो पहात असतात.

कृष्णदेवराय नेहमी सांगत असतो राजाने रंगमहालात अगर शयन गृहात असतानासुद्धा एक डोळा बाहेर ठेवावयास पाहिजे तो जागृत असतो आपले सरदार गायब होऊ नयेत व त्यानी साम्राज्याविरुद्ध कटकारस्थाने करू नयेत म्हणून तो सतत सावध असतो बहामनी, कुतुबशाही, निजाम शाही, अदिलशाही अशी मुसलमानी राज्ये विजयनगरावर डोळा ठेवून असतात विजापूरचा अदिलशाहीचा दारुण पराभव कृष्णदेवराय करतो रायचूरचा किल्ला तो जिंकून घेतो, उत्कलवर स्वारी करून कोंडावीड किल्ला तो सर करतो. लढाईचे हे दृष्य विद्युत प्रकाश झोताच्या सहाय्याने दिग्दर्शकाने अगदी जिवंत केले आहे अंगावर शहारे आणणाऱ्या किंकाळ्या तलवारीचा खणखणात, घोड्याचे खिंकाळणे, रणगर्जना वगैरे मुळे नाटकातला हा भाग अंगावर शहारे आणतो

अडीच तास चाललेले हे नाटक प्रेक्षकाना खुर्चीला खिळून टाकते नृत्य गायन, अभिनय, सजावट, अर्थपूर्ण संवाद सारेच बहारदार होते शेवटी शिपायापासून सम्राटापर्यंत, महाराणीपासून दासीपर्यंत असलेली शभरावर पात्रे रंगभूमीवर पूर्ण प्रकाशात येऊन शेवटचे पद म्हणतात त्यावेळी टाळ्यांचा कडकडाट होतो मराठी नाट्यसृष्टीत असा प्रकार आणता येणार नाही का ?'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

१४

# पश्चिम घाटातील तिलारी प्रकल्प

पश्चिम सागराला साक्ष ठेवून सह्याद्रीचा घाटमाथा वर्षानुवर्षे उभा आहे. कोणी सरदार, मावळे आले आणि त्यांनी माथ्यावर किल्ले बांधले. इतिहासकाळातील मागील युगात कोणी बुद्धधर्मिय आले आणि त्यांनी घारापुरी आणि कार्ले येथे लेणी खोदली. पोर्तुगीज आले आणि त्यांनी गोमंतकात आग्वादचा किल्ला बांधला. इंग्रज आले आणि त्यांनी मुंबईलाही किल्ला (फोर्ट) बांधला. काल अस्तंगत झाला पण त्याच्या खुणा तेवढ्या शिल्लक आहेत. भारतात इंग्रजांचे राज्य असताना १९१८ साली कोणी इंग्रज भू-सर्वेक्षण अधिकारी आला आणि त्याने परिश्रमपूर्वक मोज-माप करून बेळगावजवळच्या चरमूरी गावाची कुंडली मांडली. त्या छोट्या गावचे अक्षांश आणि रेखांश त्याने लिहून ठेवले. त्याच आधारावर १९७३ साली कोल्हापूर जिल्ह्याच्या चदनगड तालुक्यातील तिलारी नदीवर धरण बांधण्याचा संकल्प करण्यात आला आणि मोजणी करण्याच्या कामास प्रारंभ झाला. अक्षांश १५° आणि रेखांश '७४' या ठिकाणची जागा निश्चित करण्यात आली. विज्ञानाशी विसंगत असलेल्या प्रथेनुसार भूमि-पूजनाचे कर्मकांड पार पाडण्यात आले आणि हजारो श्रमिकांचे हजारो हात कामाला लागले..

देश-परदेशच्या भ्रमंतीत अनेक धरणे पाहण्याचा योग आला. व्होल्गा नदीवरील प्रचंड जलविद्युत केंद्र पाहिले. त्यावेळी हिवाळा होता आणि

नदी पूर्णपणे गोठून गेली होती. भाक्रा—नानगल धरणाची उंची पाहून आणि जलाशयाचे निळेभोर पाणी पाहून माझी मती गुंग झाली महा-नदीवरील हिराकूड जवळचे धरण व त्याची २ मैलांची प्रचंड लांबी आणि दोन्ही बाजूचे उंच मनोरे पाहिले त्यावेळी महानदी धोक्याची पातळी ओलांडून भरधोव वेगाने वहात होती. धरणाची सोळाहि कवाडे पूर्णपणे उघडली होती व प्रचंड वेगाने पाणी मुशीतून बाहेर उसळत होते तुंगभद्रा कोयना, कृष्णार्जून सागर, हिडकले, मलप्रभा. काळी नदी . इतके सारे पाहिले पण बळगांवपासून केवळ एक तासाच्या अंतरावर असलेल्या तिलारी प्रकल्पावर जाण्याचे कांही जमले नव्हते पण परवा मुख्य अभि-यंत्यांच्या आग्रहावरून आम्ही काही पत्रकार मंडळी मुक्कामाला कोदोळी येथील अतिथीगृहात येऊन उतरलो, तिलारी प्रकल्पाचा सारा कारभार येथील कार्यालयातून होत असतो तेथे सर्वप्रथम आमचे स्वागत कोणी केले असेल तर ते पर्जन्यराजाने ! धुक्याची पांढरीशुभ्र शाल पांघरून राजे स्वागतास आले आणि अंतराळातून पुष्पवृष्टी होण्याऐवजी पावसाच्या सरी मागून सरी कोसळल्या ताल सावरीत धावताना व्हरांड्यात पोहोचेपर्यंत प्रत्येकजण अर्धाअधिक चिंब झाला, मात्र या आमच्या स्वागताने अंगावर आनंदाचे रोमांच फुलले

सायंकाळी चारच्या सुमारास आमची मेटॅडोर वेंगुर्ला मार्गाने तिलारी कडे निघाली वाटेत हिंडलगा मध्यवर्ती कारागृहाचे दर्शन घडले ती कळाहीन इमारत आपल्या उंच भिंती घेऊन वर्षानुवर्षे येथे उभी आहे तेथून पुढे सटकल्यानंतर आसमंतात भाताची आणि ऊसाची पिके विपुल प्रमाणात असल्याचे दिसून आले बेळगांवच्या परिसरातील ही समृद्ध शेती. पोपटी—हिरवा रंग सर्वत्र पसरला होता. काही शेतातून इरली पांघरून बाया भांगलण करीत होत्या आंबा—काजू व बऱ्याच ठिकाणी दूरवर निलगिरी वृक्षाचे शेंडे दिसत होते नाचण्याची घालणी अलिकडेच झालेली होती त्यामुळे मान मोडून पिवळसर रोपे माळावर पडली होती, रताळ्याचा वेल भेरेवर तरारला होता. भाताचे गादे पाण्याने भरून गेले होते. दूरवरच्या डोंगरमाथ्यावर ढग अलगद उतरले होते व पावसाची रिपरिप सतत चालू होती डांबरी सडकेने आमची गाडी तोंडावर वारा

पाऊस घेत सुसाट चालली होती. गाडीत गप्पाना ऊत आला होता पण माझी नजर बाहेरच्या सृष्टीसौन्दर्यावर लुब्ध झाली होती उजव्या हाताचा किल्ले पारगडला जाणारा रस्ता सोडून आम्ही सरळ निघालो. कोदाळी येथे असलेल्या तिलारी प्रकल्पाच्या हद्दीत तर येऊन पोहोचलो. दुतर्फा कार्यालये आणि अधिकाऱ्यांची निवासस्थाने होती. धुके व पाऊस यामुळे लाबवरचे दिसतच नव्हते एक छोटीशी चढण गाडीने पूर्ण केली आणि विश्रामधामात येऊन पोहोचलो,

अवघा वीस एक मैलाचा प्रवास. त्यामुळे थकवा वगैरे येण्याचा प्रश्नच नव्हता विश्रामधामाच्या खोल्या बहुतेक रिकाम्या होत्या. कारण अशा ऐन पावसाळयात येथे कोण कशाला येणार ? आलेच तर कन्त्राटदाराची माणसे किंवा सरकारी अधिकारी खोलीत सामान ठेवून दिले आणि दर-वाजात उभे राहून बाहेरचे दृश्य टिपण्याचा प्रयत्न करू लागलो पण धुके आणि पाऊस यांचा 'पोलादी पडदा' समोर असल्याने दूरवरचे काही दिसणे शक्य नव्हते शिवाय सध्याकाळ होऊ लागली होती अशा पावसाळी हवेत चहाची आठवण होणे अगदीच स्वाभाविक होते. वाट पहाण्याचे कारण नव्हते. तेथेच असलेल्या कॅन्टीनमधून गरम गरम चहा आणि बिस्की-टस् आले हवा, पाणी, पाऊस वगैरेबद्दल बोलता बोलता चहापान झाले सोबत दिली होती प्रकल्पाच्या मुख्य अभियत्यानी आणि इतर कर्मचाऱ्यांनी·

समुद्रसपाटीपासून अदमासे २२०० फूट उंचीवर आम्ही होतो त्यामुळें हवेतला गारठा जाणवू लागला तशात मुसळधार पाऊस आणि सोसाटयाचा वारा ! आमची बोलणी पावसावरच प्रथम स्थिर झाली आम्हाला साग-ण्यात आले, या भागात सरासरी ६३५ सेंटिमिटर पाऊस पडतो व तीन चार महिने सूर्यदर्शन अजिबात घडत नाही ! हे धरण बाधण्यास अतिशय पाऊस हे एक मुख्य कारण आहे कारण तिलारी नदी धरणापासून चार पाच मैलावर असलेल्या तुडये गावच्या परिसरातून उगम पावते व उगमा-जवळ नदी लहानच असते पण या नदीला आसपासच्या डोंगरमाथ्यावरून धावत येणारे अनेक पाण्याचे प्रवाह येऊन मिळतात, त्यामुळे धरण पूर्ण झाल्यावर तयार होणाऱ्या जलाशयात एकशे तेरा दशलक्ष घनमीटर

म्हणजे ४ टी एम सी. पाण्याचा साठा होणार आहे. धरणापासून १५ किलोमीटर लांबीचा एक कालवा निघणार असून या कालव्याचे पाणी ६५० मीटरवरून एका खोल दरीत सोडण्यात येणार आहे त्या ठिकाणी पाण्याच्या दाबाने विद्युत जनित्र फिरविण्यात येणार असून त्यापासून ६० मेगॅवॅट वीज निर्माण केली जाणार आहे वीजनिर्मितीनतर तेच पाणी पुढे कालव्यानी खरारी नदीत सोडले जाणार आहे पुढे थोड्या अंतरावरही ही खरारी नदी तिलारी नदीला मिळते व ती तिलारी म्हणूनच ओळखला जाते सावतवाडीच्या जवळपास या नदीवर आणखी एक धरण बाधण्यात येणार असून त्यामुळे गोमतकातील १२ हजार हेक्टर जमिनीला पाणी मिळणार आहे

१९७३ साली या प्रकल्पाच्या कामाचा शुभारभ झालेला असला तरी १९७७ पर्यंत विशेष काम झाले नाही त्यानतर मात्र कामाने वेग घेतला असून चदगड तालुक्याच्या या मागासलेल्या भागात या धरणाने, नवचैतन्य निर्माण केले आहे तिलारी म्हणजे महाराष्ट्राचे दक्षिणेकडचे शेवटचे टोक आहे येथेच कर्नाटक, गोवा आणि महाराष्ट्र अशा सरहद्दीचा त्रिवेणी सगम झालेला आहे. तिलारी धरणाची एक भित कर्नाटकातील धामणे गावच्या हद्दीत आहे तर दुसरी महाराष्ट्रात आहे आणि हे पाणी गोमतकाच्या भूमीला सुजलाम-सुफलाम करणार आहे! सव्वाशे फूट उचीचे, दगडी बाधकामाचे हे धरण असून त्याचे पाणलोट क्षेत्र ४७ चौरस किलोमीटर एवढे मोठे होणार आहे धरणाची लाबी ४८९ मिटर असून त्याला तीन दरवाजे राहणार आहेत धरणापासून निघणारा कालवा चक्क १५ किलो मीटर लाबीचा राहणार असून त्यात अनेक बोगदे असणार आहेत दाबवाहक भुयार, प्रवेश भुयार, वीजघर, वायुविजन भुयार, भुयारेच भुयारे! सह्याद्रीचा कणखर कातळ भेदून ७ किलो मिटर लाबीचे बोगदे तयार होत आहेत मजूर घाम गाळत आहेत, अपघातात मरत आहेत, जखमी होत आहेत, कत्राटदाराचे उखळ पाढरे होत आहे रोजगार पूर्वी नव्हताच आता तो मिळतो म्हणून काहीजण आनदी आहेत अभियता, कनिष्ठ अभियता, मेस्त्री, कामगार, ड्रायव्हर इत्यादी अनेकाच्या श्रमातून बिजलीबाईला प्रसन्न करून घेण्यासाठी यज्ञ-कर्म चालू झालेले आहेत

१९८५ साली खादी डगल्यातला मंत्री बटन दाबील, वाजंत्री वाद्ये वाजव-तील, चिकन बिर्यानीची ढेकर देत पत्रकार स्तंभ लेखन करतील आणि मग सर्वत्र लखलखाट होईल ..

नकाशे, संख्या, आकडेवारी, अक्षांश रेखांश, मेगॅवॅट, फोरबे धरण, शाफ्ट, स्लोप, जटिल स्लोप, लक्ष, दशलक्ष, टी एम सी. अबब ! घणाघारखे शब्द डोक्यावर आदळत होते. विज्ञानाच्या सगळ्या शाखा येथे हात जोडून उभ्या होत्या सिव्हिल इलेक्ट्रीक, भूगर्भ, कृषि, पदार्थविज्ञान आणि शेवटी वैद्यकीय-सारे ज्ञानी येथे एकत्र येऊन नवनिर्मिती चालली आहे भविष्यकाळातल्या भारताच्या विकासाचा पाया येथे घातला जात आहे रात्री झोपताना मुख्य अभियंत्याशी केलेल्या चर्चेचे सार स्मृतीपटलावर पक्के करून झोपण्याचा प्रयत्न करू लागलो सुसाटवारा, मुसळधार पाव-साची तालावर चाललेली रप-रप यामुळे शिण विसरून केव्हा झोपी गेलो समजलेदेखील नाही

दुसऱ्या दिवशी सकाळी एकामागून एक जिपगाड्या व्हरांड्यात येऊन उभ्या राहिल्या कोसळत्या जलधारा अंगावर घेत आणि दाट धुक्यातून तरंगत आम्ही प्रत्यक्ष बोगदे पहाण्यासाठी निघालो घाट माथ्यावरून दोन हजार फूट खोल दरीत आम्ही उतरत होतो. उतरण म्हणजे ती खरोखरीची उतरण होती. गाडीच्या ब्रेक्सनी दगा दिला तर थेट पाताळात ! पचनास्या-साठी देखील काही शिल्लक राहणारे नाही अवकाशातून पृथ्वीवर घसर-गुंडी करीत यावे तशी आमची जीप डांबरी सडकेवरून दरीत घसरत होती एवढ्यात अधिजल भुयाराच्या सर्जजवळ येऊन पोहोचलो गमबूट, रेनकोट आणि हेल्मेट असा रुबाबदार पेहराव केला आणि क्षणभर आसमंत न्याहाळू लागलो सुदैवाने एका प्रचंड वायूच्या झोताने दरीतील धुके पार पळवून लावले आणि दरी पलिकडचे हिरवेगार डोंगर आपल्या हिरव्या गर्द वनराईसह दृष्टीस पडले मान उचावून एका कड्याकडे पहात होतो त्यावेळी मुख्य अभियंता श्री आव्हाड शेजारीच उभे होते त्यांनी डोंगर-माथ्यावरून कोसळणाऱ्या एका पांढऱ्याशुभ्र जलधारेकडे माझे लक्ष वेधले. ते म्हणाले, अहो ! ते दृश्य जरा नीट पहा कड्यावरून पाणी कोसळते आहे पण जमिनीपर्यंत ते पोहोचतच नाही. कारण खाली पडणाऱ्या

पाण्याला वायुचा प्रचंड झोत अलगद वर उचलतो व गिरणीच्या चिमणीतून धूर जावा त्याप्रमाणे ते वरच्यावर आकाशात फेकले जाते निसर्गाची ही अपूर्वाई न्याहाळत असताना माझ्या कानाने विमानाचा आवाज टिपला. पण शंका आली की यावेळी या भागात विमान कुठले ? मी आवाजाबद्दल चौकशी केली त्यावेळी विद्युत टॉवरवरच्या जाड ताराकडे माझे लक्ष गेले विणेच्या तारा छेडल्यानंतर झंकार यावा तसा या टॉवरच्या तारातून वाऱ्यामुळे आवाज येत होता भयप्रद आणि गंभीर

समोरच्या दरीतून खरारी नदी वहात होती. नागिणीसारखे वळसे घेत ती डौलाने आणि वेगाने चालली होती. आमची जीप बीजघराच्या प्रवेशद्वाराशी आली आणि हॉर्न वाजवून इशारा देत अडीच हजार फुट लांबीच्या भुयारात शिरली आत प्रचंड काम चालू आहे वायुदाब यंत्राने धारदार पहारी खडकाच्या छातीत रोवल्या जात आहेत, जिलेटीनचा स्फोट घडवून खडक फोडला जात आहे स्त्री–पुरुष कर्मचारी बोगद्यात ल दगड बाहेर वाहून आणत आहेत पृथ्वी स्वतःभोवतीची गिरकी पूर्ण करते त्या क्रमाने तीन पाळीवर कामगार काम करीत आहेत बोगद्यात दिवस, रात्र, उजेड, अंधार, पूर्व पश्चिम काही समजत नाही कोणी समजून घ्यायचे कारण नाही करायचे मात्र सतत श्रम !

नकाशात पाहिलेले सारे येथे प्रत्यक्ष कृतीत उतरत असलेले पाहिले दोन दिवसाच्या मुक्कामात येथील परिसराशी चांगली मैत्री जमली पाऊस वारा आणि धुके हे तर जिवाभावाचे सोबती बनले रेनकोट फेकून मुक्तपणे जलधारा अंगावर घेत पावसात नाचावे, तुफान वेगाने धावणाऱ्या नदीच्या प्रवाहात उडी घेऊन पैलतीर गाठावा, अवघड कड्यांची चढण पायी चढून जावी मुक्त कंठाने बालकवीचे गाणे गावे हिरवे हिरवे गार गालीचे, हरित तृणाच्या मखमलीचे माझ्यात लुप्त असलेला निसर्गाचा वेडेपणा मी तसाच लुप्त ठेवला आणि जीपगाडी जेव्हा पुन्हा विश्रामधामाच्या व्हराड्यात आली त्यावेळी पत्रकाराला साजेल असे अघळपघळ हास्य ओठावर आणून अभियंत्याचे आभार मानले 'थॅन्क्यू सर !'

*

१५

# आमचे स्फूर्तिस्थान—भगतसिंगाची समाधी

मुंबई सोडून तब्बल चाळीस तास होत आले होते. पंजाबमधील भाटिंडा स्टेशनच्या दिशेने जनता एक्स्प्रेस धावत होती. स्टेशन जवळ येताच नेहमीच्या सरावानुसार सामानाची बांधणी सुरू झाली खिडकीबाहेर मान डोकावून स्टेशनच्या दिशेने पाहू लागलो. सायंकाळचा सूर्य धरती मातेचा निरोप घेत होता सपाट आणि विशाल क्षितीजाखाली हळूहळू सरकत जाणारे सूर्यबिंब मोठे लोभसवाणे दिसत होते तांबड्या, पिवळसर, नारंगी रंगाची उधळण आकाशात झाली होती आणि त्याच वेळी पूर्व दिशेला गडद निळा अंधार दाटून आला होता हवा पडली होती झाडाचे पानही हालत नव्हते. एक वेगळीच शांतता जाणवत होती. दीर्घ प्रवासाने थकलेले गाडीचे इंजिन तेवढे भाक भाक् आवाज करीत, कण्हत रखडत डब्याना ओढीत होते

भाटिंडा स्टेशनात गाडी येऊन थांबते न थांबते तोच तुफान वेगाने वाऱ्याची लाट येऊन आदळली वालुकामय भागातून आलेल्या तुफाना बरोबर धुळीचे ढगच्या ढग सर्वत्र पसरले समोरचे दिसणे अशक्य व्हावे इतकी धूळ उडू लागली आणि त्या पाठोपाठ टपोऱ्या थेंबाची जोरदार पावसाची सर कोसळू लागली सामानाचे ओझे सांभाळत धावता धावता आमची फजिती उडाली पंजाबच्या भूमीवर वैशाखातील निसर्गाने हे असे आमचे स्वागत केले आणि आम्ही दिङमूढ होऊन इकडे तिकडे शोध घेत

असतानाच स्वयंसेवकांनी आमचे सामान उचलण्यास आम्हास मदत केली अशा स्वरुपाचे तुफान ज्याला पंजाबीमध्ये 'आँधी ' म्हणतात ते येथे सतत होत असते कम्युनिस्ट पक्षाच्या अधिवेशनाच्या निमित्ताने किमान आठवडा भर तरी या भागात मुक्काम राहणार होता त्या अल्पकाळात पंजाबी सुभ्याचे यथार्थ दर्शन घेण्याचा माझा मानस होता

पंजाब हा भारताचा खड्गहस्त मानला जातो याची प्रचिती पंजाबच्या शहरातून फिरताना सहज येते पिळदार मिशा, रुबाबदार दाढी डोक्यावर रंगीत पगडी, सैल सदरा, लुंगी आणि कमरेला लटकती तलवार किंवा कृपाण हा येथील सर्वसाधारण पेहराव आहे खांद्याला दोन नळयाची बंदूक आणि गळयात काडतूसाची माळ परिधान केलेले सरदारजी खूप वेळा नजरेस पडतात इतिहासकाळाच्या जखमा उराशी घेऊन पंजाब जगतो आहे लैला-मजनूच्या प्रेम कथेवर मात करणाऱ्या हिर--रांझांची कथा येथील लोकजीवनाच्या हृदयात खोल रुतलेली आहे. पंजाबी भाषेतल्या कथेत, गीतात आणि कादबऱ्यात 'इष्क' भरपूर आणि ओतप्रोत भरलेले आढळते महान संत गुरुनानक, गुरु गोविंदसिंग अशा शीख धर्माच्या संस्थापकाबरोबरच महाराणा रणजितसिंग आणि इतर राजेमहाराजे इतिहासाने निर्माण केले आहेत

अगदी अलिकडे पंजाबी सुभ्याच्या निर्मितीनंतर एका नव्या औद्योगिक युगाचा शुभारंभ या राज्यात झाल्याचे दिसून येते याच्या मुळाशी आहे. भाक्रा नांगलची वीज आणि त्या धरणाचे पाणी ! पंजाबमध्ये कोठेही चला अनेक कालवे अनेक वेळा ओलांडल्याशिवाय आपण प्रवासच करू शकणार नाही. हजारो मैल लांबीच्या कालव्यांनी पंजाबची धरती खऱ्या अर्थाने सुजलाम्-सुफलाम् बनलेली आहे मैलोगणती प्रदेशात गव्हाचे पिक दृष्टीस पडते. हरभरा, मसूर, मूग, कापूस, ऊस मुबलक प्रमाणात होतो· वीज पोहोचली नाही असे गाव पंजाब आणि हरियाना या दोन्ही राज्यात सापडणार नाही दूध-दुभतेही भरपूर आढळते मेंढया पाळण्याचा व्यवसाय तेजीत असून लुधियाना येथे तयार होणारे उलनचे कापड आणि स्वेटर्स जगभरच्या बाजारपेठेत विक्रीसाठी आढळतात शेती बरोबरच औद्योगिक क्षेत्रातही बरीच मोठी प्रगती पंजाबने साधली आहे ट्रॅक्टर, सायकल, प्रेस

आणि निरनिराळ्या यंत्राचे सुटे भाग करणारे उद्योगधंदे ग्रामीण भागात देखील दिसून येतात शेतात आणि कारखान्यात सरदारजी बंधूचा श्रमयज्ञ अखंडपणे चालू असतो यामुळे एक प्रकारची आर्थिक सुबत्ता पंजाबमध्ये आलेली आहे या राज्यात भिकारी नाहीत चुकून आढळलेच तर ते अन्य राज्यातून आलेले असतील इतकी सुबत्ता पंजाबमध्ये आढळते शीख जमातीचे समाज जीवन संबंध पंजाबभर पसरलेल्या गुरुद्वाराभोवती गुंफलेले असते तेथे येणाऱ्या कोणाही प्रवाशास अन्न आणि निवारा खमखास मिळू शकते गुरुद्वार हे निराश्रीतांचे आश्रयस्थान आहे

असे हे पंजाबचे जीवन न्याहाळीत अमृतसर, जालंदर, लुधियाना, पतियाळा, चंदिगड, भाक्रा नांगल वगैरे स्थळांना भेटी दिल्या व पंजाबचा निरोप घेतला पण फिरोजपूर येथे घेतलेले सरदार भगतसिंगाच्या समाधीचे दर्शन मात्र अंत करणात कायमचेच कोरले गेले आहे. दुपारी एकचा सुमार होता सतलज नदीच्या डाव्या तीरावर आमची मोटार उभी राहिली त्यावेळी या अतिविशाल नदीच्या पात्राने आम्ही मोहून गेलो अंग भाजून काढणारा उन्हाळा आमच्या चिकाटीची परिक्षाच जणू पहात होता नदीच्या निळ्याभोर पात्रात मस्त सूर मारावा आणि मनसोक्त डुंबावे अशी अनावर इच्छा निर्माण झाली पात्रातले पाणी आमच्यापासून खूप दूर होते शिवाय येथूनच नदीचे उजवीकडे वळणारे पात्र सरळ पाकिस्तानच्या हद्दीत जाणार होते या भागात रस्ता सोडून अन्य ठिकाणी जाण्यास जवळ जवळ मनाई आहे, कारण हा भारत-पाकचा सीमा भाग आहे भला मोठा पूल ओलांडून आम्ही पैलतीर गाठले रस्त्याच्या दुतर्फा निलगिरीचे वृक्ष फौजेतील शिपायाप्रमाणे अगदी ओळीत उभे होते भगतसिंगाच्या समाधीस भेट देणाऱ्या प्रवाशाचे तें स्वागतच करीत होते मुख्य रस्त्याच्या उजव्या बाजूस एक रेखीव रस्ता दाट झाडीतून पुढे जातो सैनिकांची तुरळक वर्दळ या भागात आढळते आणि लाल चिरेबंदी फरशीच्या कलात्मक समाधीच्या पायथ्याशी माणूस थबकून उभा राहतो हीच ती सरदार भगतसिंग, सुखदेव, राजगुरु या तीन थोर हुतात्म्यांची समाधी ! भारतमातेच्या थोर सुपुत्राच्या समाधीसमोर आम्ही नतमस्तक झालो. ओंजळभर रानफुले समाधीवर वाहिली, मूठ वळून

कम्युनिस्ट पद्धतीने या थोर वीरांना क्रांतीकारक अभिवादन केले 'इन्किलाब झिंदाबाद' 'क्रांती चिरायु होवो' ही घोषणा यानीच आम्हाला शिकविली ही घोषणा देत हे आनंदाने फासावर गेले त्यांच्या महान बलिदानातूनच आम्ही स्वातंत्र्य मिळविले आहे ही भावना, ही जाणीव पुन्हा पुन्हा होऊ लागली

एप्रिल १९२९ रोजी दिल्लीच्या पार्लमेंटमध्ये बॉम्ब टाकून भगत सिंगाने स्वातंत्र्य लढ्याचे रणशिंग फुंकले जुलमी इंग्रजी अधिकाऱ्यांना गोळ्या घालून ठार मारले देशाच्या निरनिराळ्या भागातील तरुणांना एकत्र करुन क्रांतीकारक संघटना उभी केली इत्यादि आरोपाखाली सरदार भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांना लाहोरच्या कारागृहात दि २३ मार्च १९३१ रोजी ७ वाजून १५ मिनिटांनी फाशी दिले. ती फाशी एक दिवस अगोदर देण्यात आली आणि लाहोर जेलच्या मागील दरवाजाने या हुतात्म्यांचे मृतदेह बाहेर काढून मोटारने समाधी स्थळाजवळ आणून जवळच असलेल्या सतलज नदीच्या वेगवान प्रवाहात फेकून देण्यात आले अशी नोंद समाधीचे स्थळी करून ठेवण्यात आली आहे. भारावलेल्या अंतःकरणाने समाधीचे दृष्य पहात असताना तेथून पाय काढवत नव्हता सुप्रसिद्ध कवि रामप्रसाद बिसमिल यांच्या उर्दू भाषेतील कवितेचे एक चरण गुणगुणत आम्ही तेथून निघालो भगतसिंग म्हणत असत

सर फरोशी की हर तमन्ना अब
हमारे दिलमें है।
देखना है जोर कितना बाजुए
कातिलमे है।

धडावेगळे शीर व्हावे हीच तर आमची मनिषा आहे आता खून करणाऱ्याच्या बाहुत किती जोर आहे हेच तेवढे बघायचे आहे!

*

१६

# अलौकिक बलिदानाची स्फूर्तिगाथा
# जालीयनवाला बाग

पंजाब राज्याचे नाव काढताच जसा भगतसिंग आठवतो त्याचप्रमाणे जालीयनवाला बागही आठवते फिरोजपूरजवळील पाकिस्तानच्या हद्दीजवळ असलेली हुतात्मा सरदार भगतसिंगाची समाधि पाहून आम्ही अमृतसरच्या मार्गाने निघालो ऊन रणरणत होतें असा उन्हाळाच पाहिला नव्हता किंतीही पाणी प्यावे पण तहान भागत नव्हती. उन्हाळयात अतिशय उन्हाळा आणि थडीत थंडीही कडाक्याची अशी ही विषम हवामानाची धरती आहे. मास्को शहरातल्या उणे ३५ अंश सेंटीग्रेट थंडीची स्मृती मनात असतानाच पंजाबचा हा अभिजात उन्हाळा पाहून डोळे अक्षरश दिपून गेले या हवामानात आपण भाजून, करपून तर जाणार नाहीना अशी क्षणभर शंका मनात डोकावून जाई पण अमृतसरला जाऊन जालीयनवाला बागेत असलेल्या हुतात्मा स्मारकासमोर नतमस्तक झाल्याशिवाय मनाला समाधान कसे लाभणार एक दुर्दम्य शक्ति आम्हाला तिकडे खेचून नेत होती

रस्त्याच्या दुतर्फा हिरवीगार झाडी होती सतलज नदीचे कालवे विणलेल्या जाळ्यासारखे चोहोंबाजूला पसरलेले होते आमची गाडी भरधाव वेगाने अमृतसरकडे जात होती रस्त्यात झाडाच्या गर्द सावलीत एक ‘ढाबा’ होता रस्त्याच्या बाजूला असलेल्या हॉटेलला पंजाबी भाषेत ढाबा म्हणतात असे शेकडो ढाबे प्रवाशांची सेवा करण्यास सज्ज असतात ढाब्या-

वर गाडी थांबवावी. गार पाण्याने तोंड धुवावे वाटाणे आणि बटाटे याच्या रस्त्याबरोबर गरम गरम परोटे आणि उकडलेली अंडी खावी, मोठा 'गिलास' भरून लस्सी प्यावी आणि सावलीत ठेवलेल्या बाजल्यावर खुशाल पधरा वीस मिनिटे ताणून द्यावे यासाठी येथे ढावे असतात प्रवाशा-साठी फार उपयुक्त सेवा या ढावल्याकडून केली जाते थोडावेळ ढाब्यावर थाबून आम्ही निघालो मैलोगणती सपाट जमीन आणि गव्हाच्या पिकाने डबरलेली शेती पहात असताना पंजाबच्या समृद्धीचे दर्शन न कळत घडून जात असे

उपनगरात असलेल्या तुरळक घरानी शहर जवळ येत असल्याचा इशारा दिला सायकल, रिक्षा, टांगे, मोटारी आणि भरपूर धूळ यामुळे शह-रात येऊन पोहोचल्याची खात्री पटली सरदारजीच्या या गावात केशकर्तना-लये बहुतेक नसावीत अशी आमची समजूत होती रहदारीमुळे गाडी खोळबली लक्ष गेले व दिसले काय ? तर एक सदर सलून आणि त्यात एक सरदारजी आपल्या चेहऱ्याची दाढी नीट करवून घेण्यासाठी खुर्चीवर बसलेला आहे. प्रथमदर्शनी आवडण्यासारखे अमृतसर शहर खास नाही पण पजाबच्या कित्येक शतकाचा इतिहास या शहराभोवती गुफलेला आहे विशेषत. १९१९ साली जालीयनवाला बागेत ब्रिटीश सत्ताधाऱ्यांनी जी अमानुष कत्तल केली त्यामुळे या शहराचे नाव भारताच्या स्वातत्र्य लढ्याच्या इतिहासात अजरामर झाले आहे

भर दुपारी अग्नीवर्षाव करणारा सूर्य पश्चिमेकडे कलला होता. आता त्याचा दाह कमी झाला होता आम्ही जालीयनवाला बागच्या प्रवेश-द्वारात उभे होतो सांगितल्याशिवाय समजणार नाही इतके ते द्वार साधे होते. दोहो बाजूला दुकानाच्या रांगा होत्या. रस्त्यावर खूप गर्दी होती आम्ही आत प्रवेश केला समोर एक मोठे पटांगण होते म्हणजे या बागेत प्रवेश करण्यासाठी आणि बाहेर येण्यासाठी एकच रस्ता होता थोडसे पुढे गेल्या-वर एक जागा दर्शविण्यात आली. त्याच जागेवरुन ब्रिटीश अधिकाऱ्याने आपल्या सैन्याला गोळीबार करण्याचा आदेश दिला रौलट अॅक्टचा निषेध करण्यासाठी ही सभा भरविण्यात आली होती व हजारोंच्या सख्येने नाग-रिक उपस्थित होते गोळीबाराला सुरुवात होताच एकच हाहाकार उडाला लोक सैरावैरा धावू लागले २००० लोक जागच्या जागी गोळीबारात ठार

झाले. हजारो जखमी झाले मैदानाला लागूनच एक भलीमोठी विहीर होती त्या विहिरीत अनेकजण पडले दुसऱ्या दिवशी १२६ जणाची प्रेते त्या विहिरीत मिळाली ती विहिर त्या भयानक घटनेची साक्ष म्हणून तशीच ठेवण्यात आलेली आहे अनेक घरांच्या भिंतीना गोळ्या लागल्या गोळीबाराच्या त्या खुणा आजही स्पष्ट दिसतात. अशा अत्याचाराला जगाच्या इतिहासात तोड नाही अपवाद फक्त नाझी जर्मनीच। म्हणता येईल ! हे सारे क्रमाक्रमाने पहात असताना अंगावर शहारे येतात या हत्याकांडच्या वेळी हिंदु–मुसलमान–शिख–ईसाई इत्यादी सर्वांचे रक्त एक होऊन वाहू लागले कधी नव्हती एवढी प्रचंड अशी राष्ट्रीय भावनात्मक ऐक्याची लाट देशात निर्माण झाली सारा देश खवळून उठला यातूनच सरदार भगतसिंगासारखे, सरदार उधमसिंगासारखे तरुण हुतात्मे जन्माला आले. पंजाबच्या खालोखाल बंगाल आणि महाराष्ट्र येथील तरुण पेटून उठला. इंग्रजांच्या साम्राज्यशाहीला अखेरचा धक्का देण्यासाठी सारे राष्ट्र खवळून उठले राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचा उगम जालीयनवाला बागेत शिंपडलेल्या थोर हुतात्म्याच्या रक्तात आहे. या बागेतील भूमीवर पाय ठेवताना मनात चर्रर्र होई न जाणो याच ठिकाणी कोणी तरी प्राण सोडला असेल, कोणाचे तरी रक्त याच बागेतील कणाकणात मिसळून गेले असेल मध्यभागी एक उंच स्तंभ आहे. त्या शिल्पावर एक ज्योत कोरली आहे आम्ही ओंजळभर फुले तेथे वाहिली जालीयनवाला बागेतील हुतात्म्याला मनोमन श्रद्धांजली वाहिली आणि तेथून निघालो पण पाय घुटमळत होते मन रेंगाळत होते.

बागेत अनेक ठिकाणी झाडे आहेत थोडी फार हिरवळही आहे पण एकंदरीत या महान ऐतिहासिक स्मारकाकडे सरकारचे दुर्लक्ष झालेले दिसले. माहिती सांगणारा कोणी मार्गदर्शक नाही की बागेत कसली शिस्त नाही सगळ गबाळ ग्रंथी कारभार ! स्वातंत्र्य मिळविण्यासाठी या देशातील जनतेने कसे कसे बलिदान केले आहे, साम्राज्यशाहीशी कशी झुंज दिली आहे याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे ही स्मारके आहेत इतिहासाने दिलेला हा अनमोल ठेवा भावी पिढीतील युवकासाठी प्रेरणादायक ठरणार आहे म्हणून तो सांभाळून ठेवला पाहिजे त्याची शान राखली पाहिजे

*

१७

# अमृतसरचे सुवर्ण मंदिर शिख धर्माचा मानबिंदू

अमृतसर शहरामध्ये ज्या ठिकाणी जालियनवाला बाग आहे त्याच रस्त्याने थोडेसे पुढे गेल्यावर एक विस्तीर्ण चौक लागतो. सायकल, रिक्षा, टांगे, टॅक्सी यांनी चौकात दाटी केलेली असते आसपासच्या दुकानातून रंगीबेरंगी म्यानातल्या तलवारी लटकावलेल्या असतात निरनिराळ्या आकारातले कृपाण शोरूममध्ये व्यवस्थित मांडून ठेवलेले असतात त्याच्या बरोबर कंकणही असते पण काचेचे नव्हे तर चकचकीत पोलादाचे ! सौंदर्य प्रसाधनें, कातडी बॅग्ज आणि इतरही वस्तूंची दुकानात शानदार मांडणी केलेली असते खास पंजाबचे सौंदर्य मिरवत भडक लाली लावलेल्या महिलांनी दुकानात गर्दी केलेली असते, बाहेर रस्त्याच्या कडेला खाद्य पदार्थ तळल्याचा खमंग वास येत असतो. बुंदी, जिलेबी असा पंजाबी मिठाईचा ढीग लावलेला असतो मध्येच 'जल–जीरा ' म्हणजे एक प्रकारचे शरबत घेऊन हातगाडीवाले फिरत असतात. असे हे सुवर्ण मंदिरा समोरचे दृष्य न्याहाळत आम्ही पादत्राणे काढून ठेवण्याची व्यवस्था असलेल्या खोलीसमोर रांग लावली तेथून टोकन घेऊन बाहेर पडलो डांबरी सडकेवर पाय ठेवताच चांगलेच चटके जाणवू लागले मग मुख्य दरवाजाकडे धाव घेतली. तेथे पहाऱ्यावर असलेल्या सरदारजीच्या आज्ञेवरून उघड्या डोक्यावर टॉवेल टाकले आणि पहिली पायरी

चढण्यापूर्वी तेथे फवारण्यात आलेल्या गार पाण्यात पाय स्वच्छ करून घेतले व मग सगमवरी दगडाच्या पायण्या ओलाडून पुढे जाताच जे दृश्य दिसले त्याने आम्हाला मंत्रमुग्धच करुन टाकले ! पिवळेजर्द सुवर्णाचे मंदिर एका चौकोनी तलावाच्या स्वच्छ पाण्यात आपला खानदानी डामडौल न्याहाळत उभे आहे वर निळेभोर आकाश, खाली पांढरीशुभ्र संगमरवरी फरशी, चौकोनी मोठा तलाव पाण्याने काठोकाठ भरलेला, मध्यभागी मंदिर आणि त्याला जोडणारा सुंदर छोटा पूल तलावाच्या चोहोबाजूला विस्तीर्ण जागा आणि कमानी मागून कमानी असलेली भव्य इमारत सतलज नदीच्या पाण्यासारखे सारे स्वच्छ आणि लखलखीत होते ! अनवाणी पायाने चालण्याची सवय नसल्याने पाय पोळत होते तरी मंदिराचे शिल्प पहाण्याच्या जिज्ञासाने फिरता फिरता एक प्रदक्षिणा पूर्ण झाली व तलावात असलेल्या मंदिराकडे जाण्याच्या छोट्या मार्गावर येऊन पोहोचली. तत्पूर्वी प्रसादाचा भला मोठा द्रोण माझ्या मित्राने हातात दिला होता तो घेऊन मंदीरात प्रवेश केला जागोजागी कमरेला लटकावलेले पहारेकरी (सेवक) उभे होते सारे मंदिर सुवर्णाच्या पत्र्याने मढविलेले होते. पिवळेजर्द आणि सूर्यकिरणात चकाकणारे ! त्या पत्र्यावरचे नक्षीकाम अप्रतिम होते कमानी छत, दरवाजे, घुमट, कळस सारे सोन्याचे होते गुंजा, मासा, तोळा या परिमाणात येथील सोने मोजता येण्यासारखे नव्हते तर ते क्विंटल आणि टनाच्या हिशेबातच मोजावे लागेल हे सारे पहात असताना लेनिनग्राड येथील 'हर्मीटेज' ह्या जगप्रसिद्ध म्युझियमची आठवण झाली एका सोन्याच्या दालनात प्रवेश केल्याचेही आठवले कुप्रसिद्ध झार निकोलायच्या राणीचा तो महाल होता तिला सुवर्णाचे भलते वेड. तिने आपले शयनगृह संपूर्ण सोन्याने मढविलेले आहे चोहोबाजूच्या भिंती नक्षीदार सोन्याच्या पत्र्याने बनविलेल्या, खोलीच्या छतावर सोन्याचा पत्रा, पलंग सोन्याचा, झुंबराचे दिवे सोन्याचे दरवाजे सोन्याचे, खोलीतील सारे काही पिवळे धम्मक आणि चकाकणारे, डोळे दिपून टाकणारे ! कोठे झारच्या राणीचा महाल आणि कोठे हे सुवर्ण मंदिर ! अर्थात त्या महालापेक्षा हे मंदिर अधिक प्रसन्न आणि कलात्मक वाटते

रांकेतून पुढे सरकर गेलो गोड आवाजात पेटी व तबल्यासारख्या वाद्याच्या तालावर भजन चालले होते सुवासिक फुलांची सुंदर आरास करण्यात आली होती येथे आलेले भक्तगण गुरूमंदिराला पैसे अर्पण करतात पैशांचा प्रचंड ढिग पडला होता नोटा एका भल्या मोठ्या पेटीत टाकण्यात येत असत प्रत्येकजण आपापल्या कुवतीनुसार मंदिराला धन अर्पण करताना दिसत होता चौकशी करताना समजले की रोजची सरासरीची जमा केव्हाही एक लाख रुपयाहून कमी होत नाही. या मंदिराचे उत्पन्न प्रचंड आहे. 'गुरुद्वार प्रबंधक कमिटी' या मंदिराची व्यवस्था पहाते पंजाबभर पसरलेल्या निरनिराळ्या गुरूद्वारांना येथून धन सहाय्य मिळते व त्यावर त्यांचे भंडारखाने चाललेले असतात तेथे कोणालाही आसरा आणि अन्न विनामूल्य दिले जाते शिखांच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यासाठी या निधीचा उपयोग केला जातो

अमृतसरचे सुवर्णमंदिर पाहिल्याशिवाय पंजाबच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाची कल्पनाच येणार नाही. हे जितके सत्य आहे, तितकेच भाक्रा-नांगल पाहिल्याशिवाय पंजाबच्या आर्थिक व कृषिविषयक प्रगतीची कल्पना येणार नाही म्हणून अमृतसरचा निरोप घेऊन आम्ही जालंदर लुधियाना मार्गे आनंदपूरसाहेब या ठिकाणी असलेल्या सुप्रसिद्ध गुरुद्वारात मुक्कामासाठी रात्री तीन वाजता येऊन पोहोचलो दिवसा कडक उन्हाळा आणि रात्री थंडी हे पंजाबच्या हवेचे वैशिष्ठ आहे आनंदपूरला येऊन पोहोचलो त्यावेळी अशीच थंडी जाणवत होती पण गुरुद्वारातील अतिथ्याने मात्र आम्ही सारे खूष झालो रात्रीच्या उत्तर प्रहरी देखील तेथील सेवकांनी आमच्यासाठी सब्जी-परोट्याची सोय केली होती हे तीन मजली गुरुद्वार असून एकाचवेळी हजार प्रवासी जेवण करू शकतील इतके मोठे हॉल व अनेक खोल्या व मोकळ्या जागा तेथे आहेत. दोन चार तासांची विश्रांती घेऊन आम्ही गुरुद्वाराच्या महंताचे आभार मानून निघालो उत्तरेच्या दिशेने गाडी धावत होती चोहो बाजूंना सपाट मैदानाचा प्रदेश! कोठे टेकडी नाही की डोंगर नाही सान्या रस्त्याने बाभळीची आणि निंबाची झाडी दिसत होती. कुठे कुठे निलगिरीची झाडीही मुबलक प्रमाणात दिसत

आता मात्र दूरवर निळे-काळे डोंगर दिसू लागले पंजाबच्या भूमी-वरून प्रथमच हिमालयाच्या दूरवर पसरलेल्या रांका बघू लागलो रस्त्यात एक 'चेकपोस्ट' लागले. येथे परवानगी दखावी लागते स्थानिक कार्य-कर्त्यांनी त्वरित परवानगी मिळवून देण्याची व्यवस्था केली व मग आमच्या मोटारीचा ताफा नागल धरणाच्या दिशेने धावू लागला तीक्ष्ण वळसे घेत घेत मोटारी डोंगराच्या माथ्याच्या दिशेने धावू लागल्या घाटमाथ्यावर पोहोचताच सतलज नदीचे हिरवे-निळे पाणी खळखळाट करीत चाललेले दिसले नदीच्या काठाकाठाने पुढे गेल्यावर भाक्रानागल धरणाच्या पाय-थ्याशी आम्ही येऊन दाखल झालो इतका नयनरम्य परिसर फारच थोड्या ठिकाणी आढळतो चोहोबाजूंनी डोंगराच्या उंच रांका दिसत होत्या. आम्ही दरीत होतो वर आकाशाचा एक निळा तुकडा छान दिसत होता हवा गार आणि उत्साहदायक होती. धरणाच्या भितीशेजारी प्रवाहाच्या दक्षिण तीरा-वर अमेरिकेच्या साह्याने उभारण्यात आलेले जलविद्युत केंद्र आहे तेथे तयार होणारी वीज पंजाब, हिमाचलप्रदेश, हरियाना आणि राजस्थान इत्यादि राज्यांना पुरविण्यात येते या धरणाची उंची सातशे फुटांहून अधिक म्हणजे कुतुबमिनारच्या तीनपटीने उंच आहे उंचीच्यादृष्टीने हे जगातील सर्वात मोठे धरण मानले जाते या धरणाच्या जलाशयातून जे कालवे निघतात त्यांची लांबी २० हजार मैल भरेल इतकी दीर्घ आहे. यावरून पंजाबला वीज आणि पाणीपुरवठा कसा व किती होत असतो याची कल्पना येते धरणाच्या बधाऱ्यावरून पलिकडे पसरलेल्या निळ्याभोर जलाशयाचा प्रचंड विस्तार पाहून मानवी श्रमाच्या निर्मिती क्षमतेची कल्पना करताच मती गुग होऊन जाते ७० चौरस मैलाचे हे प्रचंड जलाशय म्हणजे एक आधुनिक चमत्कारच आहे !

भाक्रा नागल पहायचे झाले तर तेथे एक दोन दिवसाचा मुक्काम केला पाहिजे पण ते शक्य नव्हते, म्हणून दुपारी आम्ही डोंगर उतरायला प्रारंभ केला व चार तासाच्या प्रवासानंतर भारतातील सुंदर शहर म्हणून ज्याचा कीर्तिसुगंध सर्वत्र पसरला आहे, त्या चंदीगड शहरी येऊन दाखल झालो रुंद व सरळ रस्ते, माणसांनी गजबजलेले असले तरी गर्दी जाणवत

नाही ही पंजाब आणि हरियाना या दोन्ही राज्याची राजधानी आहे त्यामुळे दोन्ही राज्याची मत्रालये व दोहोसाठी एकच हायकोर्ट आहे भाषिक प्रश्नावर निर्णय घेण्याची कुवत नसल्याने केंद्र सरकारने चंदीगडचा प्रश्न बेळगावच्या सीमा प्रश्नासारखा धुमसत ठेवलेला आहे जणू हे शहर म्हणजे राज्यकर्त्यांच्या निर्णयशून्यतेची शरणपताकाच आहे !

चदिगड ते दिल्ली ५ तासाचा प्रवास आहे रस्ता अतिशय चागला दुतर्फा निलगिरीच्या वृक्षाची गर्द सावली. त्यामुळे प्रवासाचा शीण जाणवत नाही दिवे लागण होऊन गेली होती. दोन तरूण सरदारजी समोरच्या दरवाजाने गाडीत चढले खरे म्हणजे या दरवाजाने उतरायचे असते दोघेही चिक्कार प्याले होते आल्याबरोबर त्यानी आतील प्रवाशाबरोबर झोंबाझोंबी सुरू केली आणि आश्चर्य म्हणजे त्याना समज देण्यास कोणीच पुढे येईना पण दुसऱ्याच स्टापवर ही ब्याद गाडीतून खाली उतरली व दिसेनाशी झाली रस्त्यात एक नदी लागली. नदीचे नाव होते मार्कंडेय मला आमच्या बेळगावच्या मार्कंडेय नदीची आठवण झाली पण ही नदी भलतीच मोठी होती एका नावाची अनेक गावे असतात पण एकाच नावाच्या अनेक नद्या असू शकतात याची मला कल्पना नव्हती. गव्हाच्या भरघोस पिकाने ओथंबलेली पजाब हरियाणाची भूमि न्याहाळत आमचा प्रवास चालत होता दिवसभर आपल्या किरणातून जगाचा वर्षाव करणारा सूर्य अस्ताचलाला गेला होता तांबूस पिवळ्या संधी प्रकाशात पृथ्वी न्हाऊन निघाली होती भरधाव वेगाने आमची गाडी दिल्लीच्या दिशेने चालली होती

✤ ✤

१८

# विंध्य पर्वतराजीत वसलेले रेणूकूट

उत्तर प्रदेशातील अलाहाबाद स्टेशनवर गाडी येऊन पोहोचली त्यावेळी रात्रीचे ११ वाजत आले होते जानेवारीतला पहिला आठवडा असल्याने कडाक्याची थंडी पडली होती हातात बॅग आणि खांद्यावर गरम कोट घेऊन मी गाडीतून खाली उतरलो त्यावेळी स्टेशनच्या फलाटावर तशी धावपळ कमीच होती कुंभमेळ्याला मकर संक्रातीपासून प्रारंभ होणार असल्यामुळे बैरागी, साधू यांनी स्टेशनच्या परिसरावर आक्रमण केले होते मुंबईहून जेव्हा निघालो त्यावेळी डब्यात एका ' महाराजां ची व त्याच्या शिष्यवृंदाची सोबत लाभली होती. भल्या पहाटे ते महाराज उठले आणि त्यांनी एका स्टेशनवर ४–५ मिनिटात आंघोळ आटोपून घेतली नंतर त्यांनी गाडीतच धुपदाणीत अग्नी प्रज्वलीत करून डबाभर धूर केला महाराजांच्या पूजेचा प्रारंभ नेहमी असाच होतो असे शिष्य म्हणत. धावत्या गाडीच्या डब्यात आग पेटविण्यास मी हरकत घेतल्याने महाराज मनातून खवळले होते पण क्रोध व्यक्त करणे त्यांच्या तत्वात बसत नसल्याने ते शांत होते अखेरीस एका मराठी भाषिक शिष्यास माझे समाधान करण्यासाठी त्यांनी पाठवून दिले थोड्या वेळाने पूजा आटोपली आणि प्रसाद म्हणून शिरा, सफरचंदाच्या फोडी, पेरू असे पदार्थ घेऊन शिष्य माझ्याकडे आला पण मी प्रसाद घेण्याचे चक्क नाकारले एकाच डब्यात असल्याने महारा-

आंच्या नजरेतून हे सुटले नाही. इतर शिष्यगण मात्र पहातच राहिले. त्यावेळी महाराज म्हणाले, 'जब आदमी दिलका सच्चा होता है तबही वह प्रसाद लेनेसे इन्कार करनेकी हिम्मत करता है ' महाराजांच्या प्रशस्तीने मला बरे वाटण्याचे तसे काही कारण नव्हते मात्र डब्यातला सारा शिष्यगण माझ्याकडे आदराने बघू लागला हा प्रसंग आठवत रेणूकूटला जाण्यासाठी कोणत्या फलाटावर गाडी येते याची चौकशी करून लगबगीने तेथे गेलो.

अलाहाबादच्या या फलाटावर माणसांची काहीच वर्दळ नव्हती, त्यामुळे मला मोठे चमत्कारिक वाटत होते. थंडीपासून बचाव करण्यासाठी काही रेल्वे-कामगार एका मोठ्या शेकोटीभोवती गोळा झाले होते. विड्या ओढता ओढता त्यांच्या गप्पाड़ी चालल्या होत्या महाभारतातील भीमार्जुन कथेपासून इंदिरा गांधी आणि आणीबाणी या विषयापर्यंत त्यांचे गप्पांचे विषय होते. मीही त्यांच्यात सामील होऊन उभा राहिलो, पण गर्दीमुळे शेकोटीची ऊब मात्र माझ्यापर्यंत पोहोचत नव्हती इतक्यात लखनौ-चोपन ही एक्स्प्रेस गाडी धूर ओकतच स्टेशनात घुसली याच गाडीने चोपनपर्यंत मला जावयाचे होते व तेथे गाडी बदलून पुढे रेणूकूटला पोहोचावयाचे होते जागा चांगली मिळाल्यास थोडी विश्रांती लाभेल म्हणून गाडीचा वेग मंदावताच डब्यात शिरलो व एका फळीवरची जागा पकडून बिछाना पसरला डब्यात एकही प्रवाशी नव्हता, मी एकटाच होतो त्यामळे शंका वाटू लागली की, ही गाडी येथेच थांबत असावी. मग खाली उतरून पुन्हा शेकोटी भोवती गोळा झालेल्या कामगारांना विचारले तर ते म्हणाले की ही अशी रिकामीच गाडी चोपनपर्यंत जाते चोपन हा आकडा नसून ते एका स्टेशनचे नाव आहे मग या गाडीत प्रवासी कसे नाहीत ? या माझ्या प्रश्नावर चिंतातूर नजरेने तो म्हणाला, 'साब ! इस लाईनपर हमेशा खतरा रहता है ! डाकू लोग छापा मारकर लोगोंका सामान ले जाते है ' मी कामगार नेता असून रेणूकुट या ठिकाणी भरल्या जाणाऱ्या अखिल भारतीय अल्युमिनियम कामगार फेड-रेशनच्या बैठकीसाठी जात असल्याचे समजतान तर त्या बिचाऱ्याला मठीच चिंता वाटली या गाडीने पुढे जाऊ नये असा त्याने सल्ला दिला.

पण जाणे जरुरीचेच आहे असे मी म्हणताच त्याने ज्या डब्यात गस्त घालणारे पोलीस आहेत त्याच डब्यात माझी बसण्याची सोय केली

बाराच्या सुमारास गाडी सुरू झाली आणि थोड्या वेळाने मी माझी पथारी पसरली चोरट्यांनी हिसकावून घ्यावे असे माझ्याजवळ विशेष काही नव्हते पण मी सावधाणे डब्यात पाय पसरले संगीनी लावलेल्या बदुकी घेतलेले ७-८ पोलीस डब्यात होते तेव्हा निर्धास्तपणे झोप घेण्यास हरकत नव्हती पण झोप काही येत नव्हती सुमारे ५० तासाच्या दीर्घ प्रवासाने थकून गेलो होतो झोपेच्याऐवजी एक प्रकारची ग्लानी येत होती गाडी स्टेशनच्या बाहेर लाब सिग्नलसाठी थाबलेली असावी. मी पडल्या पडल्याच अदाज घेत होतो इतक्यात एक मोठा दगड भिरभिरत आला आणि खिडकीच्या काचेच्या तावदानाचा चक्काचूर झाला गाडीत दिवे नव्हते पोलिसानी बदूकी उचलल्या काहींनी खाली उड्या टाकल्या. मीही चटकन उठून बसलो आता गोळीबाराचा कानठळ्या बसणारा आवाज ऐकू येणार अशी मी अपेक्षा केली होती पण गाडीची कर्णकर्कश शीळ झाली विध्याचलीच्या दरीत ती घुमून राहिली चपळाईने पोलीस पुन्हा गाडीत चढले गाडी भिस्या वेगाने चालू लागली डब्यातील अधारात कोणकोणाशी बोलत नव्हते आत्मसरक्षणाचा पवित्रा घेऊन प्रत्येकजण सावधपणे बसला

पहाटे ४ च्या सुमारास चोपन स्टेशन आले लगबगीने खाली उतरलो आणि शेजारच्या प्लॅटफॉर्मवर उभ्या असलेल्या गाडीकडे धावतच गेलो एकाही डब्यात दिवे नव्हते पण माणसाच्या बोलण्याचा गलका ज्या डब्यातून येत होता त्यातच मी शिरलो बरेचजण डब्यात बिडी ओढत असावेत कारण आत शिरताच तबाखूचा दप नाकात शिरला गारठ्यामुळे अनेकांनी अगाभोवती काहीना काही गुडाळून घेतले होते एक दोघेजण बाकावर झोपले होते बरेचजण आपापसात कुजबुजत होते. मीही सहप्रवाशाबरोबर सभाषण सुरू केले आमच्या गप्पाना हळू हळू रग चढू लागला कारण या डब्यात बसलेल्यापैकी बरेचजण कोळशाच्या खाणीतील कामगार होते मासळीला पाण्यात सोडल्यानतर जेवढा आनद व्हावा

तेवढा आनंद मला या कामगाराच्या संगतीत झाला. हल्लेखोरांनी गाडीवर केलेल्या दगडफेकीचा प्रसंग मी पार विसरून गेलो होतो पगार, महागाई, युनियन व सरकार याबद्दलची चर्चा सुरू करताच कामगाराचे चेहरे खुलून गेले रेणूकूट येथे असलेल्या हिंदुस्थान अॅल्युमिनियम या बिर्ला शेटजींच्या मालकीच्या कारखान्यात युनियनच्या कामासाठी मी दूर दक्षिणेकडून आलो आहे हे समजताच त्यांना आनंद झाला तासाभरात धुक्याचा पडदा बाजला सारून सूर्याची किरणे डब्यात आली आता कोठे आम्ही एकमेकाचे चेहरे पाहू शकत होतो अगोदर त्या अंधाऱ्या डब्यात विडी शिलगावताना होणाऱ्या काडीचा प्रकाश तेवढाच मधून मधून दिसे स्टेशनामागून स्टेशने मागे चालली. काही प्रवासी उतरले तर काही नवे चढले लांबूनच 'रेणूकूट' ही पिवळ्या अक्षरातील स्टेशनावरची पाटी वाचली बॅग खाद्याला अडक-विली आणि मी जणू बळगाव स्टेशनवरच उतरत आहे अशा दिमाखाने खाली उतरलो. मी येत असल्याची तार दिली नसल्याने मला नेण्यासाठी स्टेशनवर कोणी येणार नाही याची मला कल्पना होती. तरी एक कॉम्रेड हातात लाल झेंडा घेऊन स्टेशनच्या प्रवेशद्वारात कोणाची तरी वाट पहात उभा होता धोतर आणि सैल अंगरखा असा त्याचा पोशाख होता आकडे-बाज मिशा, लांब कल्ले आणि डोक्यावर अगदीच कमी केस असल्यामुळे त्याचे व्यक्तीमत्व नजरेत भरण्यासारखे होते तो या भागातला असल्यामुळे थंडीचा त्याला सराव होता त्याच्याशी हस्तांदोलन करून माझा परिचय करून देताच त्याला खूप आनंद झाला या गाडीने आणखी कोणी म्हणून थोडा वेळ वाट पाहून आम्ही फॅक्टरीच्या रस्त्याने चालू लागलो गाडी थांबलेल्या ठिकाणापासून २ स्टेशन शभर फूट तरी उंचीवर असावे बऱ्याच पायऱ्या चढल्यावर स्टेशनची इमारत लागते तेथून बाहेर पडल्यावर पहातो तर सर्वच टेकड्याच टेकड्या !

दूरवर विंध्य पर्वताचे फाटे पूर्व-पश्चिम पसरले आहेत थंडीमुळे माणसांची वर्दळ तशी कमीच आहे एक छोटी दरी पायवाटेने ओलांडून मुख्य रस्त्याला पोहोचलो अनेक शतकामागे विंध्य पर्वत अगस्ती मुनीने उत्तरेकडून दक्षिणेकडे असा ओलांडला आणि थेट तामिळनाडू पर्यंतचा भाग

त्यांनी पायाखाली घातला अशी वर्णने वाचलेली मला आठवली पण मी तर आता प्रत्यक्ष विंध्याचल पर्वतराजीच्या कुशीत बसलेल्या अल्युमिनियम कारखान्याच्या परिसरात येऊन दाखल झालो तो दक्षिणेकडून उत्तरेकडे ! दहा हजाराहून जास्त कामगार असलेल्या रेणूकूट या गावात देशातल्या सर्व अल्युमिनीयम कामगाराचे प्रतिनिधी एक दोन दिवसात येणार होते व रीतसर परिषदेच्या कामाला प्रारंभ होणार होता. परप्रांतात भरणाऱ्या कोणत्याही परिषदेला सर्वांअगोदर हजर होणे आणि सर्वात शेवटी तेथून परत फिरणे हा नियम मी पाळत असल्याने रेणूकूट येथील कार्यालयात सर्वप्रथम आलेला प्रतिनिधी म्हणून माझे चांगलेच स्वागत झाले त्यामुळे प्रवासाचा सारा शीण क्षणभरात नाहीसा झाला ! ..

□ □

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
६७३
१५।५।८६
(स्थळ प्रत)

१९ :

# विंध्याचलाच्या कुशीत वसलेले रेणूकूट
## आणिबाणीच्या काळात उत्तरप्रदेशात आलेले अनुभव

रेणूकूट येथे असलेल्या हिंदुस्तान ॲल्युमिनियम या बिर्ला शेटजींच्या फॅक्टरीच्या परिसरात तर येऊन पोहोचलो या ठिकाणी असलेली शेकडो एकर जमिन कंपनीची आहे कामगारांची घरे, झोपड्या, दुकाने, उपहारगृहे इत्यादिंची सारी जागा कंपनीची इतकेच काय शाळा, इस्पितळ आणि मंदिरदेखील कंपनीचे म्हणजे बिर्लांच्या मालकीचे म्हणून येथे असलेल्या भगवान शंकराच्या मंदिराला 'बिर्ला मंदिर' असे नांव आहे. आणि मंदिरात प्रवेश करताच प्रथम बिर्ला शेटजींच्या मातोश्रीचा भव्य पुतळा लागतो व त्या पुतळाचे दर्शन घेतल्यावर मग पुढे भगवान शंकराच्या दर्शनास जावे लागते

या परिसरात कामगारांच्या युनियनसाठी जागा मिळणे कठीण! म्हणून एका पत्र्याच्या छपराखाली कामगारांनी आपले कार्यालय थाटले होते तेथे येऊन पोहोचलो सारी कामगार नगरी धुक्यात लपेटून गेली होती दोन दिवस आंघोळ नव्हती म्हणून पहिल्यांदा स्नानगृह गाठले एक पत्र्याचा दरवाजा आणि एक नळ म्हणजे येथील स्नानगृह. कडाक्याच्या थंडीत नळाच्या गार पाण्याने आंघोळ करणे म्हणजे माझ्या अंगावर अक्षरश काटा उभा राहिला पण 'गंगामाई' चे नांव घेऊन नळाखाली

डोके धरले व भरपूर आंघोळ करून घेतली थोडे बरे वाटले तोपर्यंत उत्तर प्रदेशचे वयोवृद्ध कामगार नेते हरिष तिवारी, ललन रॉय, दादा मुखर्जी इत्यादी मंडळी ऑफीसवर जमू लागली कोपऱ्यातील एक चारपायी (बाज) पकडून त्यावर बिछाना ठेवून दिला येथे जमिनीवर कोणी झोपत नाही कारण जमिन अतिशय थंड झालेली असते

कामगार परिषदेच्या कामकाजाची रूपरेषा आखण्यासाठी आम्ही चर्चा करीत बसलो असताना मुख्य रस्त्याने एक पोलीसाची जीपगाडी सावकाश चालली होती व लाऊडस्पिकरवरून मोठमोठ्याने किंचाळून रेणूकूटच्या गांवात आजपासून १४४ कलम लागू करण्यात आल्याचे पोलिस जाहीर करीत होते लाठी, काठी, बंदुक, सुरे, तलवारी घेऊन कोणी फिरू नये व चारपेक्षा जास्त इसमानी एकत्र जमू नये असे ते सांगत होते आमच्या परिषदेला सुरूंग लावण्यासाठीच हा हुकूम निघाला आहे हे आमच्या लक्षात आले व चर्चा सोडून आम्ही पोलिस जीपकडे अधिक माहिती घेण्यासाठी गेलो त्यावेळी पुन्हा पुन्हा चारपेक्षा अधिक जणानी रस्त्यावर जमू नये वगैरे आदेश पोलिस देत होते. युनियनचे नेते ललन रॉय यांनी गंमतीने विचारले 'चार आदमीसे जादा लोग रास्तेपर नही चलना है तो दो या तीन मिलकर सौ पाच सौ आदमी चल सकते है ?' पोलिस अधिकारी गोंधळात पडला व त्याने लाऊडस्पिकरवरून सांगावयास प्रारंभ केला की चारच काय दोन किंवा तीन जणानी देखील रस्त्यावरून फिरता कामा नये इतक्यात त्या भागाचे मॅजिस्ट्रेटही तेथे आले दोन किंवा तीन इसमांनी देखील फिरू नये ही पोलिसांची घोषणा मॅजिस्ट्रेटने ऐकली व कपाळावर हात मारून घेतला त्यानी खुलासा केला की, १४४ कलमानुसार चाराहून अधिक इसमाना एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे पोलिस हिरमुसले होऊन लाठी काठी, तलवार, सुरे... वगैरे ओरडत निघून गेले आणिबाणीच्या काळात उत्तर प्रदेशातील एका मोठ्या कामगार केंद्रात पोलिस खाते किती निर्बुद्धपणे वागत आहे याचा अनुभव आला मॅजिस्ट्रेटने परिषदेवर बंदी घातली रेणूकूट शहरात परिषद सभा, मिरवणूक सर्व बंद ! एखाद्या सभागृहात परिषद घ्यायचीच झाली

तर श्रीमती इंदिरा गांधी व श्रीमान संजय गांधी यांच्यावर टिका करा-करावयाची नाही, आणिबाणी लागू केल्याबद्दल केंद्र सरकारला दोष द्यावयाचा नाही, कुटुंब नियोजनाबद्दल बोलायचे नाही, महागाई-बेकारीचा प्रश्न काढायचा नाही वक्ते काय बोलणार हे त्यांनी अगोदर पोलिसांना लिहून कळविले पाहिजे अशा हास्यास्पद अटी होत्या या अटी मान्य करायच्या म्हणजे तोंडाला फडके बांधूनच वक्त्यांनी भाषणे करायची व श्रोत्यांनी कानात बोटे घालून भाषणे ऐकायची असाच याचा अर्थ होतो शिवाय शेवटची अट अशी होती की कामगाराशिवाय कोणी सभेला येता कामा नये व सभेतले भाषण सभागृहाबाहेर कोणाला ऐकू येता कामा नये ! थोडक्यात म्हणजे राम व रावण यांचे नाव न घेता रामायण व पांडव-कौरव यांचे नाव न घेता महाभारत सांगितले गेले पाहिजे !

कोणतेही खास कारण नसताना उत्तरप्रदेश सरकारने केवळ आणी बाणीचे निमित्त करून कामगार चळवळ दाबून टाकण्याचा कसा प्रयत्न केला याचे हे मोठे बोलके उदाहरण आहे सरकारच्या या कृत्याचा निषेध म्हणून आम्ही रेणूकटची ही अखिल भारतीय अॅल्युमिनियम कामगाराच्या फेडरेशनची पहिली परिषद रद्द केली आणि रेणूकूट गावाच्या हद्दीशेजारी असलेल्या तुर्रा या वीजकेंद्राच्या हद्दीत परिषद भरविली तेथे शेकडो कामगार घोषणा देत जमा झाले, व मोठ्या उत्साहाने कामकाज पार पडले रेणूकूट आणि तुर्रा या दोन गावाच्या हद्दामध्ये केवळ एक रेल्वेवरचा पूल आहे पुलाच्या त्या बाजूला तुर्राची हद्द आणि पुलाच्या या बाजूला रेणूकूटची हद्द या परिषदेला देशाच्या सर्व भागातून प्रतिनिधी आले होते

तुर्रा हे उत्तर प्रदेशातले सर्वात मोठे जलविद्युत केंद्र आहे या केंद्रा तूनच बिर्ला शेटजींच्या अॅल्युमिनियम कारखान्याला दीड नवे पैसे युनिट प्रमाणे वीज पुरविली जाते व त्यामुळे प्रतिवर्षी उत्तर प्रदेश सरकारला कित्येक कोटी रुपयाचे नुकसान सहन करावे लागते परिषदेनंतर या वीजकेंद्र परिसराला भेट दिली येथील अतिथीगृह अतिशय सुंदर आहे त्याच्यामागे एक उंच टेकडी आहे. तेथून दिसणारे धरणाचे पाणी विंध्य पर्वताच्या दऱ्या

खोऱ्यात पसरले आहे पर्वतराजींचे सुळके पाण्यानी वेढलेले आहेत पश्चिमेचे क्षितिज तर पाण्यावर विसावल्यासारखे दिसत होते. वर निरभ्र आकाश दूरवर पसरलेले धुक्याचे पट्टे, वीज केंद्रातून येणारा गभीर आवाज पाण्याची खळखळ, हिरव्यागार पाण्यानी डवरलेली वनराई, टेलीफोनच्या तारावर बसून बुलबुल पक्षाने सुरु केलेले गाणे .. अविस्मरणीय दृष्य होते!

निसर्गाच्या दृष्याने मी वेडा होऊन जातो पण या स्वर्गीय निसर्गाच्या सान्निध्यात डोंगर कपारीतून राहणाऱ्या आदिवासीचे स्मरण मला झाले नाही तर मी 'साम्यवादी' कसला ? आम्ही काही कार्यकर्ते या भागातील आदिवासीच्या जीवनाचा परिचय करून घेण्यासाठी विंध्य पर्वताच्या घनदाट भागात निघालो येथे फार मोठ्या संख्येने आदिवासी राहतात १० वाजेपर्यंत जंगलातल्या एका वस्तीवर आलो सर्वत्र सामसूम होते. कौलारू घरे नव्हतीच साऱ्याच झोपड्या, भयानक थंडीपासून बचाव करण्यासाठी आदिवासींच्याकडे गरम कपडे कोठून येणार ? वाळलेल्या लाकडाचे ओंडके पेटवायचे आणि त्याच्याभोवती शेकत शेकत रात्र काढायची आणि पहाटे पहाटे झोपायचे असा क्रम असतो कोणाकडेही अंगभर कपडे नव्हते काळ्या कुळकुळीत शरिराचे उंच व सडपातळ आदिवासी तसे रेखीव बांध्याचे वाटले. सकाळी उशीरा उठायचे आणि मग टोळ्या टोळ्या करून अन्नासाठी रानोमाळ भटकायचे, कामगार वस्तीवर काही काम मिळाल्यास करावे, नाहीतर भिक्षादेही करून उपजिविका भागवावी अशी त्यांची दिनचर्या असते. श्रीमती गांधी त्यावेळी भारताच्या पतप्रधान होत्या आणि त्याच्या अलाहाबादपासून दक्षिणेकडे असलेल्या या डोंगराळभागात आदिवासी इतके मागासलेले राहू शकतात याचे मला आश्चर्य वाटत राहिले! असे लक्षावधि अदिवासी देशाच्या निरनिराळ्या भागात पसरलेले आहेत शहरी सांस्कृतीचा त्याना साधा स्पर्शदेखील झालेला नाही! त्यांना भाषा आहे पण लिपी नाही या आदिवासी जनतेला खऱ्या अर्थाने या देशाचे नागरिक बनविले पाहिजे त्याना समाजाचा इतर थराबरोबर आणले पाहिजे.

* *

/

२० :

# ऐतिहासिक स्मृति कवटाळून बसलेले गोल घुमटाचे गाव– विजापूर

'विजापूरला येऊन गोलघुमट न पहाता जाणे म्हणजे त्या जागतिक कीर्तिच्या चमत्काराचा अवमान होईल नाही'

'मग घुमट बघायला नको कोणी सांगितले ? चला माझ्या बरोबर!'

'पण जायचे कसे ?'

'त्याचयात काय ? आपल्याकडे तर गाडी आहे'

'अरे ! आपण पायीच जाऊ चालायची आपली सवय तशी जुनीच आहे नाही ?'

आम्ही मग पायीच निघालो अदिलशहाचा दरबार भरत असे त्या ठिकाणी आता जिल्हाधिकाऱ्याची कचेरी आहे. तसेच न्यायालयही याच वास्तुत आहेत बऱ्याच भिंती आणि तटबंदी, बुरुज ढासळलेले आहेत एका पडक्या भिंतीच्या आडोशाला तीन दगडाची चूल लावून एका बेवर कुटुंबाचा संसार चाललेला शेजारीच एक मूल प्रात विर्धा उरकीत होते. त्याचा बाप प्लॅस्टिकचे एक डबडे घेऊन याच कार्यासाठी आडोसा शोधीत चालला होता. ऐतिहासिक वास्तूचे हे प्रथम–दर्शन घेऊन आम्ही पुढे निघालो दुर्दैवाने आमच्या बहुतेक ऐतिहासिक वास्तूंची अशीच अक्षम्य हेळसांड चाललेली आपण पहातो त्यामुळे मला आश्चर्य वाटले नाही. दरबाराच्या

अंगणात एक गर्द छायेचा डेरेदार कडुलिंब उभा होता हिरव्या पोपटांनी त्यावर गर्दी केली होती एक मोठा थवाच त्यावर बसून कलकलाट करीत होता किल्ल्यातील वाड्याचे भग्नावशेष न्याहाळीत आम्ही पुढे चाललो थोड्या अंतरावर असलेल्या जामा मशिदीजवळ येऊन पोहोचलो दिल्लीची जामा मशिद मी अनेक वेळा पाहिली आहे प्रचंड आणि भव्य असेच त्या मशिदीचे वर्णन करावे लागेल अगदी त्याच तोडीची ही दक्षिण भारतातील मशीद आहे प्रवेशद्वाराजवळ पादत्राणे ठेवून आम्ही आत प्रवेश केला आतल्या भागातल्या डौलदार कमानी नक्षीकामाने सजविलेल्या खिडक्या आणि विस्तीर्ण दगडी चौथरा पाहून थक्क झालो इस्लाम धर्म निर्गुणाचा उपासक असल्यामुळे अर्थातच मशिदीत मूर्ति नसते असते केवळ एक प्रचंड भींत ! त्या भिंतीवर एक भला मोठा पडदा सोडण्यात आला होता तो बाजूला सारून आम्ही पाहु लागलो तर तेथे सुवर्णाच्या अक्षरात कुराणाचा काही भाग लिहिलेला आढळला १६८६ साली औरंगजेब बादशहाने विजापूरवर हल्ला करून आदिलशाहिचा पाडाव केला नंतर तो मोगल बादशहा नमाज पठण करण्यासाठी या मशिदीत आला त्या घटनेची स्मृति म्हणून त्याने या मशिदीला पूर्वेकडून एक मोठा विशाल दरवाजा बांधविला आणि भिंतीवर सुवर्णाक्षरात काही मजकूर नोंद करून ठेवला. आदिल-शाहीतील पाचव्या सुलतानाने बांधलेली ही 'जामा मसजीद' पाहून आम्ही पुढे निघालो.

जगप्रसिद्ध गोलघुमट तर येथून अगदीच जवळ आहे दहा पंधरा मिनिटात तर आम्ही तेथे येऊन पोहोचलो तीस वर्षापूर्वी कॉलेजमध्ये असताना आमची सहल येथे आली होती त्यावेळी मोठ्या कुतूहलाने गोल घुमट पाहिला होता आता तो पुन्हा पहावयाचा योग आला होता भारत सरकारच्या पुराण वस्तु संशोधन खात्याने गोल घुमटाच्या परिसराचा संपूर्ण कायापालट केल्याचे दिसून आले सभोवताली विस्तीर्ण हिरवळ आहे. मधून मधून बोगनवेलीची झाडे आहेत काही जुने डेरेदार वृक्ष सावली देत उभे आहेत ऐन उन्हाळ्यात जणू वसंत बहरला आहे असे वाटत होते सुरवातीलाच एक म्युझियम लागते पण काही कारणास्तव ते बंद होते.

मात्र घुमट पहाण्यासाठी तिकीट येथेच मिळाले पायऱ्या चढून आत प्रवेश केला केवळ चार भिंतीवर आधारलेला हा प्रचंड घुमट पाहून मन थक्क होते आदिलशाही घराण्यातला सातवा सुलतान महमद १६२६ साली गादीवर आला व त्याने बांधकामास प्रारंभ केला १६५६ साली तो मरण पावला आपली प्रिय पत्नी व कन्या यांच्या स्मरणार्थ त्याने हा घुमट बांधला व मृत्युनंतर त्यालाही त्याच्या पत्नीशेजारीच दफन करण्यात आले

साधारणपणे बहुतेक मुसलमान बादशहा आपली सुंदर कबर आपल्या हयातीतच बांधून ठेवीत असत याच प्रथेनुसार आदिलशहाने हा घुमट बांधला व शहाजहान बादशहाने बांधलेल्या ताजमहाल इतकाच तो जगप्रसिद्ध झाला ताजमहालमध्ये सौंदर्य आहे गोलघुमटातही सौंदर्य आहे तसेच विज्ञानही आहे विज्ञानाचा चमत्कार सौंदर्याचे अलंकार घालून येथे उभा आहे एका निमुळत्या गोल जिन्याने वर निघालो एक मजला ओलांडल्यावर बाहेर गॅलरीत येऊन विजापूर शहराचे रूप न्याहाळीत आम्ही घुमटाच्या प्रवेशद्वारापाशी आलो वाकून जाण्याइतकी निमुळती वाट ओलांडून घुमटाच्या गाभाऱ्यात प्रवेश केला आणि आनंदाने टाळ्या पिटल्या टाळ्या पिटल्यानंतर त्या घुमटातील ऐतिहासिक पुरुषाने एका टाळीला दहादेळा प्रतिसाद देऊन आमचं स्वागत केले 'गोल घुमट बांधणाऱ्या महान शिल्पकारा तुला अभिवादन!' आणि अभिवादन, अभिवादन असा प्रतिध्वनी अनेक वेळा ऐकू येऊ लागला हा घुमट अतिशय संवेदनाक्षम आहे प्रचंड घुमटात समोरासमोर भिंतीला कान लावून उभे रहावे आणि एकमेकांशी खुशाल बोलत रहावे! आवाजाचा असा चमत्कार जगात कोठे आढळणार नाही सांगलीहून तरूणांचे एक पथक सहलीसाठी येथे आले होते त्यातील एकाला राम जोश्यांची लावणी सुचली "सुंदरा मनामध्ये भरली, हवेलीत शिरली, मोत्याचा भांग... कोण कुणाची नार.. आणि मंत्रमुग्ध होऊन आम्ही ऐकू लागलो आमच्या समोरच्या भिंतीकडे ती मुले होती व मध्ये चक्क ६८ फुटांचे अंतर होते मोठी गंमत आली टाळ्याच टाळ्या! मलीक संदल इराणचा शिल्पशास्त्रज्ञ गोल घुमट बांधण्यासाठी येथे आला होता व तो पूरा होताच तो येथेच राहिला व

येथेच निधन पावला त्याची कबरही येथून जवळच आहे वरून खाली आल्यावर पश्चिमेच्या बाजूने गोल घुमटाच्या तळघरात जाण्यासाठी जागा आहे तिकडे निघालो. आता जाऊन पाहातो तर भिन्न काळोख पण थोड्या वेळात सारे स्पष्ट दिसू लागले तळघरात मोठमोठ्या भक्कम दगडी कमानी असून ७ मजली मनोऱ्याचा हा प्रचंड घुमूट या कमानींनी तोललेला आहे डाव्या बाजूने पुढे गेल्यावर एक 'खलवत खाना' लागतो. व तेथून जवळच मध्यभागी सुलतान महमद व त्याची पत्नी यांची कबर आहे त्या अंधारात एक मेणबत्ती मिणमिणत होती. कोणे एकेकाळी येथे अत्तराचे दिवे पेटले असतील !

या शहाभोवती पूर्वी तटबंदी होती. तिचे अवशेष स्पष्ट दिसत होते दूर अंतरावर बारा कमान वास्तुचा भाग दिसत होता सैनिक शाळेची इमारत रेल्वे स्टेशन सारे स्पष्ट दिसत होते. पण विजापूरच्या औद्योगिक विकासाचे कोणतेच चिन्ह येथून दिसत नव्हते धूर बाहेर फेकणारी एकही फॅक्टरी दिसली नाही दिसत होती असंख्य थडगी, मनोरे, बुरुज, मशिदी, तटबंदी व मैदाने.. धावणाऱ्या गाड्या, रिक्षा, सायकल रिक्षा, टांगे, बैलगाड्या. इतिहासकालातून विजापूर अजून मुक्त झालेले दिसत नव्हते !

❀ ❀

२१ :

## सह्याद्रीच्या घाट माथ्यावर काळी नदी प्रकल्प

### मानवी श्रमशक्तीचे अचाट कार्य

बेळगाव शहरापासून केवळ ऐंशी कि मिटर अंतरावर सूपे येथे काळ्या नदीवर धरण बांधण्याचे काम गेली सात वर्षे चालू आहे आणि ते पूर्ण व्हायला आणखी तेवढीच वर्षे लागतील असा अंदाज आहे हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर प्रचंड विद्युतनिर्मिती होणार असून शेतीसाठी फार मोठ्या प्रमाणात पाणीही उपलब्ध होणार आहे. पूर्ण झालेल्या धरणाचे दृष्य मोठे नयनरम्य असते धरणाची प्रचंड भिंत, त्यामागे तयार होणारा प्रचंड जलाशय, आसमंतातील रमणीय अरण्य, त्यापासून उद्योगधंद्यासाठी मिळणारी वीज आणि शेतीसाठी मिळणारे पाणी यामुळे धरणाची उपयुक्तता आणि रम्यता नजरेत भरते धरणाच्या ठिकाणी असणारी सरकारी अतिथी-गृहे, तेथे येणाऱ्या प्रवाशांच्या सेवेसाठी सतत सज्ज असतात धरणाचे उद्घाटन देखील मोठ्या थाटात होते. मंत्र्यांची भाषणे होतात, विद्युत रोषणाई होते, धरणामुळे देशाच्या वैभवात भर पडावी असे अभिमानाने नमूद केले जाते खर्चाची आकडेवारी सांगितली जाते कल्पक इंजिनियरांचा गौरवपूर्ण उल्लेख होतो पण नेहमीप्रमाणे धरण बांधण्यासाठी जे कामगार राबले, श्रमले त्यांचा उल्लेखही कोठे नसतो कामगारांच्या घामातून, श्रमा-तून व रक्तातून हे धरण झालेले असते याबद्दल गौरवपूर्ण उल्लेख होणे

आवश्यक असते, पण ती होत नसते ! कारण अशा समारंभप्रसंगी काम-गार असतातच कोठे? अकरा पूर्ण झाल्यावर सर्व कामगारांना कामावरून कमी करण्यात येते आणि मोठ्या उदार अंतःकरणाने त्यांना त्यांच्या घरा-पर्यंतचे रेल्वेचे तिकीट देऊन त्यांची हकालपट्टी करण्यात येते

सकाळी नऊ वाजता एक टॅक्सी घराजवळ येऊन थांबली आणि हॉर्न वाजला नेहमीप्रमाणे मी अंदाज बांधला की, मुख्याला नेण्यासाठी कोणीतरी गाडी घेऊन आले आहे बाहेरूनच हाक मारीत भूदेवप्रसाद अनहोनी आत येत असल्याचे स्पष्ट दिसत होते

'चलो कॉम्रेड ! बहुत देर हुआ अभी जल्दी यहाँसे निकलना चाहीए'

ही घाई मला अपरिचित नव्हती आठ वाजता निघायचे ठरले असताना हे महाशय आले नऊ वाजता आणि पुन्हा मलाच 'जल्दी' करण्याचे सांगत आहेत मी त्यांना वेळेच्या महत्त्वाबाबत थोडे सुनावले व बॅग घेऊन गाडीत बसलो बेळगाव–खानापूर रोडने आतापर्यंत कितीवेळा गेलो असेल याची गणती नाही या सोळा मैलाच्या रस्त्याने मी अनेक वेळा सायकल-वरून देखील गेलो आहे पूर्वी हा रस्ता इतका सुंदर होता की येथून कितीही वेळा गेलो तरी कंटाळा म्हणून येत नसे झाडशहापूर आणि गणेबैलाच्या अलिकडे किती भरगच्च झाडी रस्त्याच्या दुतर्फा असायची आणि देसूरचा 'घाट' किती छान वळणे घेऊन निर्माण झालेला असायचा उताराला सायकल लागली की भिंगरीसारखी निघायची रस्त्याच्या दोन्ही बाजूला घनदाट डोंगर करवंदाच्या झुडपांना तर सीमाच नाही मुरटे, आंबे, जांभळ इत्यादि रान–मेवा या जंगलात विपुल प्रमाणात असायचा पांढरी चार आणि गडद लाल रंगाची आंबट गोड धामण, रानफुलांचा सुवास या गोष्टी अजनही मनात ताज्या आहेत आजही रस्ता तोच आहे काही अवघड वळणे टाळावीत म्हणून नवा मार्ग निर्माण होत आहे पण परिसर मात्र बदलून गेला आहे मच्छेवारचे डोंगर तर उघडे बोडके आणि केविल-वाणे झाले आहेत रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेली झाडेही विरळ होऊ लागली आहेत मधून मधून निलगिरीची नवी लागवड डोकावत आहे पण या रस्त्याने पूर्वी जो आनंद वाटायचा तो आता वाटत नाही

आमची मोटार सुसाट वेगाने निघाली हुत्तरगुंजीच्या वळणावर असलेल्या दगडाच्या खाणीतून खानापुरी फरशी काढण्याचे काम मात्र पूर्वीसारखेच चालले होते पुढे मगळरी कौले तयार करण्याचा एक कारखाना अडीचशे स्त्री– पुरुष कामगाराना सोबतीला घेऊन उजव्या हाताच्या माळावर एकाकीपणे उभा होता थोडे पुढे गेल्यावर रेल्वे रोडवर एक अतिशय अवघड वळणाचा मराठीतला ' ळ ' अक्षरासारखा पूल लागतो. या पुलावर आतापर्यंत अनेक अपघात झालेले आहेत अनेकांचे प्राण गेले आहेत. अनेक मोटार गाड्या व गोवा मुक्तीच्या वेळी लष्करी ट्रक्स देखील येथे कोसळला आहे, पण हा पूल नव्याने बांधावा अशी बुद्धी मात्र पी. डब्लू. डी खात्याला नाही मलप्रभा नदीवर नवा पूल झाला आहे आता आमची मोटर गुंजी–लोंढा मार्गाने पुढे निघाली

करबळ गावच्या अलिकडे उजव्या हाताने जाणाऱ्या डांबरी सडकेने आम्ही निघालो रेशीम उत्पादनाचे एक सरकारी केंद्र लागले त्याच्या नजिकच डोंगराच्या कुशीत भुकपाची नोंद घेणारे नवे कार्यालय उघडण्यात आले आहे सुप्याला धरण झाल्यावर तेथे ४५ चौरस किलो मिटर क्षेत्राचा आवाढव्य जलाशय तयार होणार आहे पाण्याच्या या दाबामुळे भूकप तर होणार नाहीत ना याच्या सशोधनासाठी हे कार्यालय सुरू करण्यात आले आहे थोडक्यात म्हणजे या भुकप नोंदणी कार्यालयापासूनच काळी नदी प्रकल्पाचा परिसर सुरू होतो असे समजायला हरकत नाही गुंजी–लोंढा रस्ता मात्र फारच देखणा आहे रस्त्याच्या दोही बाजुला भरपूर उंच झाडे आहेत आणि त्या निमुळत्या रस्त्याने जाताना वर समोरच्या आकाशाला दृष्टी गेली तर तेथेही एक रस्ता झाडाच्या शेंड्यामुळे तयार झाल्याचा भास होतो आसपासचे हिरवेगार डोंगर व त्याच्या एका मागे एक पसरलेल्या रांगा मन वेधून घेणाऱ्या वाटल्या हा चैत्र असल्याने झाडाना नवी कोवळी पल्लवी डवरली होती. लालसर रगाची कोवळी पाने, रेशमासारखी मऊ मधूनच कोकीळ पक्षाचा पचम स्वर ऐकू यायचा व त्यात अनेक रानपक्षाची किलबिलही मिसळून जायची आमची मोटार एका लयीत धावत होती इतक्यात रेल्वे फाटक

आले लोंढा जवळ आल्याची ती खूण होती रस्त्यात खोळंबून राहण्याचा मला मोठा वैताग वाटतो पण करणार काय ? गेट तर बंद होते पाय मोकळे करावे म्हणून मी खाली उतरण्यासाठी दरवाजा खोलणार इतक्यात गाडी येत असल्याची चाहूल लागली पुन्हा गाडी येत असल्याच्या दिशेकडे पहात बसून राहिलो ती गुडस् गाडी होती खूप लांब व सावकाश जाणारी गाडी गेली गेट उघडले पुन्हा आम्ही सुप्याच्या दिशेने भरधाव निघालो गावात जाण्याचे तसे काहीच कारण नव्हते, म्हणून पुढे निघालो

याठिकाणी धारवाडहून गोव्यात जाणाऱ्या रस्त्याला बेळगावहून सुप्याला जाणाऱ्या रस्त्याचा छेद जातो. या ठिकाणाला स्थानिक भाषेत 'कत्री' म्हणतात या कत्रीच्या ठिकाणी एक नवे नगर आकार घेऊ लागले आहे लाल कौलाच्या नव्या इमारती वर येऊ लागल्या आहेत रस्त्याची आखणी चालली आहे काळी नदी धरण योजना ज्यावेळी पूर्ण होईल त्यावेळी सुप्यासह ४० गावे पाण्याखाली बुडणार आहेत तेव्हा धरण बांधणी-बरोबरच पुनर्वसनाचे कामही चालू झालेले आहे येथून पुढे दहा मैलावर सुपा असेल हा रस्ताही मला अनेक वर्षापासून परिचित आहे सिमा आंदोलनाच्या निमित्ताने व शेतकरी संघटना बांधण्याच्या कामासाठी सुपा भागात अनेक वेळा आलो आहे पाण्याखाली बुडणाऱ्या गावाचे पुनर्वसन करण्यासाठी नागोडा या गावी पहिली परिषद झाली तिला मी हजर होतो डोंगरातून जाताना धावणाऱ्या हरणांचे कळप, रान डुकरांनी केलेली पिकाची नासाडी इतकेच नव्हे तर हत्ती या भागात येऊन गेल्याच्या खुणा पूर्वी मी कुतुहलाने पाहिल्या आहेत फुरसतीच्या वेळी शिकार शोधण्यासाठी खांद्यावर बंदुक टाकून या रानातून थोडेफार फिरलो आहे असा हा माझा चिरपरिचीत सुप्याचा परिसर पण आता सारे उजाड व भयाण बनविण्यात आले आहे सह्यगिरीच्या माथ्यावरून मी पहातो आहे तर अरण्यात जागोजागी प्रचंड धूर दिसतो आहे, वाळलेले बांबू आणि पालापाचोळा जळत आहे कत्राटदारांनी जंगलाची भयानक कत्तल केलेली आहे. एक येथील गरम हवा सोडली तर निसर्ग सौंदर्यात काश्मिरशी स्पर्धा करील असा हा देखणा भाग आता अगदीच रुक्ष, पोरका आणि उजाड

वाटतो आहे सारे ओहोळ सुकून कोरडे झाले आहेत डोंगरमाथा उन्हाने तापला असून उष्ण वारे वहात आहेत हिरवे म्हणून काही दिसत नाही !

दोन अडीच तासाच्या प्रवासानंतर सुप्याला येऊन पोहोचलो गाव नदीच्या पलीकडे आहे. आम्ही अलिकडेच थांबलो होतो. गिऱ्हाईकांनी गजबजलेल्या एका केरळीय खानावळीत जेवण घेतले बाहेर येऊन रस्त्या-वरची रहदारी न्याहाळीत उभा होतो त्यावेळी माझ्या परिचयाचा रमेश देसाई भेटला १९५५ साली गोवा मुक्ती आंदोलनात कार्य करताना या भागात अनेक वेळा आलो असल्यामुळे देसाईशी जवळीक निर्माण झाली होती माझा हात हातात घेऊन त्याने मला आग्रहाने शेजारच्या स्टॉलवर नेऊन थंड सरबत पाजले फणसाच्या झाडाच्या गर्द सावलीत वर एक ताडपत्री टाकून हे 'कोल्ड्रिंक हाऊस' तयार झाले होते धरणाच्या ठिकाणी गणेशगुडीला मी चाललो असल्याचे त्याला सांगितले मग काळ्या नदाच्या गोष्टी निघाल्या या गावी सुप्याच्या वेशीत एक बाजूने काळी नदी येते व दुसऱ्या-बाजूने पांढरी नदी येते व दोघींचा येथे संगम झाला आहे संगमाच्या ठिकाणीच पात्रात महादेवाचे मंदिर आहे त्याच्या कठड्यावरून सूर मारून पोहत असलेल्या मुलाची आठवण झाली. धरणात पाणी भरले की हे महादेवाचे देऊळ गावासह लुप्त होणार आहे बोलत बोलत व जुन्या आठवणींना उजाळा देताना देसाईने विचारले 'कॉम्रेड ! या नदीला काळी नदी का म्हणतात माहित आहे ?' मी काही उत्तर देऊ शकलो नाही. तांबडा समुद्र, काळा समुद्र अशी समुद्रांना नावे आहेत हे भुगोलात वाचले आहे पण सुप्याजवळच्या या नदीला आमच्या पूर्वजांनी 'काळी' का म्हटले याबद्दल काही सुचेना देसाई पुढे म्हणाले, त्याचे असे आहे या नदीच्या दोन्ही तिरावर गर्द झाडी आहे व नदीचे पात्रही अगदीच लहान त्यामुळे नदीच्या पात्रातून आत जाणे अवघड ! गर्द सावलीमुळे पाणी अक्षरश: काळे दिसते त्यामुळे नदीला नाव पडले 'काळी नदी' देसाईच्या कल्पकतेचे मनात कौतुक करीत त्याचा मी निरोप घेतला.

पूर्व दिशेच्या रस्त्याकडे निघालो रस्त्याच्या शेजारची झाडे झुडपे लाल धुळीने माखून गेली होती भारी नसला तरी बरीच चढण लागली व डोंगराच्या माथ्यावर आलो त्यावेळी उन्हे कलली होती आणि एक

प्रकारचा सौम्य गारवा होता जाडजूड तार उंच मनोऱ्यांना लटकली होती व या तारेच्या रस्त्यावर बकेट भरभरून खडी, रेती वगैरेची ने-आण चालली होती येथून आठ मैलावर असलेल्या दगडाच्या खाणीपासून खडी वाहविण्यात येते व तारेच्या रस्त्यावरून घरंगळत बकेटस् येत असतात व रिते झालेले परत जात असतात पहाताना हे दृष्य फार मोठे छान दिसते

याच माथ्यावर गणपतीचे एक देऊळ आहे म्हणून या वसाहतीला 'गणेशगुडी' असे नाव पडले आहे या देवळाजवळून समोर पाहिले तर डोंगराच्या कुशीत शोभून दिसणारी पांढऱ्या रंगाची घरेच घरे दिसतात आणि मागे असलेल्या डोंगराच्या प्रचंड भिंतीमळे दरीतल्या घरांचे हे दृष्य सिमला वगैरे गोहत्तीसारखे दिसू लागते डावे वळण घेऊन आमची मोटार एका कच्च्या रस्त्याने निघाली आणि मोटारीमागून लाल धुळीचे लोटही धावू लागले कॅम्पवरच्या अतिथीगृहात येवून पोहोचलो डोंगराच्या उतरणीवर हे आठ दहा खोल्यांचे अतिथीगृह आडवे पसरले आहे येथपर्यंत मोटार येऊ शकते पण आमच्या गाडीचा ड्रायव्हर तितका कुशल नसल्यामुळे गाडी पायथ्याशीच सोडून आम्ही पायऱ्या चढून येथपर्यंत येऊन पोहोचलो आता आम्ही धरणाच्या पलिकडच्या भागात येऊन पोहोचलो होतो येथून नदीचे पात्र स्पष्ट दिसत होते. इंग्रजी 'व्ही' आकाराच्या सारखा डोंगर समोर पसरला आहे व त्याच्या मधून काळी नदीचा प्रवाह चालला आहे. याच ठिकाणी धरणाची भिंत बांधण्याचे काम चालू आहे कित्येक लक्ष घनमिटर सिमेंट कॉंक्रीट येथे घालून प्रवाह अडविण्यासाठी प्रचंड भिंत उभारण्याचे काम चालू आहे नदीच्या काठावरचे दोन्ही बाजूचे डोंगर तारेने जोडले असून सिमेंट, वाळू आणि खडीचे मिश्रण याच तारेवरून सरकत मध्यावर येते व तो पाळणा सावकाश नदीच्या पात्रात उतरू लागतो व अलगद कामाच्या ठिकाणी रिकामा होतो पायात गमबूट आणि हातात खोरे, फावडा, कॉम्प्रेसर आदि आयुधानिशी सज्ज असलेले कामगार भराभर कॉंक्रीट पसरविण्याचे काम करीत असतात

अतिथी गृहातल्या कॉटवर विश्रांती घेत पडून रहाणे माझ्या प्रकृतीला मुळीच मानवत नव्हते माझे लक्ष नदीच्या पात्रात कॉंक्रीट भरण्याचे काम करणाऱ्या मजूरांच्याकडे लागून राहिले होते आमची वाट पहात खोळंबून

राहिलेल्या चारपाच कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन भपभप पावले टाकीत कामाच्या ठिकाणी येऊन पोहोचलो ओळखीच्या कामगारांचे अभिवादन स्विकारत माझी नजर चौफेर फिरू लागली कॉम्प्रेसर ड्रीलिंग चालू होते. थSSथSSथSSS असा कानठळ्या बसणारा आवाज करीत कामगाराच्या हाता-तील यत्रात बसविलेली पार गरगर पायाखालच्या काळ्या दगडात शिरत होती व तेथे मोठे भोक तयार होत होते शेजारीच कत्राटदाराचे बेलदार दगड फोडायचे काम करीत होते त्यांची शरिरे घामाने निथळत होती बेलदारांच्या बायका डोक्यावरून दगडाची वहातूक करीत होत्या टोपलीत दगड भरणारा खच्चुन भरायचा आणि ती वजनदार टोपली पायाखालचे दगड चुकवत, अनवाणी वाहून नेणारी कामगार स्त्री कामात मग्न होती. तिच्या चेहऱ्यावर मला कमलेच भाव दिसले नाहीत निर्विकार मुद्रेने ती होईल तितके कष्ट उपसत होती तिचे वय अठरा वीस वर्षाचे जेमतेम असावे पण बिचारीला तरुण म्हणण्याचे धैर्य कुणीच करू शकला नसता सोमचद्र नावाचा एक बारा–तेरा वर्षाचा पोरगाही दगड वाहून नेण्याचे काम करीत होता त्याने शैशव कधी पाहिलेच नसावे चालता येऊ लागल्यापासून त्याला कामाला जुपण्यात आले आता आपल्या वडिला-बरोबर तो काम करतो आहे रोज तीन रुपये पच्याहत्तर पैसे ही त्याची कमाई आहे बापाला मिळतात रोजचे सात रुपये. सुट्टीचा पगार नाही की सणाचा पगार नाही राहण्याची सोय नाही की आजारी पडल्यास दवापाणी भेटत नाही मग बोनस, प्राव्हिडंड फंड, ग्रॅच्युइटी या गोष्टी दूरच राहिल्या शेकडो कामगार काळ्या नदीवर जगप्रसिद्ध धरण बांधीत आहेत या धरणाने विजली चमकणार आहे. जमिनीला पाणी मिळणार आहे देश समृद्ध आणि वैभवशाली होणार आहे!

गाडीने एक दोन तीक्ष्ण वळणे घेतली आणि ती धीमेपणाने डोंगराची चढण चढू लागली मजूर, घरे, वाहने, झाडे दरीत कधी चित्रातल्यासारखी दिसत होती आम्ही आता डोंगराच्या माथ्यावर आलो होतो येथून पश्चिमे-कडचा वीस पचवीस किलोमिटरचा भाग सरी दृष्टीच्या टप्यात येत होता आम्हाला देशमुख इंजिनियरनी धरणाची कल्पना दिली ते म्हणाले, समो-रच्या ४० किलोमिटरच्या परिसरात प्रचंड जलाशय निर्माण होईल सुंदर

आणि भव्य ! आम्ही उभे असलेल्या ठिकाणी या डोंगर माथ्यावर वाळू-खडी आणि सिमेंट याचे शास्त्रोक्त मिश्रण करण्याचे मोठाले यंत्र आहे सिमेंटवर योग्य व त्वरीत प्रक्रिया व्हावी म्हणून येथे पाणी थंड करण्याचे मोठे यंत्र बसविण्यात आले आहे तेथे प्रथम बर्फाच्या लाद्या तयार होतात आणि मग ३ डिग्री सेंटीग्रेड तपमानाचे अतिशय थंड पाणी मिश्रणात फवारण्यात येते त्यामुळे मिश्रण लौकर घट्ट होण्यास मदत होते तयार झालेले मिश्रण एका छोट्या रेलगाडीने बाहेर काढले जाते व रोप–वे वरुन म्हणजे तारेच्या मार्गावरून ते नदीच्या तळाला चाललेल्या कामाच्या ठिकाणी पोहोचविले जाते एक कुशल कामगार काचेच्या केबीनमध्ये बसुन काँक्रीटच्या मिश्रणाच्या वाहतुकीचे व्यवस्थीत नियत्रण करीत असतो अशी विद्युतचलित नियंत्रण केंद्रे अनेक ठिकाणी बसविण्यात आली आहेत. हे सर्व पहात असताना अभियंत्यांच्या नियोजनाचे, कामगाराच्या कौशल्याचे कौतुक वाटते

सूर्य मावळतीला झुकला होता आता हवाही छानच होती दूरवर डोंगरामागून डोंगराच्या रांगा दिसत होत्या आकाश निरभ्र असले तरी या परिसरात धुके आणि धूळ भरून राहिली होती सारे धुसर आणि शांत वाटत होते आम्ही माघारी निघालो सरावानुसार माझी दृष्टी एका पक्षाकडे गेली. तो ससाणा असल्याचे ओळखायला वेळ लागला नाही. आपली अणकुचीदार चोच खाली रोखून व पंख फडफडवीत तो एकाच जागेवर हॅलिकॉप्टर सारखा तरगत होता त्याने आपली नजर खालच्या दरीतील भक्षावर रोखली होती क्षणार्धात त्याने गती वाढविली आणि खालच्या दरीत वेगाने स्वतःला झोकून दिले मानवी सामाजीक जीवनात देखील असे अनेक ससाणे दुर्बल घटकावर कसे तुटून पडतात या बद्दलचा विचार करीत गाडीकडे केव्हा येऊन पोहोचलो हे समजले देखील नाही सूर्य हळू हळू क्षितिजाखाली सरकत होता लाल नारंगी प्रकाश त्यानं आभाळात उधळून दिला होता. पूर्वेकडच्या दरीत काळोखाचे साम्राज्य पसरु लागताच विद्युतदिपाचे सहस्त्र तारे चमकू लागले आणि आमची गाडी बेळगावच्या दिशेने भरधाव निघाली

* *

REFBK-0024940